# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV (CBCS)

## तत्त्वज्ञान अभ्यासपत्रिका क्र.II

# राजकीय तत्त्वज्ञान

## विषय कोड : UAPHI401

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व प्रमुख,
मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. नारायण शंकर गडदे**
सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
तत्त्वज्ञान विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. गौतम टेंकाळे**
सहयोगी प्राध्यापक,
साठे महाविद्यालय, विले पार्ले, मुंबई

: **डॉ. जयसिंग बाजीराव सावंत**
सहाय्यक प्राध्यापक,
इस्माइल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई

: **डॉ. रोहित सुधाकर गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक,
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर (प), पालघर

**मे २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय विचारप्रणाल्या | ०१ |
| २. | स्वातंत्र्य | २७ |
| ३. | समता | ३९ |
| ४. | न्याय | ४९ |


❖❖❖❖

# SYBA Semester 4:

# Political Philosophy (UAPHI-401)

**Unit I: Political ideologies (11 Lectures)**

Characteristics of (i) Liberalism (ii) socialism (iii) Anarchism (iv) Totalitarianism, (v) Cosmopolitanism (vi) Nationalism

**Unit II: Liberty (11 Lectures)**

Isaiah Berlin: Negative and Positive liberty; Thomas Hobbes: negative liberty; Jacques Rousseau: positive liberty; Third Concept of Liberty: Republican Theory of Liberty (liberty as non-domination); right to dissent and civil disobedience – Martin Luther King

**Unit III Equality (11 Lectures)**

Types of equality: (i) Numerical (ii) Proportional and (iii) Moral; Ronald Dworkin's view on the equality of resources; Gandhi: Sarvodaya (universal welfare)

**Unit IV Justice (12 Lectures)**

Justice as preservation: Plato; Justice as entitlement: Robert Nozick; Justice as fairness: John Rawls; Social justice: B. Ambedkar.

**Semester End Exam Evaluation [100 marks]**

1. There shall be five compulsory questions

2. First four questions shall correspond to the four units

3. Question 5 shall be Short Notes (one from each unit and attempt any 2 of 4)

4. All questions shall contain internal choice

5. Each question shall carry a maximum of 20 marks

**References and reading list recommended for the course:**

**Unit 1.**


- Robert Goodman, Philip Pettit and Thomas Pogge A Companion to Contemporary Political Philosophy Blackwell: 2007 ( 2 volumes)

- Baradat, Leon. Political Ideologies: their origins and impact (Pearson-Prentice Hall, 2008) Bird, Colin. An Introduction to Political Philosophy (Cambridge University Press, 2006) Heywood, Andrew. Political Theory: An Introduction (Palgrave Macmillan, 2012/13) Knowles, Dudley. Political Philosophy (London: Routledge, 2001)

**Unit 2.**

- David Miller ed. The Liberty Reader Routledge 2006 : Readings from the above text as follows: (a)Two Concepts of Liberty by Isaiah Berlin (b) Negative and Positive Freedom by Gerald C. MacCallum, Jr. (c)The Republican Ideal of Freedom by Philip Pettit (d) A Third Concept of Liberty by Quentin Skinner

- Martin Luther King. "Letter from Birmingham Jail" https://web.cn.edu/kwheeler/documents/Letter_Birmingham_Jail.pdf 1963

**Unit 3.**

- Stephan Goosepath "Equality" in Stanford Encyclopedia of Philosophy https://plato.stanford.edu/entries/equality/ 2007

- Raymond Plant Modern Political Thought Wiley Blackwell 1991 (chapter on Dworkin) Ronald Dworkin "What is Equality? Part 1: Equality of Welfare" Philosophy & Public Affairs, 10 (3) (Summer, 1981), pp. 185-246

- Ronald Dworkin "What is Equality? Part 2: Equality of Resources" Philosophy & Public Affairs, Vol. 10, No. 4 (Autumn, 1981), pp. 283-345

- M.K. Gandhi Autobiography: Story of My Experiments with Truth (relevant discussion on Sarvodaya) Navjivan Publishing House: Ahmedabad

- 'Hind Swaraj' and Other Writings (Cambridge Texts in Modern Politics) ed. Anthony Parel, CUP: Cambridge 2010 edition)

- Village Swaraj compiled H.M. Vyas Navjivan Publishing House: Ahmedabad, 1962 Ganesh Prasad "Sarvodaya—A Critical Study" The Indian Journal of Political Science Vol. 21, No. 1 (January—March, 1960), pp. 38-61

**Unit 4.**

- Julian Lamont "Distributive Justice" Stanford Encyclopedia of Philosophy

- Robert Nozick Anarchy, State and Utopia, New York: Basic Books, 1974 (chapter 7) John Rawls A Theory of Justice, Cambridge, MA Harvard University Press, 1971(chapter 1 and chapter 2)

- Raymond Plant Modern Political Thought Wiley Blackwell 1991 (Relevant chapters) Plato, Republic New Haven: Yale University Press, 2006 (Book 1)

- B.R. Ambedkar "Annihilation of Caste" in Dr. Babasaheb Ambedkar: Writings and Speeches, Vol. 1. Bombay: Education Department, Government of Maharashtra, 1979, pp. 25-96. (also available online)

- B.R. Ambedkar "Buddha and His Dhamma"

- Arun P. Mukherjee "B.R. Ambedkar, John Dewey, and the Meaning of Democracy" New Literary History (2009) 40 (2): 345-370

- Valerian Rodrigues "Ambedkar on Preferential Treatment" Seminar (2005), 549, pp 55–

❖❖❖❖

# १

# राजकीय विचारप्रणाल्या
## (POLITICAL IDEALOGIES)

**ब) अराज्यवाद (Anarichism)**

**क) लोकशाही (Democracy)**

**घटक रचना :**


१.० उदिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ अराज्यवाद

१.३ रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवाद सिद्धांत

१.४ अराज्यवादाचे मूल्यमापन

१.५ लोकशाहीचे प्रस्तावना

१.६ लोकशाहीचा अर्थ व लोकशाहीची व्याख्या

१.७ लोकशाहीचा पैलू

१.८ लोकशाहीचा प्रकार

१.९ लोकशाहीचा आदर्श (Ideals)

१.१० लोकशाहीचा गुण (फायदे) व दोष (तोटे)

१.११ सारांश

१.१२ दीर्घोत्तरी प्रश्न


## १.० उद्दिष्टये

१. अराज्यवाद संकल्पनेची भूमिका एक राजकीय विचारप्रणाली म्हणून समजून घेणे आवश्यक आहे.

२. रॉबर्ट पॉल वुल्फची अराज्यवादी विचारसरणी अभ्यासता येईल.

३. लोकशाहीची संकल्पना एक राजकीय विचारप्रणाली आणि एक शासन पद्धती म्हणून समजून घेणे.

४. लोकशाही या राजकीय विचारप्रणालीच्या मूलभूत तत्त्वांचा वा आदर्शाचा अभ्यास करता येईल. त्यामुळे लोकशाहीची मुल्ये आणि तात्त्विक भूमिका समजेल.

५. एकूणच लोकशाहीचे तात्विक स्वरूप समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना

राजकीय तत्त्वज्ञानामध्ये एक महत्त्वाचा प्रश्न मांडला जातो. तो प्रश्न म्हणजे राज्यसरकार किंवा शासन कोणत्या अधिकाराखाली लोकांकडून नियमपालनाची अपेक्षा ठेवते. व्यक्तीने शासनाचे नियम का पाळावे ? शासनसंस्थेचे किंवा राज्याचे समर्थन का करावे ? यासंबंधीची उत्तरे पुढीलप्रमाणे दिली जातात.

अराज्यवाद या विचारप्रणालीत व्यक्तीस्वातंत्र्य महत्त्वाचे असून त्याचे शासनसंस्थने उल्लंघन करता कामा नये या विचारसरणीनुसार कोणत्याही प्रकारे शासनव्यवस्थेची आवश्यकता नाही. अराज्यवादी सिद्धांत कोणत्याही प्रकारच्या शक्तीवर आधारित असलेल्या शासनाच्या विरोधी आहे. राज्य ही दोषपूर्व संस्था आहे. त्याची आवश्यकता नाही. अराज्यवाद (Anarchism) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'अनारकीया' या शब्दापासून झाली असून त्याचा अर्थ शासनाचा अभाव (Without Rule) असा होतो.राज्यसंस्था वा अधिकार नसलेली (No rule of Any Authority) अशी राजकीय विचारप्रणाली होय. रॉबर्ट पॉल वुल्फ या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाने Indefence of Anarchism या लेखातून राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्याचे तत्त्वज्ञान होय असा विचार मांडला त्याच्या मते काही विशिष्ट लोकांवर आपल्या अधिकाराचा वापर करणारा गट लोकशाहीत असतो. परंतु वुल्फ राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना, अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्ष यांचा आधार घेतो. राज्य हे असमर्थनशील आहे. त्याने स्वायत्तेला महत्त्व दिले.

लोकशाही ही एक राजकीय विचारप्रणाली असून ती शासनसंस्थेचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही फक्त शासन प्रकारच नाही तर ती एक जीवनपद्धती सुद्धा आहे. यादृष्टीने लोकशाही म्हणजे काय ? तिचे प्रकार कोणते ? या दृष्टीने लोकशाहीचे फायदे व तोटे काय आहेत ? लोकशाहीचे आदर्श कोणते ? या दृष्टीने लोकशाहीचा अर्थ, व्याख्या तिचे प्रकार, लोकशाहीची मूलभूत तत्त्वे, भारतीय लोकशाहीचे स्वरूप इत्यादींचा अभ्यास करणे लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

## १.२ अराज्यवाद (Anarchism)

स्थूलमानाने राज्यसंस्था विरहित स्वयंस्फूर्तपणे आणि परस्पर सहकार्याने सामाजिक व्यवहार चालविण्यासंबंधी जे विचार आणि तत्त्वे मानली जातात त्यास अराज्यवाद (Anarchism) असे म्हणता येईल. 'अराज्यवाद' यास इंग्रजीत (Anarchism) असे म्हणतात. (Anarchism) या शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्द 'अनारकीया' या शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ शासनाचा अभाव असा होतो. अराज्य याचा अर्थ व्यक्तीवक्तीत, राज्याराज्यात राष्ट्राराष्ट्रात जे व्यवहार करायचे ते स्वयंस्फुर्त व

सहकार्यावर आधारलेले असले पाहिजेत. अशा समाजव्यवस्थेत राज्यसंस्थेची गरजू असू नये. थोडक्यात अराज्यवादाचे उद्दिष्ट हे सर्व मानवी संबंधांच्या गरज असू नये. थोडक्यात अराज्यवादाचे उद्दिष्ट हे सर्व मानवी संबधांच्या क्षेत्रात न्याय प्रस्थापित करणे हे होय.

अराज्य याचा अर्थ शासनाचा व राज्यसंस्थेचा अभाव अभाव एवढाच नसून अराजकता वा अंदाधुंदी असाही नव्हे. अराज्यवादी सिद्धांत कोणत्याही प्रकारच्या शक्तीवर आधारित असलेल्या शासनाच्या विरुद्ध आहे. राज्यसंस्था वा शासनसंस्था ही दोषपूर्ण संस्था आहे. कारण सामाजिक व नैतिक दु:खे ही राज्यसंस्थेकडून नाहीशी होऊ शकत नाहीत. शोषण व दडपशाही यांच्या मूळाशी राज्यसंस्था असते. म्हणूनच अराज्यवादाचे अनेक पुरस्कर्ते असून त्यांचे विचार एकमेकांपासून वेगवेगळे असले तरी अराज्यवादाची तत्त्वे व मूल्ये याबाबतीत सर्वसमावेशक विचारही त्यात दिसून येतात. भारतात म. गांधी हे तात्त्विक अराज्यवादी होते. पाश्चात्य ग्रीक तत्त्वज्ञान झेनो हा ग्रीक तत्त्वज्ञ अराज्यवादी सिद्धांताचा प्रचार करणारा पहिला विचारवंत म्हणून विल्यम गॉडविन यांचा उल्लेख करावा लागतो. मॅक्स स्टर्नर हा अराज्यवादी होता. म. गांधीच्या मते अहिंसक समाज हा राज्यहीन असेल. या समाजात राज्यसंस्था अखेर विलयाला जाईल असे ते मानीत. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारात वर्गविहीन समाजाची रचना हा सुद्धा एक अराज्यवादी नेणारा स्वप्नवतआदर्श आहे. अराज्यवादात समाज व व्यक्ती अशी निर्माण होते की, तेथे राज्याची गरज लागत नाही. शेवटी राज्यसंस्था विलयाला जाईल. कार्पेक्रिट याने साम्यवादी धर्तीवर आधारीत अराज्यवाद प्रतिपादन केला. त्याच्या मते केवळ राज्यसंस्थाच नव्हे तर खासगी मालमत्तेची खाजगी मालकी ही सुद्धा नष्ट केली पाहिजे.

विल्यम गॉडविनच्या मते शासनव्यवस्थेतून जुलमी सत्ताधीश व संचित संपत्तीमुळे समाजात भीषण स्वरुपाची विषमता निर्माण होते. परिणामी सत्ता, संपत्ती व व पैसा या गोष्टींमुळे ते इतर लोकांच्या श्रमाचे शोषण करतात. म्हणूनच गॉडविनने सर्व प्रकारची संपत्ती नाकारली. जो दुसऱ्यांचे शोषण करून मालमत्तेचा संचय करतो ती मालमत्ता त्याने निषेधार्ह मानली. सत्ता व संपत्ती नष्ट करण्यासाठी त्याने क्रांतीचा पुरस्कार केला. त्याने त्याकरिता समाजातील लोकांमध्ये जागृती, जाणीव वाढावी असा विचार मांडला. मॅक्स स्टर्नर याने राज्याची समाजाला गरज नाही. सर्व अर्थव्यवहार स्वतंत्र व सहकारी भावनेने केले जावेत अशी विचारसरणी प्रतिपादित करणारा मॅक्स स्टर्नर हा अराज्यवदाचा पुरस्कर्ता होता.

रॉबर्ट पॉल वुल्फ हा अराज्यवादी राजकीय विचारप्रणालीचा पुरस्कार करणारा तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होता. त्याने Indefence of Anarchism हा प्रसिद्ध लेख लिहून अराज्यवादी विचारप्रणालीचा आधुनिक अंगाने मांडणी केली. राज्य हे असमर्थनशील कसे आहे अधिकार व स्वायत्तता या संबंधीचे विचार मांडले. वरील अराज्यवाद्याचे मते राज्य ही अनावश्यक संस्था आहे.

अराज्यवादाच्या पुढील काही व्याख्या महत्त्वाच्या आहेत.

**१) डिकिन्स :** अराजकता म्हणजे व्यवस्थेचा अभाव नव्हे तर शक्तीचा अभाव असून त्यात स्वातंत्र्य, सहकार्य व प्रेम ही मूल्ये असणारा समाज होय.

**२) हॅक्स्ले :** अराजकता म्हणजे समाजाची अशी व्यवस्था की, ज्यात प्रत्येक व्यक्ती आपली शासक राहील.

**३) कोकर :** अराज्यकतेचा सिद्धांत म्हणजे कोणत्याही स्वरुपात राष्ट्रीय सत्ता अनावश्यक आहे. आधुनिक अराज्यवादात राज्याचा सैद्धांतिक दृष्टिकोन तर आहेच पण वैयक्तिक संपत्ती (खाजगी मालमत्ता) आणि धार्मिक संस्था याविषयीचा नकारात्मक गोष्टींचाही समावेश आहे.

अराज्यवादी हे राज्यविरहित समाजाचा आदर्श समोर ठेवतात. शासनविरहित वा राज्यविरहित समाजाच्या निर्मितीसाठी क्रांतीपासून ते मानवतावादी आवहानापर्यंत अनेक परस्परपूरक मार्गही प्रतिपादन करतात. हा नवसमाज क्रांतीकारक कृतीतून निर्माण होऊन तोच राज्यसंस्था नष्ट करू शकतो. नवी समाजरचना अस्तित्वात आणण्यासाठी व्यवहारात शास्त्रीय मार्ग स्वीकारावे लागतील. न्यायबुद्धि व बुद्धिप्रमाण्याचे मार्ग त्याकरिता अनुसरावे लागतील. अशी ही अराज्यवादी राजकीय विचारसरणी आहे.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : अराज्यवाद म्हणजे काय ते स्पष्ट करा.

## १.३ रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवाद सिद्धांत

रॉबर्ट पॉल वुल्फ (जन्म-१९३३) हा आधुनिक अमेरिकन राजकीय तत्त्वज्ञ आहे. रॉबर्ट पॉल वुल्फ हा कोलंबिया विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक होता. नंतर मॅशशूटस् विद्यापीठात राजकीय तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून ते कार्यरत झाले. त्यांनी अनेक ग्रंथ व लेख लिहिले आहेत. त्यापैकी Indefence of Anarchism हा त्यांचा लेख प्रसिद्ध आहे. वुल्फने आपल्या Indefence of Anarchism या लेखाची सुरुवात करताना 'राजकारण' (पॉलीटिक्स) म्हणजे काय ? हे स्पष्ट केले. त्यांच्या मते राजकारण म्हणजे राज्यांच्या शक्ती वा बलाचा वापर करणे किंवा त्या बळावर विशिष्ट प्रभाव टाकणे होय. राजकीय तत्त्वज्ञानाची व्याख्या करताना ते म्हणतात की राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राज्याचे तत्त्वज्ञान होय. वुल्फच्या मते राज्य म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रात आपल्या अधिकाराचा वापर करणाऱ्या गट हा लोकशाही व्यवस्थेत अधिकार गाजवणारा एक गट असतो. परंतु एकाधिकारशाहीमध्ये एकाच व्यक्तीचे सर्व अधिकार असतात. वुल्फ राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना, अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्षाचा आधार घेतो.

### १.३.१ अधिकार संकल्पना:

साधारणपणे अधिकार म्हणजे एखाद्यालाआदेश देण्याचा हक्क त्याचबरोबर त्याचे पालन केले जाण्याचा हक्क असा अर्थ केला जातो. वुल्फ अधिकार (Authority), शक्ती (power) वा बल यांमधील फरक स्पष्ट करतो. शक्ती वा बल म्हणजे धमकीचा जबरदस्तीचा वापर करणे तर अधिकारात दिलेल्या आज्ञेचे पालन समोरच्या व्यक्तीने करायला हवेच, अशी अपेक्षा असते. शक्तीमध्ये कोणत्यातरी बाह्य बलाचा वापर केलेला आढळतो. उदा. एखाद्या अपहरणकर्त्याने मुलांचे अपहरण करून त्याच्या पालकांकडून दोन लाखाची मागणी केली आणि पालकांनी ते पैसे दिले तर त्या अपहरणकर्त्याने बलाचा किंवा शक्तिचा वापर केला असे म्हणता येईल पण पैसे मागणे हा त्याचा अधिकार आहे असे म्हणता येणार नाही.

अधिकाराच्या संकल्पनेत दिलेल्या आज्ञेचे पालन केले जावे अशी अपेक्षा असते. असे राज्यकर्ते मानतात. त्यांच्याकडे आज्ञा देण्याच्या अधिकार आहे. आणि त्या आज्ञा लोकांनी पाळल्या पाहिजेत. कारण त्या आज्ञा त्यांनी दिलेल्या आहेत. परंतु अशाप्रकारे आज्ञा देण्याच्या अधिकार आहे असे मानले तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. त्यांच्या मतानुसार, आतापर्यंतच्या मानवी इतिहासात कोणतेही असे राज्य नाही की, त्यांनी दिलेल्या आज्ञेचे पालन करण्याचा अधिकार इतरांना आहे. वुल्फ म्हणतो, जी व्यक्ती आज्ञा देते ती केवळ माझ्या कर्तव्याची जाणीव करून देण्यात नियुक्त ठरते. त्यांची जी भूमिका आहे ती कोणीही दुसरा म्हणजे व्यक्तीचा मित्र किंवा त्यांची सदसद्विवेकबुद्धीही करते. रॉबर्ट पॉल वुल्फ अधिकारांमध्ये फरक सांगतो. त्याच्या मते अधिकार (Authority) दोन प्रकारचे असतात.

**१) Defacto de Jure Authority:** वुल्फच्या मते नियम अस्तित्वात असल्यामुळे व्यक्ती कायदेशीर अधिकाराचे अस्तित्व मानते. त्याच्या आधारावरून त्याच्याकडे कायदेशीर अधिकाराची संकल्पना आहे असा निकष काढतो.

**२) Supreme Authority:** सर्वोच्च अधिकार - राज्यात वा व्यक्तींच्या गटात की ज्याला सर्वोच्च अधिकाराचे हक्क बहाल केलेले असतात. आदर्श नियमांचे पालन करण्याची आज्ञा देते. या आदेशांचे पालन करण्यासाठी त्याला कायदेशीर अधिकार (Legitimate) असतात.

### १.३.२ स्वायत्ततेची संकल्पना (The concept of Authority)

व्यक्तीला संकल्पनाचे स्वातंत्र्य असते हे नीति शास्त्रातीलएका महत्त्वाचे गृहीतक मानले जाते. जर व्यक्ती कृती करण्यास स्वतंत्र असेल तर व्यक्तीला नैतिक जबाबदार ठरवता येते. कांट या जर्मन तत्त्ववेत्त्याच्या मतानुसार स्वातंत्र्य म्हणजे, आपण कसे वागू शकतो याची निवड करण्यास समर्थ असतो. परंतु वुल्फच्या मतानुसार केवळ निवड करू शकणे हे नैतिक जबाबदारीस पुरेसे नाही तर विचार प्रणालीचा वापर करणे, आपण काय करावयास हवे याची जाणीव असणे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

प्रत्येक व्यक्ती ज्याला संकल्पनाचे स्वातंत्र्य आहे आणि जो विचार करू शकतो. तशा कृतींसाठी जबाबदारी स्वीकारणे हे त्याचे कर्तव्य ठरते. जबाबदार व्यक्ती हे जाणत असते की आपण नैतिकतेने बांधले गेलो आहोत. नैतिकतेचे बंधन आपल्यावर आहे. अर्थातच तो हे ही जाणतो की हे नैतिकतेचे बंधन कुठल्या बाह्य घटकांनी किंवा व्यक्तीने लादलेले नसते तर आपण आपणावर लादून घेतलले असते. तो दुसऱ्यांनी दिलेला सल्ला ऐकूण घेईल पण नेमके काय करायला हवे हे तो स्वतः ठरवितो. तो नैतिक निर्णय घेतो. तो स्वतः स्व्ठ्साठी कायदा करतो म्हणजे तो स्वायत्त असतो.

कांटच्या मतानुसार, नैतिक स्वायत्तता म्हणजे स्वातंत्र्य आणि जबाबदारीचे मिश्रण स्वतः बनलेल्या कायद्याचे पालन करणे, स्वायत्त व्यक्ती ही कधीच इतरांच्या मर्जीनुसार वागत नसते. इतरांनी काही सांगितलेले ती व्यक्ती ऐकेलही परंतु दुसऱ्यांनी सांगितले म्हणून नाही तर स्वतःला पटले तरच ती ऐकेल.

जबाबदारी स्वीकारणे म्हणजे आपण काय करावयास हवे याबाबतीत अंतिम निर्णय घेणे. प्रत्येक व्यक्ती तिच्या कृतीसाठी जबाबदार असते. स्वायत्त व्यक्ती ही नेहमी स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागते. जरी कधी इतरांची आज्ञा मानत असली तरी ती आज्ञा स्वीकारतअसताना त्याने पूर्ण विचार केलेला असतो. त्या परिस्थितीत ती आज्ञा मानणे त्याला योग्य वाटते. अर्थातच दुसऱ्या व्यक्तीने दिलेली आज्ञा मानत असताना त्या व्यक्तीचा आपल्यावर अधिकार आहे असे मानत नाही.

आपणास असे आढळते की, राजकारणात व रोजच्या जीवनात माणूस त्याची स्वायत्तता गमावत असतो. त्याचीही कारणे असतात. परंपरेचा पगडा, नोकरशाहीचा पगडा असतो. त्याच्यावर राज्य करणारे तथाकथित राजकारण्यांमुळे त्याला तसे करावे लागते.

साधारणपणे मानवी इतिहासात आदेशाचे पालन करणाऱ्यास आवाहन देणारी व्यक्ती दुर्मिळतेने सापडते. प्लेटोच्या मते, राज्यकर्ते ज्ञानात, शहाणपणात श्रेष्ठ असतात म्हणून लोकांनी त्यांच्या आदेशाचे पालन करावे.

### १.३.३ अधिकार आणि स्वायत्तता यातील संघर्ष :

अधिकार गाजवण्याचा आणि इतरांवर राज्य करण्याचा हक्क हे कोणत्याही राज्याचे वैशिष्टयपूर्ण लक्षण आहे. तर स्वतःवर राज्य करून घेण्यास नकार देणे आणि स्वायत्तता प्राप्त करणे हे मानवाचे प्राथमिक कर्तव्य आहे.

जोपर्यंत मानवाला स्वतःच स्वतःचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्याच्याकडे असते तोपर्यंत कोणीही व्यक्तीने किंवा राज्याने त्याच्यावर अधिकार गाजवण्यास तो विरोधच करतो. याचाच अर्थ राज्याचे कायदेपालन करणे हे त्याचे कर्तव्य आहे. (कारण ते कायदे आहेत हेच तो मानत नाही.) अराज्यवादी विशिष्ट काळापुरता कायद्याची आवश्यकता मान्य करील राज्य ही कल्पना पूर्णपणे नाहीशी करण्याबाबत तो साशंक असेल. परंतु तो कधीही हे मान्य करणार नाही की राज्याने दिलेल्या आज्ञा या त्याला मान्य असतात. अर्थात सर्वच अधिकारशाही ही बेकायदेशीर असते. वुल्फच्या मतानुसार जर सर्वच

माणसांचे सर्वोच्च स्वायत्तता प्राप्त करणे हे जर कर्तव्य असेल तर कोणत्याही राज्यातील लोकांना त्यांचे आदेश पालन करण्याचे नैतिक कर्तव्य असणार नाही.

अराज्यवादींनी स्वायत्ततेला महत्त्व दिले. याशिवाय प्रत्येकाचे एक कर्तव्य ठरते की, त्याला जे योग्य वाटते ते त्याच्या विचारानुसार त्याने वागावे राज्य हे लोकांवर आपला अधिकार गाजवतात, त्या अधिकारांचे पालन लोकांनी करावे अशी अपेक्षा बाळगतात. लोकांनी न पटणाऱ्या आदेशांचे त्यांनी पालन करावे ते त्यांचे कर्तव्य आहे असे ते मानतात. राज्याच्या आदेशाचे पालन करून नैतिक स्वायत्तता मिळविणे हे श्रेष्ठ आहे. कोणत्याही राज्यांच्या लोकांवर नैतिक अधिकार नाही म्हणून राज्य हे असमर्थनशील आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) वुल्फ यांची अधिकार आणि स्वायत्ततेची संकल्पना स्पष्ट करा.

## १.४ अराज्यवादाचे मुल्यमापन

राज्यविरहित समाज हा एक आदर्श अराज्यवाद्यांच्या समोर होता. त्यांची भूमिका अतिरेकी स्वरुपाची वाटते कारण समाजवादी राज्यसंस्था वा शासन संस्था नको असे जरी काही टीकाकार म्हणत असले तरी समाजासाठी व तिच्या रक्षणासाठी प्रामुख्याने राज्यसंस्थेची आवश्यकता आहे. अराज्यवाद्यांच्या हिंसात्मक धोरणावर टीकाकार आक्षेप घेतात. हिंसेतून हिंसा उत्पन्न होते. हिंसात्मक समाज निर्माण होऊन तो नाहिसा करणे व त्यातून शांततावादी समाजव्यवस्था निर्माण होईल हे योग्य वाटत नाही. याउलट हिंसात्मक धोरणामुळे समाजातील विकृती नष्ट होईल व राज्यहित समाजव्यवस्थेचे वातावरण होईल हा अराज्यवाद्यांचा आशावाद भोळसट आहे.

अनेक अराज्यवादी विचारांच्या चळवळी या निष्प्रभ झालेल्या आहेत. त्यांच्या अराज्यवादी विचारला वैयक्तिक दहशतवादाचे रूप आलेले पाहावयास मिळते. अर्थात अराज्यवाद्यांचे विचार समाजात प्रसूत न झाल्यामुळे त्यांच्या विचारांचा पराभव झालेला आहे. सामाजिक विषमता व त्यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न जरी अराज्यवाद्यांचे विचार जहाल वाटत असले तरी ते आधुनिक काळात आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील दोषांमुळे असह्य आहेत. अर्थात अराज्यवाद्यांची मते काही विशिष्ट मर्यादेपर्यंत मान्य झाली तरी सामाजिक, आर्थिक, नैतिक दोष राज्यसंस्थेकडून दूर होतील ही अपेक्षा करणे चूक आहे. सामाजिक, आर्थिक व नैतिक समस्या वा अडचणी या राज्यसंस्थेकडून नाहीशा होऊ शकणार नाहीत कारण राज्यसंस्थेच्या मुळाशी शोषण व दडपशाही असते. माणसामाणसातील संबंध हा क्रमाक्रमाने खालपासून ते वरपर्यंत सर्वोच्च अशा आंतरराष्ट्रीय सहकार्यापर्यंत संघटीत होऊन नवीन समाजव्यवस्था प्रस्थापित होईल ही अराज्यवाद्यांची कल्पना साकार होईल हा विचार स्वप्नवत राहिलेला आहे.

## क) लोकशाही (Democracy)

## १.५ प्रस्तावना

लोकशाही एक राजकीय विचारप्रणाली म्हणून शासनाचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही केवळ शासनप्रकारच नाही तर ती एक जीवनपद्धती आहे. ही शासनपद्धती जनतेच्या संमातीवर आधारलेली आहे. लोकशाहीत आचार, विचार, उच्चार व संघटनेचे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही लोकशाहीची प्रधान तत्त्वे आहेत. लोकशाहीची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय उप प्रकार असून भारतात संसदीय लोकशाही आहे तर अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. लोकशाहीत राज्यघटना, राजकीय पक्ष, जनतेचा सहभाग असतो. आज लोकशाहीला अनेक धोके व आव्हाने निर्माण झालेली असून लोकशाहीचे फायदे व तोटे आहेत. किंबहुना काही त्रुटी व आक्षेपही लोकशाहीवर घेतले गेले आहेत. त्यादृष्टीने लोकशाहीचा अर्थ, लोकशाहीचे प्रकार, लोकशाहीचे आदर्श (Ideals) इत्यादींचा अभ्यास आवश्यक आहे.

## १.६ लोकशाहीचा अर्थ व व्याख्या

लोकशाही एक जुनी संकल्पना आहे. लोकशाहीला इंग्रजीत Democracy असे म्हणतात. लोकशाही ही संकल्पना ग्रीक देशामधील असून यात Demos  म्हणजे लोक आणि Kratos  म्हणजे राज्य यावरून 'लोकांचे राज्य' म्हणजे डेमॉक्रसी असा ग्रीक शब्द तयार झाला. लोकशाहीची सर्व वैशिष्टय प्रकट करणारी व्याख्या करणे कठीण आहे. परंतु लोकशाही या संज्ञेचा अर्थ आणि तिचे स्वरूप समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

**अब्राहम लिंकन :** "लोकांचे, लोकांकडून व लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही होय."

**जे.एस. मिल्ल :** "लोकशाही म्हणजे असा शासनाचा प्रकार जेथे सरकार बहुमताच्या हातात असते. प्रत्यक्ष सरकारी कारभार समाजाने निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालविला जातो." हे प्रतिनिधी ठराविक कालावधीनंतर होणाऱ्या निवडणुकांद्वारे निवडलेले जातात."

**ऑक्सफर्ड शब्दकोशात** लोकशाहीचा दिलेला अर्थ हा उदबोधक आहे. "लोकशाही म्हणजे अशी शासनयंत्रणा जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात."

या सर्व व्याख्यांपेक्षा 'लोकांचे सार्वभौमत्व' हे लोकशाहीत महत्त्वाचे असते.

## १.७ लोकशाहीचे पैलू

लोकशाहीचे अनेक प्रकार आहेत तसेच तिचे अनेक वैशिष्टय आहेत. संसदीय लोकशाही, अध्यक्षीय लोकशाही पक्षरहित लोकशाही, औद्योगिक लोकशाही, समाजवादी लोकशाही,

लोकांची लोकशाही इत्यादी प्रत्येक देशातील लोकशाहीचे स्वरूप भिन्न असून संस्थात्मक रचना वेगळी असू शकते. आजच्या लोकशाहीला राजकीय, आर्थिक, सामाजिक नैतिक व धार्मिक पैलू प्राप्त झाले असून त्याचा अभ्यास करावा लागतो.

**राजकीय पैलू :** लोकशाहीच्या या पैलूत राजकीय सत्तेत सर्वांचा वाटा असतो. इतरांच्या मताचा आदर, विरोधी पक्षांची टीका सहन करण्याची सहनशीलता, टीकाटिप्पणी महत्त्वाचे असतात. याशिवाय नागरिकांना मुलभूत हक्क घटनेने दिलेले असतात.

आपल्या राज्यघटनेने आपलसंख्यांक समाजाला शैक्षणिक व सांस्कृतिक हक्क दिले आहेत.

**सामाजिक पैलू :** केवळ राजकीय लोकशाही असून चालत नाही तर त्याच्याबरोबर सामाजिक लोकशाहीची आवश्यकता असते. या पैलूत व्यक्तीची प्रतिष्ठा महत्त्वाची मानली जाते. व्यक्तीला सर्व क्षेत्रात मान मिळाला पाहिजे. तिच्या आवडीनिवडीप्रमाणे कोणत्याही संघटनेचे सभासद होता आले पाहिजे. जात, धर्म, वंश यावर आधारित कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होता कामा नये.

**आर्थिक पैलू :** लोकशाहीत आर्थिक पैलू एक महत्त्वाचे अंग आहे. या पैलूत गरीब आणि श्रीमंत यातील दरी कमी व्हावी असे अपेक्षित असते. यात भुकेपासून मुक्तता, रोजगाराच्या संधी, आर्थिक विकास अपेक्षित असतो. क्रमचाऱ्यांचे निवृत्ती वेतन, सार्वजनिक आरोग्य सेवा, महिलांना बाळंतपणाची रजा इ. गोष्टींचा अंतर्भाव या पैलूत येतो.

**आपली प्रगती तपासा**

१) लोकशाहीची व्याख्या द्या.

२) लोकशाहीचे विविध पैलू सांगा.

## १.८ लोकशाहीचे प्रकार - प्रत्यक्ष लोकशाही

अब्राहम लिंकनने लोकशाही ही एक आधुनिक काळातील एक राजकीय विचारप्रणाली म्हणून संकल्पनात्मक दृष्टीने विचार मांडला. त्याच्या मते "लोकांचे, लोकांकडून व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय." वरील व्याख्येतील तीन पैलूंपैकी लोकांकडून (By the People) हा घटक महत्त्वाचा आहे. लोक स्वतःच राज्यकर्ते असतात. या स्पष्टकरणाविषयीच्या अनेक समस्या आहेत. प्राथमिकता या राज्यकर्ते आणि शासनकर्ते असतात. यामध्ये भेद नाही. दुसरे म्हणजे लोक स्वत:च राज्यकर्ते असतील तर तेथे राजकीय पक्ष असणार नाहीत. तिसरा मुद्दा म्हणजे शासन आणि नागरी समाज (Civil Society) यातही भेद नव्हे. निर्णायक मुद्यानुसार कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या कार्यामध्ये विभक्तपणा नाही. कारण त्यांचे लोक प्रशासनावर नियंत्रण असते.

लोकशाहीचा अन्वयार्थ हा अभिजात (Classical) दृष्टीने घेतला तर त्याचा अर्थ प्रत्यक्ष लोकशाही होय. प्राचीन ग्रीसदेशात छोटी नगरराज्ये होती. त्या नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. प्रत्यक्ष लोकशाहीत व्यक्तिशः सर्व लोक राजकीय धोरणे, शासनसंबंधीचे निर्णयात सहभागी होतात. नगरराज्यात राजकीय अधिकार असणाऱ्यांची संख्या लहान असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष निवडणुकीचा हक्क असतो किंवा हे लोक शासनकर्त्यांना पदच्युतही करतात. प्रत्यक्ष लोकशाहीत ही गोष्ट चांगली असली तरी काही समस्या निर्माण होतात. आधुनिक काळात प्रत्यक्ष लोकशाही व्यवहार्य नाही कारण लोकसंख्या अधिक वाढल्यामुळे लोक राजकीय समस्येविषयी अनभिज्ञ असतात. ते त्यांच्याविषयी स्वतः जागृत किंवा शिक्षित नसतात. लोकशाही प्रक्रियेतील हा एक अडथळा म्हणावा लागेल. प्रत्यक्ष लोकशाहीच्या ह्या समस्या आहेत. म्हणूनच आपण उदारमतवादी (Liberal) लोकशाहीला मान्यता देतो. ही प्रत्यक्ष लोकशाही म्हणून संबोधली जाते. या लोकशाहीत स्वभाविकत: लोकांना प्रतिनिधीत्व असते. लोक प्रतिनिधींमार्फत शासनकर्त्यांना निवडून देतात. हे प्रतिनिधी धोरणे ठरविणारी असतात, व प्रतिनिधी लोकांना जबाबदार असतात. म्हणून ही अप्रत्यक्ष लोकशाही आहे. अप्रत्यक्ष लोकशाही ही डॉ प्रकारची असून संसदीय लोकशाही लोकप्रतिनिधी बहुमताच्या जोरावर सत्ता काबीज करून, बहुमताच्या जोरावर अल्पसंख्याकांवर दादागिरी न करता लोकशाही शासन व्यवस्थेत त्यांना खास अधिकार दिलेले असतात.

**आपली प्रगती तपासा**

१. लोकशाहीचे प्रकार स्पष्ट करा.

## १.९ लोकशाहीचे आदर्श

लोकशाही अनेक आदर्श आहेत काही आदर्श म्हणून १) जनतेचा सहभाग, २) समता ३)जबाबदारी ४) सत्तेचे विभाजन ५) नागरी स्वातंत्र्य ६) बंधुभाव ७)न्याय इ. आदर्श आहेत. लोकशाहीची स्वातंत्र्य, समता, बंधुभाव व न्याय ही मुल्ये म्हणूनही ओळखली जातात. वरील दिलेल्या आदर्शाची व्याप्ती व विस्तार विविध प्रकारचा असून लोकशाहीतप्रणीत राज्यांमध्ये ती भिन्नभिन्न प्रकारची असतात. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. लोकशाहीमध्ये लोक एक तर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या निर्णयप्रक्रियेत सहभागी होतात. या प्रक्रियेत कोन अंतर्भूत असतात ? कोन निर्णय घेतात आणि निर्णय काय होतात ? हे सर्व लोकशाही मार्गाने होत असतात याचे समर्थन दोन प्रकारांनी करता येते.

**१) साधनात्मक समर्थन**

**२) साध्यत्मक समर्थन**

**१) साधनात्मक समर्थन -** हे लोकशाही निर्मितीच्या अंतिम निष्पत्तीवर लक्ष केंद्रित करते. ते योग्य कायद्यांविषयी आणि धोरणांविषयी बोलतात कि ज्याचे सकारात्मक परिणाम व्यक्तिच्या चारित्र्यावर पडतात. कायदे व धोरणे निर्णयाप्रत आणण्याकरिता अनेक लोक एकत्र बसून किंवा चर्चेद्वारे आणि लोकांच्या प्रतिक्रिया मागवून त्याद्वारे निर्णय

घेतले जातात. त्याचा सकारात्मक परिणाम चारित्र्यावर होतो. व्यक्तीनिरपेक्ष ध्येय, सामुहिकता किंवा ऐक्यता आणि देशभक्ती यांना उत्तेजन देणे, पुष्कळ वेळा अनेकांच्या मनात एकत्र काम करताना काही समस्या या परिस्थितीजन्य कारणामुळे तयार होतात. त्याचा परिणाम लोकशाहीच्या निष्पत्तीवर होऊन ती अधिक गुंतागुंतीची होते. सर्व लोकप्रतिनिधी हे राज्याकरिता किंवा देशाकरिता बौद्धिकदृष्ट्या वैचारिक तयारीचे आणि योग्य निर्णय घेणारे असतीलच असे नाही.

**२) सध्यात्मक समर्थन -** हे लोकशाहीमधील अंतिम निर्णय साध्य होण्यावर लक्ष केंद्रित करते. या प्रक्रियेत काही मूल्य अंतर्भूत होतात. जसे राजकीय स्वातंत्र्य, आत्म-वास्तविकीकरण, समता, सामुहिक ऐक्य इ. राजकीय स्वातंत्र्य म्हणजे स्वयंशासित स्वातंत्र्य होय. याचा अर्थ कोणावरही सत्ता गाजविणे किंवा निर्दयपणे हुकूमत चालविणे नव्हे. राजकीय सहभागाद्वारे मानवी मूल्य म्हणून आत्मवास्तविकीकरण (Self-realisation) संपादित करावयाचे असते. हेच लोकशाहीत महत्त्वाचे असते. या मूळ संकल्पनेवरच ॲरिस्टॉटलने प्रामुख्याने भर दिला आहे. विचार व निर्णयप्रक्रिया वा साधकबाधक गोष्टींची चर्चा हे मानवाचे प्रमुख वैशिष्टय आहे. लोकशाहीत सर्व लोकांना राजकीय कल्याण साध्य करण्यासाठी व सहभागी होण्याची समान संधी दिलेली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) लोकशाहीचे आदर्श कोणते आहेत?

२) लोकशाहीबद्दल केले जाणाऱ्या दोन प्रकारच्या समर्थनाचे वर्णन करा.

## १.१० लोकशाहीचे गुण (फायदे) व दोष (तोटे)

लोकशाहीएक राजकीय विचारप्रणाली आहे. ती समतेच्या तत्त्वाची शाश्वती देते. प्रत्येकाला समतेचा हक्क दिलेला आहे. मतदानाचा अधिकार दिलेला आहे. आज या लोकशाही शासनव्यवस्थेविषयी कौतुक होत असले तरी तिचे काही गुण (फायदे) व दोष (तोटे) आहेत.

### १.१०.१ लोकशाहीचे गुण :

१) **समानता :** लोकशाहीत सर्वांना संधीची समानता, कायद्याचे समान रक्षण, धर्म, जात, पंथ, वंश यावर आधारित भेदभाव केलेला नसतो. कोणावरही अन्याय होणार नाही याची खात्री दिलेली असते.

२) **स्वातंत्र्य :** लोकशाहीत प्रत्येकाला विचार, अविष्कार, उच्च्चार स्वातंत्र्य, दिलेले असते. त्याचप्रमाणे धार्मिक स्वातंत्र्य, नोकरी वा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, देशात कोठेही जाण्याचे व स्थानिक होण्याचे स्वातंत्र्य दिलेले असते.

३) **स्थैर्य :** लोकशाहीत बहुमत असलेल्या पक्षाकडे सत्ता असते. बहुमतातील राजकीय पक्षाकडे सत्ता आल्यास त्यांना स्थैर्य प्राप्त होते. कारण शासनाच्या मागे बहुसंख्य समाज असतो.

४) **संवेदनशील सरकार :** लोकशाहीत सरकार मतदारांना जबाबदार असतेच. त्याचप्रमाणे समाजात वेळोवेळी होणाऱ्या बदलांबद्दल संवेदनशील असावे लागते.

५) **सर्वांची प्रगती :** आज जगात सर्व लोकशाही देशात कल्याणकारी शासन ही संकल्पना मान्य झालेली आहे. याचा व्यावहारिक अर्थ म्हणजे शासन सर्वांची प्रगती साधण्यास वचनबद्ध आहे.

६) **जागतिक शांतता :** लोकशाहीत शांततापूर्ण सहजीवन खूप महत्त्वाचे आहे. लोकशाहीत राष्ट्रे ही जागतिक शांततेसाठी प्रयत्नशील असतात.

**१.१०.२ लोकशाहीचे दोष (तोटे) :**

१) **मूठभरांच्या हातात सत्ता :** लोकशाहीत बहुसंख्याक असलेल्या पक्षाची सत्ता असते. एखाद्या राजकीय पक्षाचा अभ्यास केला तर साऱ्या पक्षाची सत्ता ही ज्येष्ठ नेत्याच्या हातात एकवटलेली दिसून येते. अर्थात ही परिस्थिती लोकशाहीत धोक्याची आहे. कारण राजकीय नेते स्वतः ला हव्या त्या गोष्टी करू पाहतात.

२) **अज्ञानी वर्गाची सत्ता :** लोकशाहीत अज्ञानी लोक निवडणुकीला उभे राहून तेथील जनता त्याला आपला प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. अशा नेत्याला शासकीय कारभारातील गुंतागुंत समजत नाही. राजकारणात बेताचा रस असतो. स्वतः हून त्यांची बौद्धिक कुवत विकसित झालेली नसते.

३) **अकार्यक्षमता :** लोकशाहीत निवडून येणारे शासनकर्ते कर्तबगार व त्वरित निर्णय घेणारे असतीलच असे नाही. वादविवाद चर्चा इ. महत्त्वाच्या गोष्टीद्वारे निर्णय घेण्यास विलंब लागतो. साधे निर्णय घेण्याला वेळ जातो. परिणामी अकार्यक्षमता वाढते.

४) **भ्रष्टाचार :** राजकारणी नेत्याच्या हातात सत्ता गेल्यावर तो जनतेची दिशाभूल व पिळवणूक करतो. तसेच प्रशासकीय यंत्रणेत कमीअधिक प्रमाणात भ्रष्टाचार आढळतो. लोकशाहीत निवडणुका लढविणे खर्चिक झाले आहे. परिणामी प्रत्येक राजकीय पक्षाला भ्रष्टमार्गाचा वापर करावा लागतो. कारण निवडणुका वरचेवर घ्यावा लागतात व त्या अधिक खर्चिक झाल्या आहेत. हिटलरने तर लोकशाहीला मूर्ख, भ्रष्टाचारी व मुग्यांच्या पावलाने चालणारी शासनपद्धती होय असे म्हटले आहे.

५) **समतेचे अव्यवहार्य तत्त्व :** लोकशाहीत समतेचे तत्त्व बुद्धिला न पटणारे व अव्यवहार्य आहे. त्यामुळे समतेच्या तत्त्वाची पातळी खालावत चालली दिसते. प्रचाराच्यावेळी जनतेच्या मनात असुरक्षितता निर्माण करतात. लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी नैतिक विचारांना व मूल्यांना बाजूला ठेवले जाते.

६) **पक्षशिस्तीचा बडगा :** स्वतंत्र विचारशक्ती ही पक्षशिस्तीच्या बडग्यामुळे मागे पडते. अशा परिस्थितीत लोकशाही ही केवळ तांत्रिक स्वरुपाची असते. असे टीकाकारांचे म्हणणे आहे. लोकशाहीत धनिकच निवडणुका लढवतात व निवडून आल्यावर आपल्या वर्गाला सोयीचे असे कायदे करतात. शासन चालविण्याचे काम तांत्रिक

स्वरूपाचे व किचकट असते. लोकप्रतिनिधी हे हस्तक्षेप करतात व शासकीय कामकाज धीम्यागतीने होते.

वर उल्लेख केलेले लोकशाहीचे गुण-दोष (फायदे-तोटे) यांची चर्चा केली. लोकशाहीत काही दोष वा तोटे असल्यास लोकशाही फेकून द्या व त्या ऐवजी हुकुमशाही, लष्करशाही वा अन्य राजकीय विचारप्रणाली आणा असा त्याचा अर्थ नव्हे, लोकशाहीतील दोष वा तोटे कमी करत जाणे हे आपले उद्दिष्ट असावे.

**आपली प्रगती तपासा**

१) लोकशाहीचे गुण दोष सांगा.

**राष्ट्रवाद :** राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यांवर निष्ठ ठेवणारी आधुनिक राजकीय विचारप्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद. एकोणिसाव्या शतकापासून युरोपच्या इतिहासाला दिशा देणारी एक प्रमुख प्रेरणा म्हणून राष्ट्रवादाचा निर्देश करता येईल. हेच ऐतिहासिक कार्य राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात आशिया खंडात आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आफ्रिका खंडात पार पाडले आहे. एक राजकीय विचारप्रणाली या अर्थाने राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि एकता कायम राखणे, ही स्वयंसिद्ध नैतिक भूमिका होय. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या म्हणजेच राष्ट्रीय स्वातंत्र्याचा हक्काचा पुरस्कार करणे, हे व्यक्तीस्वातंत्र्याच्या संकल्पनेचे सामुहिक राष्ट्रीय रूप होय. उदारमतवादानेच हे भिन्न पातळ्यांवरील आविष्कार होत. विकासोन्मुख आणि न्यायाधिष्ठित समाजरचना निर्माण करणे आणि जागतिक शांतता व सहकार्य साध्य करणे, ही उद्दिष्टये साध्य करावयाची असतील, तर व्यक्तिस्वातंत्र्यास पूरक असलेल्या राष्ट्रस्वातंत्र्याचा आग्रह धरावयास हवा, अशी उदारमतवादाची भूमिका आहे. जॉन स्ट्यूअर्ट मिल, जोसेफ मॅझिनी, वुड्रो विल्सन यांनी तिचे सातत्याने समर्थन केले परंतु दोन महायुद्धांदरम्यानच्या कालखंडात राष्ट्रवादाची अतिरेकी, भ्रष्ट आणि विकृत कल्पना फॅसिझम आणि नाझीवाद यांच्या रूपाने फोफावली. दुसऱ्या महायुद्धात या शक्तींचा बिमोड होऊन राष्ट्रवादाच्या संकल्पनेस लागलेले ग्रहण सुटले व महायुद्धोत्तर काळात आशिया-आफ्रिका खंडात राष्ट्रवादाने एक स्वातंत्र्यवादी आणि पुरोगामी प्रेरणा या भूमिकेत ऐतिहासिक कार्य बजावले. प्रगत औद्योगिक समाजात राष्ट्रवादी प्रेरणेचा भर काहीसा ओसरला असला, तरी नवजात राष्ट्रांमध्ये मात्र अंतर्गत आणि बाह्य विघटनवादी शक्तींचे आव्हान पेलणारी एक विकासोन्मुख आणि लोकशाहीवादी प्रेरणा, म्हणून राष्ट्रवादाचे ऐतिहासिक कार्य संपलेले नाही. राष्ट्रवाद या संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी विविध दृष्टिकोनांतून तिच्याकडे पाहणे आवश्यक ठरते.

**तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन :** तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहता राष्ट्रवाद या संकल्पनेचे मूळ कांट (१७२४-१८०४) या जर्मन तत्त्वज्ञापर्यंत पोहोचते. शाश्वत नीतिमूल्यांच्या निकाषांविषयी त्याने असे प्रतिपादन केले, की नीतिचे उगमस्थान प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनातच असते. व्यक्तींच्या आशा-आकांक्षांना नैतिक आशय प्राप्त होतो, तो कोणा बाह्य प्रेरणांच्या प्रभावामुळे नव्हे, तर त्या व्यक्तीचा आपल्याच जन्मजात प्रवृत्तींच्या विरोधी जो संघर्ष चालू असतो, त्याचा तो परिपाक असतो. नैतिक अर्थाने प्रत्येक व्यक्ती

स्वायत्त असते. व्यक्तींची स्वतःची अनुभूती हीच नीतिमूल्यांची जननी आहे. म्हणून अनुभूती घेण्याचे स्वातंत्र्य हे नैतिक जीवनाचे अधिष्ठान आहे.

कांटच्या या प्रतिपादनामुळे व्यक्ती ही धर्म आणि समाज यांच्या विघातक बंधनातून तत्त्वतः मुक्त झाली हे खरे पण या सर्व स्वायत्त व्यक्तींना एकत्र जोडणारा कोणताही तात्त्विक दुवा अस्तित्वात नसेल, तर सुसंघटीत आणि अर्थपूर्ण समाजजीवन निर्माण होऊ शकणार नाही. ही गोष्ट राष्ट्र या संकल्पनेमुळे शक्य झाली. व्यक्तीजीवनाची राष्ट्रजीवनाशी सैद्धांतिक सांगड घालण्याचे कार्य योहान फिक्ते (१७६२-१८१४) या दुसऱ्या जर्मन तत्त्वज्ञाने केले. फिक्तेच्या मते मानवी संस्कृती ही आपाततः घडलेली घटना नसून ती एका चिरंतन वैश्विक शक्तीचा आविष्कार होय आणि याच विश्वशक्तीने राष्ट्र हा समूहजीवनाचा मूलाधार म्हणून निश्चित केला आहे. साहजिकच व्यक्तीस समृद्ध नैतिक जीवन जगण्याची संधी आणि स्वातंत्र्य राष्ट्रजीवनाशी तादात्म्य पावल्यानेच प्राप्त होते आणि म्हणून राष्ट्र ही समूहजीवनाशी श्रेष्ठतम व स्वयंसिद्ध सीमा आहे. व्यक्तीच्या सर्वोच्च निष्ठांची ती स्वामिनी आहे.

**समाजशास्त्रीय दृष्टिकोन :** समाजशास्त्रीय दृष्टिकोनान्वये राष्ट्र हा आधुनिकीकरणाच्या इहवादी प्रभावी प्रेरणांना मिळालेला राजकीय प्रतिसाद आहे. एखाद्या समाजात आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु होते, याचा अर्थ त्या समाजाची एकसंधता नष्ट होते. पारंपारिक समाजामध्ये व्यक्ती आपल्या सामाजिक भूमिका व्यक्तिगत पातळीवरच हाताळीत असतात, समूहजीवनाच्या कक्षा संकुचित असतात. लोकांचे आर्थिक राहणीमान तुटपुंजे असते, तंत्रज्ञानाची पातळी निकृष्ट दर्जाची असते आणि नफ्यासाठी उत्पादन हे समाजमूल्य नसते. अशा समाजात समाजजीवनाचे नियमन करण्यासाठी आवश्यक असलेली अनेकविध कार्ये एकमेकांपासून शास्त्रीय पद्धतीने विलग केलेली नसतात. म्हणून त्यामध्ये वस्तुनिष्ठता नसते. याउलट आधुनिक समाजातील सामाजिक व्यवहार व्यक्तीनिरपेक्ष पातळीवरून हाताळले जातात, कार्यांचे एकमेकांपासून पद्धतशीरपणे आणि काटेकोर विलगीकरण केले जाते, व्यक्तींचे एकमेकांशी संबंध कार्यांच्या संदर्भात ठरतात व म्हणून ते निर्वाणीचे नसतात. आधुनिक समाज हा प्रगत तंत्रज्ञानावर आधारित आणि उद्योगप्रधान असतो.

आधुनिकीकरणाच्या या प्रक्रियेत एकमेकांविषयीच्या व्यक्तिगत विश्वासावर आधारित परंपरागत राजकीय संबंध निष्प्रभ होतात व त्यामुळे सामाजिक पोकळी निर्माण होते. परिणामी एकाकीपणा, सांशकता, अस्थिरता आणि असुरक्षितता या भावनांनी सर्व व्यक्ती व्यग्र होतात. त्यांच्या सवोच्च निष्ठा ज्याला अर्पण करून निश्चित होता येईल, अशा नव्या स्वरूपातील समाजपुरुषाची गरज त्यांना भासू लागते. राष्ट्राच्या रूपाने हा नाव समाजपुरुष त्यांना सामोरा येतो. हा राष्ट्रपुरुष त्यांच्या जीवनास स्थैर्य आणि त्यांना सामोरा येतो. हा राष्ट्रपुरुष त्यांच्या जीवनास स्थैर्य आणि शाश्वती देतो. राष्ट्र या संकल्पनेचे एक प्रमुख सामाजिक मानसशास्त्रीय स्पष्टीकरण असे आहे.

**वसाहतवाद आणि राष्ट्रवाद :** काही मार्क्सवादी अभ्यासकांच्या मते राष्ट्रवाद ही केवळ वसाहतवादविरोधी प्रतिक्रिया आहे. या दृष्टिकोनातून वसाहतवादी परकी सत्तेने

लादलेल्या जुलमी व अपमानास्पद अंमलाविरोधी निर्माण झालेली राजकीय चळवळ म्हणजे राष्ट्रवाद होय. परकीय अंमलामुळे राष्ट्रास आत्मभान निर्माण होण्यास मदत होते हे खरे असले, तरी राष्ट्रवादाचे जनकत्व वसाहतवादाशी जोडणे जसे चूक आहे, त्याप्रमाणे राष्ट्रवादाचा अर्थान्वय केवळ वसाहतवादाच्या संदर्भात स्पष्ट करण्याचा प्रयत्नही चूक आहे. तसे करणे म्हणजे वसाहतवादाचा अनुभव नसलेल्या समाजामध्ये राष्ट्रनिर्मितीची क्षमता नाकारणे होय.

**मार्क्सवादी आणि राष्ट्रवाद :** मार्क्स, लेनिन आणि स्टालिन या तिघांनीही अशी सैद्धातिंक भूमिका घेतली की राष्ट्रवाद व भांडवलशाही समाजव्यवस्था ही एकाच संस्थेशी दोन रूपे आहेत. 'कामगारांना पितृभूमी नसते,' हे मार्क्सचे वचन प्रसिद्ध आहे. याचा अर्थ असा समजता येईल की जोपर्यंत कामगारांचे समाजातील स्थान आर्थिक व राजकीय दास्याचे आहेत, तोपर्यंत त्यांच्यामध्ये राष्ट्रनिष्ठेची भावना निर्माण होणे अशक्य आहे आणि हे दास्य संपुष्टात आले की राष्ट्रवादाचा राजकीय पायाच नष्ट होतो. दरम्यानच्या काळात कामगारांच्या निष्ठांचा केंद्रबिंदू आंतरराष्ट्रीय श्रमजीवीवर्गहा असतो. लॉर्ड ॲक्टनसारख्या मार्क्सच्या समकालीन असलेल्या बिगर मार्क्सवादी टीकाकाराने राष्ट्र-संकल्पनेविषयी 'राष्ट्राचा सिद्धांत म्हणजे इतिहासाची पीछेहाट होय,' अशी जी एकांगी भूमिका घेतली, तशी मार्क्सवादी विचारात आढळत नाही. राष्ट्र या संकल्पनेत बजावलेल्या प्रागतिक कामगिरीची योग्य ती दखल मार्क्सवादाने घेतली आहे. एंगेल्सने म्हटले आहे की,'आंतरराष्ट्रीय कामगार क्रांती घडून येण्यासाठी परकी सत्तेच्या दास्यात असलेल्या समाजांना स्वातंत्र्य प्राप्त होऊन त्यांची स्वतंत्र्य राष्ट्रे होणे आवश्यक आहे,' खूद्द भांडवलशाही समाजांचा विचार करतानादेखील असे लक्षात येते की भांडवलशाहीच्या सुरुवातीच्या कालखंडातील राष्ट्रवादाचे कार्य पुरोगामी स्वरूपानेच आहे. लेनिनने राष्ट्रवादाचे तीन ऐतिहासिक कालखंड मानले आहेत. : पहिला कालखंड (१७८९-१८७१) हा भांडवलदार वर्गाच्या उन्नयनाचा कालखंड होता. या कालखंडात भांडवलशाही प्रेरणा या एका अर्थाने पुरोगामी होत्या कारण त्यांनी कालबाह्य अशा मध्ययुगीन सरंजामशाही शृंखला तोडून इतिहासाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला. या ऐतिहासिक कार्यामध्ये राष्ट्रवादाने भांडवलशाहीस मोलाची साथ दिली. दुसऱ्या प्रभुत्व प्रस्थापित झाले पण त्याचबरोबर भांडवलदार वर्ग पुरोगामी भूमिकेपासून दूर जात प्रतिगामी बनला. हा साम्राज्यवादी कालखंड होय. या कालखंडात भांडवलशाही राष्ट्रांनी अवलंबिलेले साम्राज्यवादी धोरण म्हणजे राष्ट्रवादाचे विकृत स्वरूप होय. या नंतरच्या तिसऱ्या कालखंडात साम्राज्यवादी राष्ट्रांमधील संघर्ष अतिशय तीव्र होईल, असे भाकीत लेनिनने केले.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका खंडात साम्राज्यवादी शक्तींशी मुकाबला करण्याची जबाबदारी राष्टवादावर पडली. मार्क्सवादाने या परिस्थितीचा योग्य ती दखल घेतली आहे. आंतरराष्ट्रीय संदर्भात मुक्त अगर मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारलेल्या नवजात आशियाई - आफ्रिकी राष्ट्रांतील सत्तारूढ वर्गाचे मुल्यमापन करताना मार्क्सवादी विवेचनात, ज्या नवजात राष्ट्रांची आर्थिक धोरणे साम्राज्यवादास पूरक आहेत, त्यांची संभावना साम्राज्यवादाचे हस्तक अशी होते परंतु ज्या राष्ट्रांची आर्थिक धोरणे पूर्णतः

राष्ट्रीय हितावर आधारित असतात, आर्थिक स्वयंपूर्णता हे ज्यांच्या अर्थव्यवस्थेचे ध्येय असते व परकीय भांडवलशाही शक्तींशी ज्यांचे संबंध स्पर्धात्मक असतात, अशी राष्ट्रे भांडवलशाही स्वरुपाची असली, तरी राष्ट्रवादी आणि म्हणून साम्राज्यवादविरोधी असल्यामुळे त्यांचा उल्लेख राष्ट्रवादी भांडवलदारवर्ग, असा पुरोगामी अर्थाने करण्यात येतो.

**विश्वबंधुत्व :** मानवतावादी दृष्टिकोणातून विकसित झालेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व (किंवा विश्वबंधुत्व) या तत्त्वत्रयींपैकी एक संकल्पना. → फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात (सु. १७८९-99) स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या संकल्पनांचा उदघोष करण्यात आला. स्वातंत्र्यामध्ये विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेचा हक्क इ. गोष्टी अभिप्रेत होत्या. समतेमध्ये सरदार वर्गाचे खास अधिकार संपुष्टात आणून, सर्व नागरिकांस वर्गनिरपेक्ष समान संधी देणे व कायद्याबाबत समानता या गोष्टी अंतर्भूत होत्या. जगामध्ये स्वातंत्र्य व समता यांवर विश्वास असणारे व ती तत्वे अंमलात आणण्यासाठी झगडणारे सर्व लोक, मग ते कोणत्याही देशातील असोत, ते एकमेकांचे बंधू आहेत. ही संकल्पना म्हणजे विश्वबंधुत्व होय. प्राचीन ग्रीसमध्ये प्रथमतः स्टोइक तत्त्वज्ञांनी विश्वबंधुतवाची कल्पना मांडली. विवेक हा सर्व माणसांना जोडणारा दुवा असून सर्वांना समान असणाऱ्या कायद्यावर आधारलेले विश्वराज्य स्थापन करावे, असे विचार त्यांनी मांडले. ख्रिस्ती व इस्लाम धर्मांत विश्वबंधुत्वाची भावना, आपण सर्व देवाची लेकरे असून एकमेकांचे भाऊ आहोत, या विचारांतून प्रकट झाली होती. धर्मसुधारणेच्या काळात सुधारणावादी धर्मपंथांनी विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करून हे जग ईश्वराने निर्माण केले आहे आणि आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत, असा विचार मांडला. देववादी (डीइस्ट) विचारवंतांनी धर्मसहिष्णुतेचा पुरस्कार करून असे सांगितले, की ईश्वराच्या प्राप्तीसाठी केवळ आपल्याच धर्माचा मार्ग योग्य आहे, असा आग्रह धरणे बरोबर नाही. युरोपमध्ये सतराव्या शतकात विश्वबंधुत्वाची कल्पना नैसर्गिक अधिकारांच्या संदर्भात मांडण्यात आली. ईश्वरापुढे जर सर्व मनसे समान आहेत तर व्यवहारातही ती समान असली पाहिजेत, असा या विचारवंतांचा आग्रह होता. सर्व माणसांना नैसर्गिक अधिकार जन्मतःच प्राप्त झाले आहेत, म्हणून ते समान आहेत, असे त्यांचे मत होते. [→ नैसर्गिक कायदा].

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धातील (१७७५-८३) वसाहतवाल्या→ क्रांतिकारकांनी अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा (१७७६) घोषित केला. या जाहीरनाम्यात त्यांनी सर्वाच्या समान अधिकारांचा पुरस्कार केला. फ्रान्समध्ये त्या काळात मोठे वैचारिक मंथन झाले. ⇨ व्हॉल्तेअर (१६९४-१७७८) वगैरे विचारवंतानी धर्मसहिष्णुतेचा आणि बंधूभावाचा विचार मांडला. फ्रेंच क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या तत्टत्रयीची घोषणा केली. जगात समता, स्वातंत्र आणि विश्वबंधुत्वाचा कल्पनेवर विश्वास ठेवणारी माणसे एकमोकाचं बंधू आहेत. धर्म, जात, वंश, भाषा आणि प्रदेश यांत भेद असला, तरी आपणा सर्वांमध्ये बंधुत्वाचा समान धागा आहे, असा विचार यामागे होता. फ्रेंच राष्ट्रीय सभेच्या जाहीरनाम्यात मानवी अधिकारांचा आणि विश्वबंधुत्वाचापुरस्कार करण्यात आला. फ्रेंच राज्यक्रांतिकारक आंतरराष्ट्रीय बंधुभावाचा पुरस्कार करणारे होते.

त्यामुळे क्रांतीच्या काळात फ्रेंच क्रांतिकारक लफाएत याने बॅस्तीलच्या किल्ला अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यास देण्यासाठी इंग्लिश क्रांतिकारक टॉमस पेनच्या हवाली केल्या. टॉमस पेन आणि इंग्लिश तत्वज्ञ जेरेमी बेंथॅम यांना फ्रान्सने नागरिकत्वाचे हक्क बहाल केले. फ्रेंच क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय बंधुभावाचा पुरस्कार कम्युनिस्ट क्रांतिकारकांनी केला. १९१७ च्या बोल्शेव्हिक क्रांतीनंतर जागतिक कम्युनिस्ट चळवळीने सर्व कष्टकरी वर्गासाठी वैश्विक बंधुभावाची कल्पना मंडळी.

स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या कल्पना परस्परांशी संबंधित आहेत. स्वातंत्र्यात व्यक्तीच्या अधिकारास आणि विकासास महत्व देण्यात आले आहे. समतेमध्ये सर्वांना सार्वजनिक आणि खाजगी जीवनात समानतेने वागवणे अभिप्रेत आहे. विश्वबंधुत्वात सामाजिक ऐक्य आणि एकात्मता यांस महत्व देण्यात आले आहे. आपल्याजवळ असणाऱ्या साधनांचा सर्वांच्या समवेत उपभोग घेणे, त्याचे आपापसांत योग्य वाटप करणे आणि त्या द्वारा समाजाचा समतोल विकास घडवून आणणे विश्वबंधुत्वात अभिप्रेत आहे. व्यक्तिगत स्वार्थाचा संकोच व परहितदक्षता हे त्यामागील तत्व आहे. विश्वबंधुत्वात परस्पर-साहाय्य, परस्पर-सहकार्य आणि ऐक्यभाव अंतर्भूत आहे. विश्वबंधुत्व ही भावात्मक कल्पना आहे आणि स्वातंत्र्य व समता या संकल्पनांना सामुदायिक अर्थ आणि अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य ती करते. ज्या समाजात स्वातंत्र्य आणि समता प्रस्थापित होते, त्याच समाजात विश्वबंधुत्व प्रासृत होते.

भारतामध्ये प्राचीन काळापासूनच बंधुत्व वा भ्रातृभाव समाजात रुजविण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न झाले. मुख्यत्वे संतांच्या कृतिउक्तीतून ही बंधुत्वाची प्रेरणा समाजाला मिळत गेली. वारकरी संप्रदायाचा या संदर्भात आवर्जून उल्लेख करावा लागेल. संतांच्या अभंगवाणीतून प्रकटणारी बंधुत्वाची भावना ही मुख्यत्वे आध्यात्मिक पातळीवरची होती. त्या दृष्टीने प्राचीन भक्तिसंप्रदाय व संतांचे वाङ्मय विशेष लक्षणीय आहे. आधुनिक काळात महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले प्रभृती समाजसुधारकांनी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी महान कार्य केले. महात्मा फुले यांनी विश्वबंधुत्वाचा पुरस्कार करताना असे सांगितले, की प्रत्येक माणसाने श्रम करून भाकर मिळवावी. एकमेकाच्या अधिकारांची बूज राखून 'भावूपणा' निर्माण करावा. एकाच कुटुंबातील माणसांनी वेगवेगळ्या धर्मांचे पालन केले तरी हरकत नाही. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या तीन संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात व्यक्तीची आत्मप्रतिष्ठा जपणारी, राष्ट्राचे ऐक्य आणि एकात्मता यांस सबळ करणारी विश्वबंधुत्वाची भावना वृद्धिंगत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

समाजातील बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने अमेरिका व ग्रेट ब्रिटन येथे अठराव्या - एकोणिसाव्या शतकांत काही सामाजिक बंधुत्व -संघटना (फ्रॅटर्नल सोसायटीज) उदयास आल्या. समान हितसंबंध वा एकच व्यवसाय हा त्यांच्या सभासदांच्या एकत्र येण्यातील सामाजिक घटक होता. या संघटना बहुतांशी खाजगी, स्वयंसेवी, ना-नफा धर्तीच्या असत. त्यांच्या सदस्यांमध्ये परस्पर स्नेहभाव व एकोपा वाढीस लागावा ही भूमिका त्यांच्या स्थापनेमागे मुख्यत्वे होती. काही राष्ट्रीय पातळीवरच्या संघटनाही निर्माण

झाल्या. या संघटनांच्या सदस्यांना प्रसंगी आर्थिक साहाय्य देण्याची तरतूदही होती. अपघात, वृद्धत्व, आजारपण, मृत्यू अशा प्रसंगी हे आर्थिक साहाय्य दिले जात असे. त्यासाठी सामुदायिक परस्पराश्रयी विमापद्धती अवलंबली जात असे व त्यात प्रत्येक सदस्याला ठराविक विमाहप्ता नियमित भरावा लागत असे. सदस्यांच्या परस्परबंधुत्वावर अधिष्ठित अशा काही गुप्त संघटनाही अस्तित्वात आल्या आणि काही अजूनही कार्यरत आहेत. उदा., → फ्रीमेसनरी ही गुप्त संघटना. पूर्वी विमापद्धतीद्वारे अर्थसाहाय्य देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या अनेक संघटना विमाकंपन्यांच्या व्यावसायिक विस्ताराबरोबरच नामशेष झाल्या. काही संघटना धर्मादाय संस्था वा सामाजिक केंद्रे या स्वरुपात अस्तित्व टिकवून आहेत. काही सेवाभावी संघटना वेगवेगळ्या ज्ञानशाखांमध्ये विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्या आयोजित करण्याचे कार्य करतात तर काही केवळ रंजनमंडळाच्या (क्लब) स्वरूपाच्या आहेत.

अमेरिकेत महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरावरच्या युवकांच्या बंधुत्व -संघटना (फॅटर्निटीज) अठराव्या -एकोणिसाव्या शतकांत निर्माण झाल्या. ग्रीक आद्याक्षरांनी युक्त अशी नावे या संघटनांना दिली जात. उदा., 'कॉलेज ऑफ विल्यम अँड मेरी' विल्यम्सबर्ग, (व्हर्जिनिया) येथे १७७६ मध्ये स्थापना झालेली 'फी वीटा कॅपा' ही संघटना. तसेच 'युनियन कॉलेज', स्कनेक्टडी, (न्युयॉर्क) येथे १८२५ मध्ये स्थापन झालेली व अद्यापही अस्तित्व टिकवून असलेली 'कॅपा आल्फा' ही संघटना. या नावांमुळे अशा संघटनांना 'ग्रीक लेटर सोसायटीज' असेही म्हणत. कॉलेज युवतींच्या अशा भगिनी- संघटनांना 'सोरोरिटीज' ही संज्ञा' होती. बंधुसाठी 'फ्रॅटर' व भगिनी'सोरोर' असे लॅटिन व सोरोरिटी या संज्ञा आल्या. शिक्षणानिमित्त कुटुंबापासून दूर राहिलेल्या मुलांना घरगुती वातावरणात मिळवून देणे, हाही उद्देश अशा संघटनांमागे होता. त्यासाठी एखादे 'घर' वा सामुदायिक निवासस्थान मुक्रर केले जाते, तिथे सर्व सदस्य एकत्र येऊ शकतात, तसेच सामाजिक उपक्रम चालवू शकतात.

विश्वबंधुत्वाची संकल्पना समष्टिवादी आहे. पूर्वीच्या काळी वैश्विक विश्वबंधुत्वाची संकल्पना समष्टिवादी आहे. पूर्वीच्या काळी वैश्विक बंधुभावाला धार्मिक अधिष्ठान होत. त्याकाळी व्यक्ती वैयक्तिक रीत्या ईश्वराची उपासना समष्टीच्या कल्याणार्थ करीत असे. आधुनिक काळात ऐहिक पायावर विश्वबंधुत्वाची मांडणी करीत असताना, व्यक्तीने सामुहिक लोकसंग्रहासाठी आपले व्यक्तीमत्व समूहात पूर्ण विलीन करावे, असा विचार मांडला जातो. त्यामुळे व्यक्ती संकुचित स्वार्थाऐवजी परहितार्थ उच्चतर ध्येयांच्या विचारांनी प्रेरीत होते. आज संज्ञापनाच्या नवनव्या साधनांमुळे समान विचारांनी प्रेरित झालेल्या समूहांच्या भावना उद्दीपित करून त्यांना जागृत अतिरेकी समूहवादी बनविणे सोपे झाले आहे. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तिविशिष्टता यांचा लोप होण्याची शक्यता असते. म्हणून व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व यांत योग्य असा समतोल प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**समाजवाद :** संपत्तीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेवून सर्वांना समान मानणारी व संपत्तीचे न्याय वितरण करून सर्वांना एकाच समान पातळीवर आणणारी विचारप्रणाली. उत्पादन, विभाजन आणि विनिमय यांची साधने जनतेच्या म्हणजे समाजाच्या मालकीची

व्हावीत, प्रत्येक व्यक्तीला आपल्या गुणांची जोपासना करण्याची समान संधी दिली जावी व त्यातून समाजाच्या उत्पादनशक्तीचा विकास व्हावा, ही तत्त्वे तीच अद्यावत आहेत. दारिद्रय आणि शोषण संपुष्टात आणून न्याय पातळीवर समाजाची पुनर्रचना करणे व मानवी जीवन सूखी आणि समृद्ध करण्याचे आवाहन समाजवादाच्या संकल्पनेत अभिप्रेत आहे. थोडक्यात समाजवादी विचारसरणीने समता व न्यायावर आधारित नव्या समाजव्यवस्थेचा पुरस्कार केला. या विचारप्रणालीच्या पुरस्कर्त्यांच्या मते व्यक्तिहितापेक्षा समाजहित महत्त्वाचे आहे. औद्योगिक क्रांती, त्या क्रांतीनंतर निर्माण झालेली आर्थिक विषमता आणि व्यक्तिवाद व भांडवलशाही या सर्वांच्या प्रतिक्रियेतून समाजवादी विचार निर्माण झाला. भांडवलशाही समाजरचना जेव्हा अस्तित्वात आली, तेव्हा तिच्या अर्थव्यवस्थेतील दोषांमुळे त्याची प्रतिक्रिया म्हणून एकोणिसाव्या शतकात समाजवादाचा विचार पुढे आला आणि स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूलभूत अधिकारांवर आधारलेली लोकशाही क्रांती घडून आली. समाज-वाद हा सोशलिझम या इंग्रजी शब्दाचा मराठी प्रतिशब्द असून सोशॅलिझम या शब्दाचा शब्दशः अर्थ 'सहकार' असा आहे. समाजवादाची व्याख्या अनेकांनी केली आहे. एका फ्रेंच वृत्तपत्राने १८९२ मध्ये समाजवादाच्या हा कोणाला आर्थिक क्षेत्रात आणावासा वाटतो, तर काही विचारवंत समाजवादाला समाजरचनेचा प्रकार मानतात तर कोणी उदयोगधंद्याचे राष्ट्रीयीकरण केले, म्हणजे समाजवाद साध्य झाला असे मानतात. समाजवादाच्या अनेक व्याख्या करण्यात येतात पण समाजवादाच्या संकल्पनेत मुख्यतः खालील तत्त्वांचा समावेश होतो. सर्व स्त्री-पुरुषांत समानता स्थापन करणे, उत्पादनाची साधने समाजाच्या मालकिची करून त्यांचे न्याय वितरण करणे. वितरणाचे सूत्र प्रत्येकास त्याच्या कामाप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे दाम देणे, समाजातील उत्पादक -शक्तीचा विकास घडवून आणणे आणि त्याद्वारे मानवी विकासास नव्या पातळीवर नेणारा वर्गहीन व राज्यविहित समाज स्थापन करणे, समाजवादाचा उद्देश साम्यवादी समाजाची स्थापना करणे हा असतो.

समाजवाद ही संज्ञा प्रथम १८३० मध्ये तर काहींच्या मते १८२७ मध्ये प्रचारात आली. तीचा अनुक्रमे उल्लेख शार्ल फुर्ये & amp आणि nbsp → आंरी द सँ- सीमाँ या फ्रेंच राजनितीज्ञांनी केला. पुढे इंग्लिश उद्योगपती व विचारवंत आणि समाजसुधारक → रॉबर्ट ओएन याने या शब्दाचा वापर 'को-ऑप्रेटिव्ह मॅगेझीन' मध्ये केला. पुढे ओएनने सामाजिक पुनर्रचनेसंबंधीचा द फ्युचर मॅन्स गार्डियन हा ग्रंथ लिहिला (१८३३). त्याने उत्पादनसाधने सामुदायिक मालकिची झाली पाहिजेत, असा आग्रह धरला. सहकारच्या तत्त्वावर त्याचा विश्वास होता एवढेच नव्हे, तर अशा प्रकारची कृती व प्रयोग त्याने आपल्या न्यू लानार्क मिल्स (ग्लासगो) मध्ये केला तथापि शास्त्रशुद्ध समाजवादी विचारांची मांडणी करण्याचे श्रेय → श्रेय कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) या जर्मन विचारवंताकडे जाते. मार्क्सच्या विचारात स्थलकालानुरूप फेरफार करून → न्यिकलाय लेनिन (१८७०-१९२४) याने रशियन राज्यक्रांती समाजवादी समाज स्थापन करण्याचा प्रयोग रशियात केला, तसेच चीनमध्ये १९४९ नंतर → माओ-त्से-तुंग याने ही विचारसरणी कार्यवाहीत आणली. पश्चिम युरोपातील लोकशाही देशांत → हॅरल्ड लास्की, → सिडनी वेब, → जी.डी. एच. कोल, क्लेमंट ॲटली, बेव्हन

प्रभृती राजकीय विचारवंतांनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला. स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांत अनेक वर्षापासून समाजवादी पक्षांच्या राजवटी होत्या.

समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार फार प्राचीन काळी → प्लेटो (इ. स. पू. ४२८ - ३८४) या थोर ग्रीक तत्वज्ञ व विचारवंताने द रिपब्लिक या ग्रंथात इ.स . पू. चौथ्या शतकात मांडला होता. प्राचीन ग्रीकमध्ये समाजवादी विचार प्रभावी होता, पण प्लेटोने आपल्या ग्रंथात am ज्या Vrc सत्ताधारी पालक वर्गासाठी खाजगी मालमत्ता व कुटुंबसंस्था नसेल पण ही व्यवस्था मोजक्याच लोकांसाठी होती. त्यानंतर इंग्लंडमधील यादवी युद्धाच्या काळात लेव्हलर्स (सामाजिक भेदभाव नष्ट करू इच्छिणारे) आणि डिगर्स (अन्न आणि संपत्तीची समसमान वाटणी मागणारे सामान्य लोक) यांनी समाजवादी विचार मांडले. त्यांचा काल स्थूलमानाने सतरावे शतक होय. तत्पूर्वी सोळाव्या शतकात → टॉमस मोर (१४७८-१५३५) या इंग्रज मानवतावादी लेखकाने युटोपिया नामक ग्रंथात एका कल्पनिक आदर्श समाजाचे चित्र रेखाटले आहे. (१५१६). त्यात आदर्श किंवा सर्वसुखयुक्त सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे काल्पनिक राज्य गृहीत धरले आहे. आदर्श राज्य कसे असावे, आदर्श समाजरचना कोणत्या स्वरुपाची असावी, यासंबंधीच्या कल्पना टॉमस मोरने विस्ताराने मांडल्या आहेत. आदर्श समाजकल्पना हे एक प्रकारचे स्वप्नरंजन आहे तथापि आदर्शाकडे झेप घेण्याची मानवी प्रवृत्ती शतकानुशतके कशी टिकून आहे, हे यावरून स्पष्ट होते. विचारवंतानी केवळ आदर्श समाजाचे चित्र रंगविण्यासाठी कल्पनाविहार केला आहे, असे नाही जॉर्ज ऑर्वेलने नाइन्टीन एटीफोर ह्या ग्रंथात (१९४९) अमाप तांत्रिक सामर्थ्याचा वापर करून आणि असत्याचा पद्धतशीरपणे उपयोग करून, व्यक्तिजीवनाचे सर्वंकष नियंत्रण करणाऱ्या सत्ताधीशाच्या तावडीत सापडलेल्या समाजाचे विदारक चित्रण आहे. भविष्यात सत्य होऊ शकेल, असे एक सामाजिक दु:स्वप्न ऑर्वेलने रंगविले आहे. पुढे सतराव्या शतकात टी. कॅम्पनेल्ल या राज्यशास्त्रविषयक मीमांसकाने सिटी ऑफ द सन या ग्रंथात समाजवाद या संकल्पनेविषयी चर्चा केली आहे (१६२३). याशिवाय प्रबोधनकालीन अनेक लेखकांनी या संकल्पनेचा उहापोह केला असून, फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान व तत्पूर्वी स्वातंत्र्य, समताव बंधुता या मूलभूत मानवी अधिकारांच्या उद्धषांबरोबरच त्यांच्या स्थापनेकरिता आवश्यक अशी समाजरचना स्थापिणे आवश्यक आहे, अशी विचारसरणी दृढमूल झाली होती. ही समाजरचना स्थापिणे आवश्यक आहे, अशी विचारसरणी दृढमूल झाली होती. ही समाजरचना शुद्ध व न्याय होय, असाही विचार त्यातून पुढे आला. माणसाची माणसाने चालविलेल्या, पिळवणुकीच्यापद्धतीवर आधारलेल्या, उच्चीच वर्गवारी असलेल्या समाजरचनेचा अंत करणे युक्त होय, असा विचार समाजवादी विचारसरणीच्या मुळाशी आहे. समाजवादी क्रांती घडवून आणणे आवश्यक आहे, असे मानणाऱ्या विचारवंतांनी, समाजनेत्यांनी समाजवादाच्या स्थापनेकरिता सिद्ध व्हावे, असा विचार पश्चिम युरोपात प्रस्तुत होऊ लागला. त्यांतील काही समाजवादी असेही म्हणू लागले की, समाजरचनेचा केवळ आर्थिक पाया बदलून मानवी पिळवणूक थांबणार नाही त्याकरिता राज्य विसर्जन करणे आवश्यक आहे. समाजवादाचे विविध प्रकार. एकोणिसाव्या -विसाव्या शतकांत युरोपीय देशांतून प्रस्तुत झालेले आढळतात. त्यांत समाजवादाचे काही उपप्रवाह आढळतात. फ्रान्स व स्पेनमध्ये

श्रमिक संघवादाची वाढ झाली. इंगलंडमध्ये १८८० नंतर फेबिअन सोसायटी व मजुरपक्ष यांना रक्तरंजित क्रांतीतून उगम पावणारा समाजवाद मान्य नव्हता. त्यांना लोकशाही समाजवाद अभिप्रेत होता. प्यॉटर कपॉटक्यिन आणि म्यिकईल बकून्यिन यांनी स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या नैतिक आदर्शवादाचा आविष्कार करणारा अराज्यवाद पुरस्कृत केला समाजवाद किंवा साम्यवाद या ध्येयवादांप्रमाणेच अराज्यवादhr मानव व समाज यांच्या तात्त्विक मीमांसेवर आधारलेला आहे. अराज्यवादmV शिस्त शासनयंत्रणा किंवा दंडशक्ती यांपैकी कशाचीच जरुरी नसते तथापि समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाही राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या कामगार संघटना व त्यांनी हाती घेतलेल्या चळवळी, ह्यांतून भांडवलशाही व तिला संरक्षण देणाऱ्या शासनसंस्थेला आव्हान दिले जात असले, तरी तीच राज्यसंस्था कायमची मोडून टाकावयाची, असा अगदी आत्यंतिक सैद्धांतिक आगह जरी नसला, तरी राज्य स्वरूप बदलले पाहिजे व ते आपल्याला पाहिजे तसे करून घेतले पाहिजे आणि असे करणे शक्य आहे, हा विश्वास मात्र निश्चित असतो. राज्यसंस्थेशिवाय समाज खरोखरीचे सुरळीत चालू शकेल काय ? समाज वादात व्यक्तिस्वातंत्र्य, संघटना स्वातंत्र्य अशी लोकशाहीला अभिप्रेत असलेली सर्व मूल्ये लोकसत्ताक स्वरुपाची समाजवादी शासनसंस्थाच जोपासू शकेल, असा समाजवादी विचारवंतांना विश्वास वाटतो, तर फेडरिक मॉरिस चार्ल्स किंग्जली यांनी दुसऱ्या टोकाचा ख्रिश्चन सोशललिझम हा विचार इंग्लंडमध्ये मांडला आणि त्याचा प्रसार-प्रचारही केला. ख्रिस्ती धर्म व समाजवाद यांचा मेळ घालवण्याचा तो प्रयत्न होता. पुढे तो विचार यूरोप व अमेरिकेत पसरला. इंगलंडमध्ये जी.डी. एच. कोल हा व्यवसाय संघवादाचा मुख्य प्रणेता होता. जगातील बहुसंख्य राष्ट्रांत समाज-वादी विचार कामगार संघाच्या स्वरुपात रुजले. कामगार संघांनी शासनावर प्रभाव पाडून आपले हक्क प्रस्थापित करण्यात काही प्रमाणात यश मिळविले आहे.

भारतात समाजवादी विचार पंडित नेहरू, जयप्रकाश नरायण व डॉ. लोहिया यांनी यांनी मांडले. त्यांच्या विचारांवर म. गांधीच्या विचारांचा प्रभाव होता. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात कार्ल मार्क्स (१८१८ - ८३) याने कामगारांची राज्यक्रांती, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत, कामगारवर्गाची हुकूम-शाही यांची चर्चा केली. त्याच्या विचारांचे तपशीलवार वर्णन कम्युनिस्ट मॅनिफेस्टो (१८४८) आणि कॅपिटल या ग्रंथात आढळते. त्याचे म्हणणे असे की, समाजवाद हा नैतिक दृश्य युक्त असला, तरी समाजवादी क्रांती केवळ सदिच्छेने आणि विचारपरिवर्तनाने घडू शकत नाही. त्याला अनुकूल अशी सामाजिक परिस्थिती उत्पन्न व्हावी लागते. मध्ययुगीन सरंजामशाहीतून समाजवाद जसा उत्पन्न होऊ शकत नाही, तशी भांडवलशाही समाजरचना जोपर्यंत नाहीशी होत नाही, तोपर्यंत समाजवादी क्रांती होऊ शकत नाही. सामाजिक कार्यकारणभावाचा नियम उल्लघून काहीही करता येणे माणसास अवघड आहे. मार्क्स म्हणतो की, आतापर्यंतचे समाजवाद हे युटोपियन धर्तीचे म्हणजे अवास्तव कल्पनारंजित आहेत. त्याचा समाजवाद हा वैज्ञानिक समाजवाद आहे. मार्क्सच्या वैज्ञानिक समाजवादाची उत्पत्ती थोडक्यात अशी आहे : विशिष्ट आर्थिक उत्पादनपद्धत हा विशिष्ट समाजरचनेचा पाया असतो. त्या पायावर सामाजिक वर्गसंबंध आधारलेला असतात. सत्ताधारी वर्ग व सत्ताहीन वर्ग ही

वर्गीय समाजरचनेची निर्मिती असते. उत्पादनाच्या साधनांच्या आधारे सत्ताधारी वर्ग राज्यसंस्था ताब्यात घेतो. राज्यसंस्था म्हणजे दंड-संस्था, जबरदस्ती करणारी संस्था. आर्थिक उत्पादनपद्धती बदलली म्हणजे समाजाचे वर्गसंबंध बदलतात सत्ताधारी वर्ग बदलतात. एक विशिष्ट आर्थिक उत्पादनपद्धती जोपर्यंत उत्कर्ष पावते, तोपर्यंत व त्यामुळे तिच्यावर आधारलेली समाजपद्धती ढासळू लागली म्हणजे पिळला जाणारा वर्ग सत्ताधारी वर्गाच्या हातातील सत्ता हिसकावून घेतो व समाजक्रांती होते. वतर्मान भांडवलशाही समाजसंस्थेचा अर्थोत्पादन पद्धतीचा पाया ढासळू लागेपर्यंत समाजवादी क्रांती होणार नाही. भांडवलशाहीतील कामगार वर्ग हा क्रांतिकारक वर्ग होय. या वर्गाच्या नेतुत्वाखाली सशस्त्र समाजवादी क्रांती जन्मालाल. येई कामगारांचे शोषण भांडवलदार वर्ग अतिरिक्त मूल्य निर्माण करून करतो. भांडवलशाही समाजव्यवस्थेत समाजाची विभागणी सत्ताधारी भांडवलशाही वर्ग आणि पिळला जाणार कामगार वर्ग, अशीच राहणार असून याचा कामगारवर्गात समाजातील बहुसंख्य व्यक्ती अधिकाधिक समाविष्ट होत जाणार श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातील, गरीब होत जातील त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा एका बिंदूपर्यंत उत्कर्ष होऊन ती अपकर्षास जाऊ लागेल. त्यामुळे कामगारवर्ग भांडवलशाही वर्गाच्या हातातील सत्ता काबीज करून कामगारवर्गाची हुकुमशाही स्थापन करील. भांडवलशाही वर्ग नष्ट होईपर्यंतच ही हुकूमशाही राहील. या हुकूमसहीत आर्थिक उत्पादन -साधने ही सामाजिक मालकीची होतील. हीच समाजवादी क्रांती होय. खाजगी मालकीची आर्थिक उत्पादन-साधने समाजाच्या मालकीची होणे, म्हणजेच समाजवाद होय. भांडवलशाही नष्ट झाल्यावर उत्पादनशक्तीच्या विकासदरावर हळूहळू राजसत्ताही आपोआप संपुष्टात येऊन राज्यसत्ताविहीन समाजवादी समाजरचना म्हणजे साम्यवादी ( कम्युनिझम ) समाजसंस्था उदयास येईल.

कार्ल मार्क्सच्या वरील वैज्ञानिक समाजवादाविषयी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात की, 'कार्ल मार्क्सचा हा वैज्ञानिक समाजवाद एका अर्थी यूटोपियनच आहे. समाजपरिवर्तनाचा कार्यकारणभाव त्याने सांगितला. समाजवाद व साम्यवाद वा कम्यूनिझम हे ध्येयवाद सामाजिक जीवनाचे उच्चतम नैतिक ध्येयवाद आहेत. त्याकडे पीडित व त्रस्त माणसे आकर्षित होतात. आदर्शवादी विचारवंतही त्याने मोहित होतात. ही मोहिनी उदात्त व पवित्र आहे. विद्यमान विज्ञाने सर्व मानवांच्या हितार्थ वापरली, तर जगातील दारिद्रय व दैन्य यांचा संपूर्ण अंत त्वरित होईल. हे सत्य आहे परंतु ह्या समृद्धीच्या ध्येयाकडे, समतेच्या क्रांतीकडे मानवसमाज जाईल की नाही, याचे गणित मात्र मांडता येत नाही'.

समाजवादाचे विविध प्रकार - उपप्रकार आणि कार्ल मार्क्सचा वैज्ञानिक समाजवाद, या सर्वांचा तात्त्विकदृष्टया विचार केला असता, विद्यमान परिस्थितीत लोकशाही समाजवाद ही संकल्पना बरीच रुजली असून, तीचा स्वीकार स्वदर्शनी अनेक देशांनी केला आहे. उत्पादनसाधनांच्या व विनिमयाच्या सामाजिक मालकीतून आणि नियंत्रणातून जनसामान्यांच्या सामाजिक, आर्थिक न्यायासाठी लोकशाही घटनात्मक मार्गाने समाज संघटित करणारा सिद्धांत व चळवळ म्हणजे लोकशाही समाजवाद होय, अशी व्याख्या इंग्लंडमधील समाजवाद्यांनी केली आहे. या समाजवादात न्याय, समता, समाजहित,

सनदशीर मार्ग, सहकार्य आदी बाबींवर भर दिलेला दिसून येतो. लोकशाही मार्गाने समाजवाद आणण्यासाठी निवडणुका, संसद, शासनयंत्रणा इ. साधनांचा उपयोग करून समता व व्यक्तिस्वातंत्र्य या दोन्हींचा समन्वय साधण्याचा मार्ग सांगितलेला आहे. नफ्यावर आधारलेल्या व्यक्तिवादाला विरोध, खाजगी उत्पादनक्षेत्रावर नियंत्रण, मूलभूत तत्त्वांवर लोकशाही समाजवादी विचारप्रणाली उभी आहे. नवीन समाजरचना निर्माण करण्यासाठी लोकांची सदसद्विवेकबुद्धी जागृत करावी व त्यासाठी शिक्षण, चर्चा, विचार परिवर्तन या लोकशाही मार्गांचा अवलंब करावा, असे फेबिअन समाजवादी मानतात. संप, बहिष्कार, निरोधन यांसारखे मार्ग अंगीकारावेत असे व्यवसाय संघवादी मानतात, तर स्वयंशासनाची पात्रता असलेल्या कामगारांमुळे खरीखुरी समाजवादी व्यवस्था निर्माण करता येईल, असे श्रेणिसमाजवादी मानतात. लोकशाही समाजवादाच्या या विविध प्रकारांच्या उदय व विकास देशकालपरिस्थितीनुसार निरनिराळ्या देशांमध्ये झालेला दिसतो. लोकशाही समाजवादात नैतिक मूल्यांना उच्च स्थान असून कामगारवर्गाप्रमाणेच मध्यमवर्गाला सहभागी करून घेतले जाते शिवाय खाजगी संपत्तीवर कायदेशीर नियंत्रण ठेवले जाते. उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरणही केले जाते. लोकशाही समाजवादी हे समाजवादाच्या मूळ आदर्शांचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते परिवर्तनाची प्रक्रिया ही अहिंसक मार्गाने, लोकशाही पद्धतीने आणि मंद गतीने चालू ठेवण्यात यावी. अर्थव्यवस्थेत - वर सार्वजनिक क्षेत्राचे नियंत्रण असावे. उत्पादनाच्या साधनांचे हळूहळू सामाजिकीकरण करण्यात यावे.

भारतामध्ये लोकशाही समाजवादी विचारसरणीची मूलतत्त्वे काँग्रेसांतर्गत स्थापन झालेल्या समाजवादी गटात आढळतात. १९३४ मध्ये जयप्रकाश नारायण, अशोक मेहता, आचार्य नरेंद्र देव प्रभूतींनी हा गट स्थापन केला. पुढे १९४८ मध्ये स्वातंत्र्यानंतर या समाजवाद्यांनी स्वतंत्र समाजवादी पक्षाची स्थापना केली मात्र त्यात पुढे एकजूट राहिली नाही आणि १९७७ मध्ये समाजवादी पक्ष तत्कालीन जनता पक्षात विलीन झाला. त्यानंतर त्यांना फारसे स्वतंत्र अस्तित्व राहिले नाही. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू (कार. १९४७-६४) यांची लोकशाही समाजवादावर निष्ठा व विश्वास होता. समाजवादी समाज स्थापन करणे, हे काँग्रेसचे उद्दिष्ट आहे, अशी घोषणा त्यांनी केली. त्यांचा समाजवाद इंग्लंडमधील मजूर पक्षाच्या धाटणीचा होता. भारताच्या मूळ संविधानात समाजवाद या शब्दाचा उल्लेख नव्हता. तो पुढे १९७६ मध्ये झालेल्या बेचाळीसाव्या घटना दुरुस्ती-द्वारा प्रथमच सरनाम्यात करण्यात आला. सरनाम्यातून भारतीय संविधानात अभिप्रेत असलेल्या लोकशाही समाजवादाचा आशयव्यक्त होतो.

विसाव्या शतकात समाजवादी विचार लोकप्रिय झाले. कम्यूनिस्ट पक्ष-शासित साम्यवादी राजवटी, पश्चिम युरोपातील कल्याणकारी राज्याची उत्तम प्रकारे अंमलात आणून जनतेला मोठया प्रमाणात सामाजिक सुरक्षा पुरविणाऱ्या लोकशाही समाजवादी राजवटी, भारतातील गांधींच्या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करीत राज्य समाजावादास नकार देत जनतेच्या सहभागावर व विकेंद्रीकरणावर भर देणारे समाजवादी पक्ष, ही समाजवादाचीच वेगवेगळी रूपे आहेत कारण समाजवादाने विविध देशांत कार्यरत असणाऱ्या लोकांना एका उन्नत आणि समृद्ध समाजाची स्थापना करण्याचे स्वप्न दिले आहे.

उदारमतवाद : समाजाच्या वा राज्याच्या कोणत्याही नागरिक व्यक्तीला किंवा सर्व नागरिकांना व्यक्तिशः स्वातंत्र्याचा हक्क मिळाला पाहिजे व त्याकरिता राज्य व सार्वजनिक संस्था यांचे धोरण व व्यवहार व्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्काला बाध येणार नाहीत, अशा पद्धतीने व धोरणाने चालले पाहिजेत, असा दृष्टिकोन म्हणजे उदारमतवाद होय. सांप्रदायिक विचारप्रणाली हे स्वरूप उदारमतवादाला नाही. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे व्यक्तित्वाचा अनिर्बंध आविष्कार हे मुख्य मूल्य होय. स्वतः स व समाजास उपयुक्त असा आत्माविष्कार करण्याची माणसात पात्रता असते ज्या संस्था व राजकीय धोरणे अशा आत्माविष्काराचे व स्वातंत्र्यावरील निष्ठेचे संवर्धन करतात, त्यांची स्थापना वा पुरस्कार करणे हेच योग्य होय, असा उदारमतवादाचा आशय आहे.

ह्या आशयास अनुसरून उदारमतवादी विचारसरणी व व्यवहार पुढील दोन मूलभूत गोष्टींवर भर देतात: (१) स्वेच्छातंत्र सत्ताधारित्वाची नापसंती व (२) व्यक्तिचा अनिर्बंध आविष्कार. धर्मसंस्थांच्या व परंपरावादी सत्ताधाऱ्यांच्याअनियंत्रित सत्तेला उदारमतवादी विरोध करीत आले आहेत. धर्मश्रद्धेऐवजी बुद्धिवादाचा आश्रय करून वैचारिक प्रचारस्वातंत्र्याला त्यांनी उचलून धरले आहे. सामाजिक व राजकीय नियंत्रण व्यक्तिनिरपेक्ष असावे म्हणजे संपत्ती, सामाजिक दर्जा इत्यादिकांवर व्यक्तींच्या व्यवहाराचे नियंत्रण करणारे नियम आधारलेले असू नयेत, व्यक्तींना समान वागणूक मिळावी, कायद्याचे राज्य असावे व देशादेशांत अनिर्बंध व्यापार चालवा. उदारमतवादाचे प्रात्यक्षिक स्वरूप असे आहे. व्यक्तींना स्वातंत्र्याची वाढ करण्याकरिता व योग्यता दाखविण्याकरिता संधी मिळावी, म्हणून स्वातंत्र्याची अधिकाधिक समान वाटणी व्हावी आर्थिक मक्तेदारी व वरिष्ठ वर्गांचे विशेषाधिकार रद्द व्हावेत निरनिराळ्या संधींचा विस्तार व्हावा, राज्याचा हस्तक्षेपही कमी व्हावा. उदारमतवादाचे असे प्रत्यक्षीकरण झाल्याने विज्ञान, तंत्र, नवे नवे उपयुक्त प्रयोग ह्यांची वाढ होऊन इंग्लंड, पश्चिम यूरोप व अमेरिका ह्यांमध्ये आर्थिक व सामाजिक प्रगती झाली. पश्चिम युरोपातील आधुनिक राज्यांनी नवी धोरणे अंमलात आणल्यामुळे उद्योगी व सुशिक्षित वर्गाची वाढ झाली आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करण्याची प्रेरणा मिळाली. अगणित नव्या संस्था व उद्योगउभे राहिले. संकुचित दृष्टिकोन मावळू लागला आणि विश्वबंधुत्वाची भावना निपजली व निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रांत एक नवीन अभिजनवर्ग तयार झाला.

इंग्लंडमध्ये उदारमतवादाचा सिद्धांत व राजकीय कर्यक्रम १६८८-१८६७ च्या कालावधीत मांडला जाऊन परिणतीस पावला. व्यक्तींचे हक्क राखणे व त्या हक्कांच्या रक्षणार्थ संविधानात्मक तरतुदी करणे, हे उदारमतवादाचे प्राथमिक रूप होते. धार्मिक सहिष्णुता व स्वातंत्र्य, संविधानाधीनता व राजकीय हक्क ह्या गोष्टी त्यात नमूद केल्या गेल्या. १६८८ साली उदारमतवादी क्रांती झाली. त्यामुळे राज्याची सर्वकष हुकमत व परंपरावाद ह्यांतून सुटका झाली. अमेरिकेने राजकीय स्वातंत्र्य जाहीर केले. त्यानंतर उदारमतवादाचा दुसरा कालखंड लागतो. या कालखंडात आर्थिक व्यवहाराचे स्वातंत्र्य किंवा खुल्या व्यापाराचा सिद्धांत कार्यान्वित झाला. त्यामुळे नोकरशाहीची अर्थव्यव्हारातील नियंत्रणे उठली. व्यापारी, दर्यावर्दी, दळणवळण करणरे लोक व श्रमिक ह्यांच्यावरील बंधने शिथिल झाली.

इंगलंडमध्ये उदारमतवादाचे समर्थन व विवरण करणारे लॉक, ॲडम स्मिथ, जेरोमी बेंथॅम, जॉन स्टयुअर्ट मिल इ. तत्वज्ञ उदयास आले. त्यांनी खुल्या व्यापाराचे अर्थशास्त्र, व्यक्तिस्वातंत्र्याचे राज्यशास्त्र व उपयुक्ततावादी नीतिशास्त्र ही निर्माण केली. विचारवंतांच्या प्रभावामुळे मतदानाच्या हक्काची प्राप्ती व विस्तार झाला.

उदारमतवाद राजकीय लोकशाही पद्धतीला पोषक असतो, हे जरी खरे असले तरी तो राजेशाहीत किंवा उमरावशाहीत अथवा अन्य राजवटीत कार्यान्वित करता येतो म्हणून लोकसत्तावादाहून उदारमतवाद पृथक आहे, असे म्हणता येते.

इंग्लंड सोडल्यास अभिजात उदारमतवादाची मांडणी व व्यावहारिक प्रबल समर्थन अन्यत्र विशेषसे झाले नाही  इंगलंडव्यतिरिक्त यूरोप व व अमेरिका येथील राजकीय, आर्थिक व सामाजिक जीवनावर उदारमतवादाचे वारे वाहिले, ह्यात शंका नाही. युरोपात माँतेस्क्यू, बेंजामिन काँस्तां, गटे व हेर्डर हे तत्त्वज्ञ उदारमतवादाचे पुरस्कर्ते होते.

उदारमतवादाच्या वातावरणात भांडवलशाही समाज निर्माण होऊन आर्थिक व सांस्कृतिक क्रांती झाली. परंतु बहुजनसमाजाचे जीवन कष्टानेच राहिले. उदारमतवादात व्यक्तींवरील बंधनांचा निरास हे निषेधात्मक तत्त्व प्रधानता पावले. परंतु तेवढयाने सामान्य जणांना संपन्न आर्थिक व सांस्कृतिक जीवन लाभले नाही. तशा जीवनाकरिता आवश्यक असलेली विधायक तत्त्वे सांगणारा क्रांतिकारक समाजवादी विचार एकोणिसाव्या शतकात वाढून प्रभावी होऊ लागला. उदारमतवादाचा प्रभाव कमी होऊन, उदारमतवादी पक्षांच्या व व्यक्तींच्या हातातील राजकीय सत्तेची सूत्रे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दिली होऊ लागली व तशा पक्षांचा पराभव होऊ लागला. ह्यानंतर उदारमतवादाचा संपूर्ण त्याग करणारा समाजवाद पुढे आला. समाजवादात समाजहिताकरिता उभ्या रहावयाच्या संस्थांची नवीन बंधने निर्माण होणार, हे दिसू लागल्यावर उदारमतवादाचे रुपांतर लोकशाहीप्रधान समाजवादात झाले. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ब्रिटनमधील मजुरपक्षाशी सहानुभूती असलेल्या विचारवंतांचा व मजूरपक्षीय नेत्यांचा फेबियन समाजवाद होय.

## १.११ सारांश

राजकीय विचारप्रणालींमध्ये अराज्यवाद आणि लोकशाही ह्या महत्त्वाच्या विचारप्रणाल्या होत. अराज्यवाद म्हणजे स्वातंत्र्य, परस्परांविषयी प्रेम व सहकार्य हे अंतर्भूत असून प्रत्येक व्यक्ती आपली शासक रहाते. अराज्य याचा अर्थ व्यक्तीव्यक्तीत, राज्याराज्यात, राष्ट्रराष्ट्रात  जे व्यवहार करावयाचे ते स्वयंस्फुर्त व सहकार्यावर आधारलेले असले पाहिजे, अशा समाजव्यवस्थेत राज्यसंस्थेची गरज असू नये. सर्व मानवी संबंधीच्या क्षेत्रात न्याय प्रास्थापित करणे होय. रॉबर्ट वुल्फ यांनी अराज्यवादी विचारसरणीची मांडणी करून ते राज्याचे अधिकार नाकारताना नैतिक जबाबदारीची संकल्पना, स्वायत्ततेची संकल्पना अधिकार आणि स्वायत्तता महत्त्व दिले. रॉबर्ट वुल्फ अधिकार, शक्ती किंवा बल यातील फरक स्पष्ट करतात. बलात धमकीचा वापर तर अधिकारात आज्ञेचे पालन करावयाचे असते. आज्ञा देणारा हा फक्त आपल्या कर्तव्याची जाणीव

करून देतो. वुल्फच्या मते व्यक्तीला संकल्पनेचे स्वातंत्र्य असते. जर व्यक्ती कृती करण्यात स्वतंत्र्य असेल तर व्यक्तीला नैतिक जबाबदार ठरविता येते. कारण ती नैतिकतेचे बंधन आपल्यावर आहे परंतु ते कोणीही आपल्यावर लादलेले नाही, अराज्यवादात राज्यविरहित समाज हा एक आदर्श आहे. त्याची भूमिका अतिरेकी स्वरुपाची असून व्यक्तीव्यक्तीत, राज्याराज्यात, राष्ट्राराष्ट्रात सहकार्य प्रेम व स्वातंत्र्य यावर आधारलेले असतील ही त्यांची कल्पना साकार होईल हा विचार स्वप्नवत राहिलेला आहे.

लोकशाही एक राजकीय विचारप्रणाली असून तो शासनाचा एक चांगला प्रकार आहे. लोकशाही फक्त शासनप्रकारच नाही तर लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. लोकशाहीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रकार असून अप्रत्यक्ष लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय असे प्रकार पडतात. भारतात संसदीय लोकशाही तर अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. लोकशाहीत अशी शासनयंत्रणा आहे की जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात. लोकशाहीत अशी शासनयंत्रणा आहे की जी लोकांनी निवडलेले प्रतिनिधी चालवतात. लोकशाहीत 'लोकांचे सार्वभौमत्त्व' महत्त्वाचे असते. लोकशाहीचे राजकीय, सामाजिक व आर्थिक नैतिक, धार्मिक असे महत्त्वाचे पैलू आहेत. लोकशाहीचे अनेक आदर्श (Ideals) असून त्यातले काही जनतेचा सहभाग, समता, स्वातंत्र्य, जबाबदारी, सत्तेचे विभाजन, न्याय इ. आदर्श आहेत. लोकशाहीमध्ये सर्व लोकांना विकासाची समान संधी दिलेली आहे. लोकशाही शासनाचा चांगला प्रकार असला तरी तिचे काही गुण दोष आहेत. त्यापैकी लोकशाहीचे दोष (तोटे) कमी करणे हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे.

## १.१२ दीर्घोत्तरी प्रश्न

१) अराज्यवाद म्हणजे काय ते सांगून रॉबर्ट पॉल वुल्फचा अराज्यवादी सिद्धांत स्पष्ट करा.

२) लोकशाहीचा अर्थ सांगून लोकशाहीचे प्रकार स्पष्ट करा.

३) लोकशाही म्हणजे काय ? लोकशाहीचे आदर्श (Ideals) कोणते आहेत ते सांगून लोकशाहीविषयी केल्या जाणाऱ्या समर्थनाचे वर्णन करा.

४) लोकशाहीचे स्वरूप सांगून तिचे गुणदोष स्पष्ट करा.

५) टीपा लिहा

  १) अराज्यवाद

  २) स्वायत्ततेची संकल्पना - रॉबर्ट पॉल वुल्फ

  ३) प्रत्यक्ष लोकशाही व अप्रत्यक्ष लोकशाही

  ४) लोकशाहीचे आदर्श (Ideals)

  ५) लोकशाहीचे समर्थन

❖❖❖❖

# २

## स्वातंत्र्य (LIBERTY)

## ब) स्वातंत्र्य – रोनाल्ड डॉरकीन आणि इसीह बर्लीन

**घटक रचना :**


२.० उद्दिष्टये

२.१ प्रस्तावना

२.२ रोनाल्ड डॉरकीन यांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना

२.३ इसीह बर्लीन

२.४ इसीह बर्लीनची स्वातंत्र्याची संकल्पना

२.४.१ स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना (अभावात्मक स्वातंत्र्य)

२.४.२ स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना (भावात्मक स्वातंत्र्य)

२.५ अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन : मार्टिन ल्युथर किंग

२.६ सारांश

२.७ दीर्घोत्तरी प्रश्न


### २.० उद्दिष्टये

१) 'स्वातंत्र्य' विषयी विविध विचारवंतांचे विचार स्पष्ट होतील.

२) रोनाल्ड डॉरकीन यांचे स्वातंत्र्याचा हक्क आहे का हा विचार समजून घेता येईल ?

३) इसीह बर्लीन यांची स्वातंत्र्याची संकल्पना समजून घेता येईल.

४) स्वातंत्र्याची सकारात्मक आणि नकारात्मक संकल्पना समजेल.

५) सविनय कायदेभंगाचा अर्थ समजावून घेता येईल.

६) सविनय कायदेभंग हे रक्तपाताशिवाय एक प्रभावी शस्त्र म्हणून संपूर्ण जगभर कसे वापरले जाऊ शकते. हे माहित करून घेता येईल.

७) डॉ. मार्टिन ल्युथर किंगकडून अमेरीकेतील नागरी हक्क संरक्षित करण्यासाठी सविनय कायदेभंगाचा एक साधन म्हणून उपयोग समजून घेता येईल.

८) कायद्याचे निरपेक्ष पालन व उपयोजन या संदर्भात प्लेटोचा दृष्टिकोन अभ्यासात येईल.

९) सविनय कायदेभंगाविषयी महात्मा गांधीजींच्या दृष्टिकोनाचे आकलन घेता येईल.

## २.१ प्रस्तावना

स्वातंत्र्य हे हे प्रत्येकाला हवे हवेसे वाटते, पशु, पक्षी, प्राणी यांना देखील स्वातंत्र्य हवे असते. बंधनात राहायला कोणालाच आवडत नाही. या पूर्वीच्या पाठात आपण स्वातंत्र्य आणि हक्क यांचा संबंध पहिला आहे. स्वातंत्र्य हा व्यक्तीचा मुलभूत मानवी हक्क मानला जातो. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. अनेक शाखांत यांचे स्वातंत्र्यासंदर्भातील विचार पाहणार आहोत. प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा हक्क आहे. समतेचा हक्क तसे त्यास स्वातंत्र्याचा हक्क आहे का ? या प्रश्नाची सविस्तर सारख्या विचारवंताने केली आहे. स्वातंत्र्य या संकल्पनेच्या विविध छटा आहेत. साधारणपणे जोरजबरदस्तीचा अभाव स्वातंत्र्य अशी व्याख्या केली जाते. इसीह बर्लीनने स्वातंत्र्याची नकारात्मक आणि सकारात्मक संकल्पना स्पस्त केली आहे.

सुमारे १५० वर्षांपूर्वी डेव्हिड थोरो यांनी त्यांच्या आधुनिक पाश्चात्य राजकीय उपपत्ती (Theory) मध्ये सविनय कायदेभंग या कल्पनेचा समावेश केला. तेव्हापासून सविनय कायदेभंग हे लोकशाहीच्या तंत्रामध्ये नागरिक सहमत नसल्याचे दर्शविण्यासाठी एक महत्वाचे साधन वापरले जाऊ लागले.

विश्वामध्ये अनेक प्रभावी राष्ट्रांनी कमजोर राष्ट्रांवर आक्रमण केले व त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले तसेच प्रत्येक राष्ट्रात वांशिक वर्णभेद अगोदरच होता. यासाठी अनेक तत्त्वचिंतकांनी लढा दिला. हा लढा हिंसात्मक व अहिंसात्मक अशा दोन्ही प्रकारचा होता. अहिंसात्मक लढा हाअसहकार, उपोषण, सत्याग्रह, सविनय कायदेभंग या तंत्राच्या माध्यातून होता. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग, महात्मा गांधी इत्यादींनी सविनय कायदेभंग या तंत्राच्या  साहाय्याने लढा दिला.

सविनय याचा अर्थ विनयाने म्हणजेच अहिंसा, सत्य, सहनशिलता याचा वापर करणे व अन्यायकारक कायद्याचे पालन न करणे. राजकीय क्षेत्रात अन्यायी, जुलमी सरकार विरूद्ध परकीय सत्तेविरुद्ध सत्याग्रहातील सविनय कायदेभंग या तंत्राचा उपयोग करणे व अनैतिक तसेच चुकीचे कायद्याचे पालन न करणे. अन्यायी व जुलमी राजवट व सत्ता यांच्याविरुद्ध लढण्यासाठी, संघर्ष करण्यासाठी या विचारवंतांनी नवीन प्रभावी पद्धत विकसित केली.

## २.२ रोनाल्ड डॉर्कीन यांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना

रोनाल्ड डॉर्कीन अमेरीकन कायदे विधीतत्त्वज्ञ आहेत. त्यांचा जन्म वॉरसेस्टर मॅशशूटस येथे झाला. हॉरवर्ड लॉ स्कूल मधून त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. अमेरिका आणि इंग्लंडमधील अनेक विद्यापीठात त्यांनी महत्त्वाची पदे भूषविली. ते ऑक्सफर्ड

विद्यापीठात प्रोफेसर ज्युरीस प्रूडन्स या पदावर कार्यरत होते. विधी तत्त्वज्ञानात आणि राकीय तत्त्वज्ञानात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. डॉर्कीनच्या करीअरच्या सुरुवातीच्या काळात ज्या सामाजिक सुधारणा व चळवळी झाल्या. उदा-नागरी हक्क स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण, व्हिएतनाम युद्ध इ. त्यामुळे स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे पुन्हा परीक्षण करण्याची गरज भासू लागली. डॉर्कीन अशा स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो, की ज्यात समानतेचा हक्क सर्वोच्च राजकीय तत्त्व असेल.

डॉर्कीनचे राजकीय तत्त्वज्ञान त्यांच्या विधी विचारांशी सुसंगत आहे. त्याच्या मतानुसार जोपर्यंत राजकीय सत्ता नागरिकांना समान लेखत नाही. तोपर्यंत त्यांच्यावर कोणतेच अधिकार नाही त्यांनी प्रत्येकाला समान दर्जा द्यायला हवा. प्रत्येक व्यक्तीने त्याच्यासाठी चांगले कार्य काय आहे हे त्यानेच ठरविण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला हवे.

स्वातंत्र्य हे प्रत्येकाला हवे-हवेसे वाटते  परंतु डॉर्कीन प्रश्न करतो की, आपणास स्वातंत्र्याचा अधिकार आहे का ? यावर उत्तर देताना तो म्हणाला की, स्वातंत्र्याचा अधिकार का केवळ राजकीय अधिकार (हक्क) नाही. स्वातंत्र्याचा अधिकार मर्यादित असायला हवा.

समतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यात संघर्ष किंवा तणाव आहे असे वाटते. डॉर्कीनच्या  मते त्यांच्यात कोणताही संघर्ष नाही. समानता ही नागरी आणि राजकीय स्वातंत्र्याचा आधार आहे. स्वातंत्र्य नाही असे तो मानत नाही. ज्याप्रमाणे समानतेचा हक्क आहे. त्याप्रमाणे स्वातंत्र्याचा हक्क आहे का ? या बाबत साशंकता आहे. सर्वांनाच समानतेचा अधिकार आहे असे मानले जाते. समाजात समानता असावी कोणीही व्यक्ती असो कोणत्याही थरातील असो श्रीमंत किंवा गरीब, शिक्षित किंवा अशिक्षित कोणत्याही जाती धर्म वंशाची असो प्रत्येकाला समानतेचा अधिकार आहे. प्रत्येकालाच समानतेची वागणूक मिळावी असे अपेक्षित असते. समतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यामध्ये तडजोड केली जाते. सर्वांना समान दर्जाची वागणूक मिळावी असे अपेक्षित असते आणि तो त्याचा अधिकार आहे. कायदे बनवितांना विशेषत: सामाजिक कायद्यांच्या संदर्भात स्वातंत्र्याचा अधिकार आणि समतेच्या अधिकारात तडजोड झालेली प्रकर्षाने जाणवते. कायदा बनविताना व्यक्तीच्या कृती करण्यावर मर्यादा घातली जाते. उदा. वाहतुकीच्या नियंत्रणाचे कायदे बनविताना व्यक्तीला वेगाने वाहन चालविण्याचे जे स्वातंत्र्य आहे त्याला मर्यादा घातली जाते.

डॉर्कीन महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात ज्या पद्धतीने पारंपारिक स्वातंत्र्याची व्याख्या केली जाते. त्याअर्थी स्वातंत्र्याचा अधिकार आहे का ? परमाप्रिक स्वातंत्र्याची व्याख्या डॉर्कीनने पुढीलप्रमाणे केली आहे. 'स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही व्यक्तीला जे करावेसे वाटते त्याला तसे करू देण्यासाठी राजकीय दडपणाचा अभाव असणे होय' तय्च्या शब्दातच I have in mind traditional defination of Liberty as the absense of constrain placed mind traditional defination of Liberty as the absense of constrain placed by Government Upon what a man might do it as he wants'.

या व्याख्येच्या संदर्भात वरील उदाहरण पाहिले तर असे दिसून येते की एखाद्या तरुणाला वेगाने मोटार सायकल चालवण्याची आवड आहे. तो रहदारीच्या रस्त्याने अतिशय वेगाने मोटर सायकल चालवू लागला तर त्याला वाहतूक पोलिस तसे करण्यावर मर्यादा घालतील म्हणजे त्याला तसे करण्याचे स्वातंत्र्य नाही त्यावर शासनाचे नियंत्रण आहे. त्या तरुणाच्या स्वातंत्र्याबरोबर इतर व्यक्तीच्या जीविताचे संरक्षण करणे ही महत्त्वाचे आहे. म्हणून त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातली जाते.

डॉर्कीन स्वातंत्र्याची व्याख्या समानतेच्या संदर्भात करतो. स्वातंत्र्याचा अधिकार उपभोगण्यासाठी काही इतर संसाधनांची आवश्यकता असते. एखाद्याला मतदानाचा हक्क आहे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा हे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी त्याला अन्न, आरोग्य, तो अधिकार बजावण्याचे ज्ञान वगैरे गोष्टीची गरज असते. या संसाधनावर केवल माझाच अधिकार आहे असे म्हणणे रास्त नाही. स्वातंत्र्य याचा अर्थ माझ्या बरोबरीने इतरही व्यक्तींचा संसाधानातील हिस्सा आहे त्याची जाणीव असणे आवश्यक आहे.

इसीह बर्लीनने जि स्वातंत्र्याची व्याख्या सांगितली आहे.त्यावर डॉर्कीन टीका करतो. बर्लीन स्वातंत्र्यावरील त्याच्या प्रसिद्ध निबंधात पुढील विचार मांडतो. स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही कृती करताना किंवा पर्यायांची निवड करताना अडथळयांचा अभाव असणे होय. माणसाने ज्या रस्त्यावरून चालण्याचा निर्णय घेतला आहे त्या रस्त्यावर अडथळयांचा अभाव असणे ही व्याख्या डॉर्कीनला मान्य नाही. मानवाचा बऱ्याचशा कृतीवर बंधने आणली जातात. व्यक्तीला जे हवे ते करण्याचे स्वातंत्र्य असतेच असे नाही. त्याला वाटेल ते बोलण्यापासून परावृत्त केले जाते किंवा खून करण्यावर बंधने घातली जातात. त्याच्या स्वातंत्र्यावर जी बंधने घातली जातात. याचे कारण म्हणजे दुसऱ्यांच्या जिविताचे संरक्षण करणे हे पण तितकेच महत्त्वाचे आहे ही स्वातंत्र्यावरील बंधने आपण स्वीकारतो.

अधिकार ही संकल्पना डॉर्कीनच्या मते तत्त्वज्ञानात आणि राजकारणात वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. त्याच्या मतानुसार लोकांना समानतेचा अधिकार आहे असे आपण जर मानले तर त्याचा अर्थ समानतेवर त्याचा हक्क आहे ती त्यांना मिळायलाच हवी स्वातंत्र्याच्या संदर्भात आपणास असे म्हणता येईल का ? ज्याला जे हवे ते करण्याचे स्वातंत्र्य त्यला मिळायलाच हवे का ? स्वातंत्र्याच्या अधिकाराच्या संदर्भात आपणास असे आढळते की बरेचदा जे कायदे केले जातात. या कायद्यामुळे आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा मर्यादा घातली जाते. त्या कायद्यामुळे सामाजिक कल्याण साधले जाते. म्हणून स्वातंत्र्यावर बंधने आली तरी कायद्याचे समर्थन केले जाते. प्रत्येक बंधन घालणारी कृती ही अधिकाराचे उल्लंघन करीत असते. स्वातंत्र्याचा अधिकार नाहीच असे डॉर्कीनला वाटते. स्वातंत्र्याच्या हक्काविषयीचा हक्क नसणे असे मत ते व्यक्त करतात का ? याबाबत साशंकता व्यक्त करतात. डॉर्कीन Taking Rights Seriously या आपल्या पुस्तकात व्यक्तीला स्वातंत्र्याचा हक्क नाही असे मत मांडतात. डॉर्कीन 'संसाधनांची समानता' (Equality of Sources) ही उपपत्ती मांडतात. या उपपट्टीट दोन मुद्दे प्रामुख्याने आढळतात. १) मानवाने जे आयुष्य त्याच्यासाठी निवडले आहे त्यास तोच जबाबदार आहे. २) समाजातील संसाधनांचे वितरण हे व्यक्तीच्या बुद्धिमत्तेवर किंवा

क्षमतांवर अवलंबून नसावे किंवा व्यक्तीच्या बुद्धिमत्तेच्या, क्षमतांचा परिणाम संसाधनांच्या वितरणावर होऊ नये. समाजात प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा असावा. ह्या समतेच्या मूल्यांवर डॉर्कीन भर देतात.

डॉर्कीनच्या मते 'समता' आणि 'स्वातंत्र्य' या मूल्यांमध्ये कोणताही संघर्ष नाही. एखाद्या व्यक्तीला दुसऱ्याचा खून करण्यापासून परावृत्त केले तर त्याचा अर्थ असा होत नाही कि त्याच्या (खून करण्याऱ्या व्यक्तीच्या) स्वातंत्र्याला बाधा आणली. चुकीचे कृत्य करण्यापासून परावृत्त करणे म्हणजे त्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले असा त्याचा अर्थ होत नाही. तो पर्यंत आपल्या एखाद्या कृतीमुळे इतरांना बाधा येत नसेल, म्हणजेच इतरांचे नुकसान होत नसेल तर ते स्वातंत्र्य आहे. इतरांच्या हक्कावर आपल्या स्वातंत्र्यामुळे अडथळा येऊ नये व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी काही घटकांची आवश्यकता असते. समाजात स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठीची अनुकूल परिस्थिती म्हणजे व्यक्तीच्या प्राथमिक गरजांची पुर्ती किंवा योग्य कायदेप्रणाली वगैरे असणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) रोनाल्ड डॉर्कीन यांची स्वातंत्र्याविषयीची संकल्पना स्पष्ट करा.

## २.३ इसीह बर्लीन (१९०९-९७)

इसीह बर्लीन हा ब्रिटीश तत्त्वज्ञ होता. त्याचा जन्म १९०९ साली रीगा (आत्ताची लॅटव्हीआ ची राजधानी) येथे झाला. त्याचे वडील मेन्डेल बर्लीन लाकडाचे मोठे व्यापारी होते. १९१५ साली रशियामधील अन्ड्रेपोल येथे, नंतर १९१७ साली पेट्रोग्राड येथे त्यांच्या कुटुंबियांनी स्थलांतरण केले. १९१७ सालच्या रशियन क्रांतीचे ते साक्षीदार होते. १९२० साली सर्व कुटुंबीय ब्रिटनला गेले आणि लंडनच्या जवळपासच ते राहिले. इसीह बर्लीनचे महाविद्यालयीन शिक्षण ऑक्सफर्डच्या ख्रिस्ती कॉलेजमध्ये झाले. तेथे त्यांनी तत्त्वज्ञान आणि अर्थशास्त्राचा अभ्यास केला. १९३२ साली New College येथे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्यांनी न्यूयॉर्क शहर आणि वॉशिंग्टन DC येथे ब्रिटिश एम्बसीमध्येही कार्य केले होते. अमेरिकेतल्या विद्यापीठामध्येही त्यांच्या नियमित भेटी असाव्यात.

१९७४ ते १९७८ या कालावधीत ते ब्रिटिश ॲकॅडमीचे अध्यक्ष होते. त्यांना त्यांच्या नागरी स्वातंत्र्याच्या कार्यासाठी अनेक पुरस्कार प्राप्त झाले होते. १९९७ साली त्यांचा मृत्यू झाला.

## २.४ इसीह बर्लीनची स्वातंत्र्याची संकल्पना

इसीह बर्लिनचा १९५८ साली 'Two concepts of Liberty' हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखाने राजकीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात जबरदस्त प्रभाव पाडला तसेच बरेच दिवस हा लेख चर्चेत होता. राजकीय स्वातंत्र्याच्या सैद्धांतिक चर्चेमध्ये बर्लीनच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

१९५८ साली बर्लीनने 'Two concepts of Liberty' वर व्याख्यान दिले होते. नंतर 'Four Essays on Libert' या नावाने ते १९६९ साली प्रकाशित झाले. स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना – सकारात्मक संकल्पना (Possitive Liberty) आणि नकारात्मक संकल्पना (Negative Liberty) बर्लीन मांडतो, या दोहोतील फरक स्पष्ट करतो. सकारात्मक संकल्पना ही स्वायत्ततेशी (Autonomy) निगडित आहे, तर नकारात्मक संकल्पना ही दुसऱ्यांनी केलेल्या जोरजबरदस्तीच्या अभावाशी निगडित आहे. १९६९ मध्ये त्यांनी या दोन्ही संकल्पना पुन्हा नव्याने मांडल्या. बर्लीन नकारात्मक स्वातंत्र्याची व्याख्या करताना सांगतो कि स्वातंत्र्य म्हणजे (इच्छांना मारल्यामुळे निर्माण झालेल्या) केवळ अभाव नव्हे, तर कृती करण्यास येणाऱ्या अडथळयाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य या नकारात्मक संकल्पनमध्ये कृतीच्या संधीवर तो भर देतो. चार्ल्स टेलर यालाच, Opportunity concept' म्हणतो. सकारात्मक संकल्पना म्हणजे उद्दिष्ट पूर्तीसाठी समाजाची असणारी क्षमता.

### २.४.१ स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना (अभावात्मक स्वातंत्र्य) :

साधारणपणे जेव्हा कोणीही व्यक्तीच्या कृतीत हस्तक्षेप करत नाही. म्हणजे ती व्यक्ती जेव्हा आपल्या कोणत्याही क्षेत्रात हस्तक्षेपाविना कार्य करते. जर एखाद्या व्यक्तीला जे करावयाचे आहे , त्यापासून त्याला रोखले जात असले तर ती व्यक्ती स्वतंत्र नाही आणि जर मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात रोखले जात असेल तर त्याला जबरदस्ती म्हणावी लागते. किंवा ती गुलामगिरी झाली. बर्लीन जबरदस्तीची संकल्पना स्पष्ट करताना शारिरीक क्षमतेपेक्षा मर्यादेबाहेर जाऊन आपण काही गोष्टी करू शकत नाही. त्याला जबरदस्ती म्हणता येणार नाही. उदा-जर एखादी व्यक्ती आंधळी असेल तर ती वाचन करू शकत नाही. जबरदस्ती याचा अर्थ व्यक्ती हेतूपूर्वक दुसऱ्या व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करतो. त्यामुळे तो वेगळ्याच पद्धतीने वागतो. त्याला हवे ते उद्दिष्ट कोणी साधु शकत नसेल तर त्याला राजकीय स्वातंत्र्याचा अभाव असे म्हणणे योग्य नाही.

बऱ्याचशा राजकीय तत्त्वज्ञांचे हेच विचार आहेत. अर्थातच या स्वातंत्र्याच्या कृतीचे क्षेत्र विस्तृत आहे. याबाबतीत मतभेद आहेत विचारवंतानी असे गृहीत धरले की, व्यक्तीच्या कृतीचे क्षेत्र हे कायद्याद्वारे मर्यादित असते. काहीजण विशेषत: Liberiarian's असतात. उदा-लॉक, मिल्ल आणि इतर काही विचारवंतांच्या मते निदान प्रत्येकाच्या व्यक्तीगत स्वातंत्र्याचे असे काही मर्यादित क्षेत्र असते की ज्याचे उल्लंघन होवूच शकत नाही आणि त्याचे उल्लंघन झाले तर व्यक्तीला स्वतःच्या क्षमतांचा विकास करता येणार नाही. परिणामी आपली उद्दिष्ट्ये साध्य कार्य येणार नाही.

### २.४.२ स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना (भावात्मक स्वातंत्र्य) :

प्रत्येक व्यक्तीला असे वाटते की तोच तिच्या जीवनाचा शिल्पकार असावा साधारणपणे व्यक्तीची अशी इच्छा असते की तोच तिच्या आयुष्याचा मालक असावा त्याला त्याच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेता यायला हवे याच विचारावर बर्लीनची सकारात्मक संकल्पना आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीकडे असणाऱ्या बुद्धीमुळे विचार शक्तीमुळे तो इतर जगापासून वेगळा आहे असे मानतो. प्रत्येक व्यक्ती विचार करू शकते आणि स्वतःच्या

निर्णयाची जबाबदारी देखील घेवू शकते. स्वतःच्या मर्जीचे मालक असण्याचे स्वातंत्र्य आणि ज्याला जे हवे ते त्याला करू देण्याचे स्वातंत्र्य या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहे. त्याला हवे ते करण्यापासून इतरांनी प्रतिबंध करू नये. इतरांच्या जबरदस्ती पासूनचे स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना होय.

बर्लीन प्रश्न उपस्थित करतो मी इतरांचा गुलाम नाही, असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा तो म्हणतो मनुष्य हा निसर्गाचा गुलाम आहे का ? किंवा त्याच्या भवनाचा किंवा वासनांचा गुलाम आहे का ? म्हनुंचा तो पूर्णपणे स्वतंत्र आहे का ? स्वतःचे स्वरूप तो जाणू शकतो का ? त्याचे स्वरूप आणि तो प्रत्यक्षात जे आहे त्यात मोठी तफावत असू शकते हे स्वरूप जाणण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्याची आवश्यकता असते.

बर्लीनशी स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना स्वातंत्र्याचे क्षेत्र नेमके काय आहे. याचे स्पष्टीकरण करते. कोणत्या अशा क्षेत्रात व्यक्ती इतरांच्या व्यत्ययाशिवाय कार्य करू शकते या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करते स्वातंत्र्य म्हणजे इतरांच्या व्यत्ययाशिवाय कार्य करणे. कृती करण्याच्या स्वातंत्र्यावर जी बंधने घातली जातात ती दुसऱ्या कोणा व्यक्ती किंवा अनेक व्यक्तींद्वारे घातली जातात. स्वातंत्र्यावर सकारात्मक आणि नकारात्मक संकल्पना या परस्परविरोधी आहेत असे मत मांडतो. सकारात्मक संकल्पना म्हणजे व्यक्तीला स्वतंत्रपणे स्वतःची उद्दिष्ये गाठण्याचे स्वातंत्र्य, प्रत्येकाला स्वतःच्या जीवनाचे मालक आपणच असावे अशी एक इच्छा असते. स्वातंत्र्याची नकरात्मक संकल्पना म्हणजे स्वतःच्या इच्छांवर इतरांकडून जी बंधने (constraints) लादण्यात येतात त्याचा अभाव असणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. म्हणजे इतरांच्या हस्तक्षेपापासून (interference) असणारे स्वातंत्र्य नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे अडथळे, बंधने यांचा अभाव असणे. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे कृती करणे आणि अशा पद्धतीने कृती करणे कि ज्याद्वारे स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण मिळविता येईल. तसेच व्यक्तीची ध्येये किंवा उद्दिष्ये गाठता येतील. स्वातंत्र्याची नकारात्मक व्यक्तीशी म्हणजेच संबंधित कार्त्याशी संबंधित आहे. तर सकारात्मक संकल्पना ही व्यक्ती एक गटाचा सदस्य या दृष्टिने पाहते.

आजच्या आधुनिक युगात स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे परीक्षण करण्याची गरज आहे. जगातील सर्वच देशात दहशतवाडची समस्या भेडसावत आहे. संशयित दहशतवाद्याला घटनेद्वारे नागरिकांचे हक्क मिळाले आहेत कारण तो देशाचा नागरिक आहे. परंतु जर त्याच्या कृत्यामुळे इतरांना धोका पोहोचणार असेल तर त्याच्या स्वातंत्र्यावर मर्यादा किंवा बंधने घालणे आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) इसीह बार्लीन यांची स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट करा.

## २.५ अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन : मार्टिन ल्युथर किंग

डॉ.मार्टिन ल्युथर किंग (१५ जानेवारी १९२९ ते ४ एप्रिल १९६५) हे अमेरीकेतील निग्रोचे नेते होते. अमेरीकेत वर्ण, वंशभेदाच्या विरीद्ध आंदोलन उभे करून निग्रोना न्याय, समानता यांच्या हक्कासाठी अमेरिकेत सत्याग्रहाने लढा उभा केला. डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांचा जन्म एका धार्मिक कुटुंबात झाला. त्यांचे वडील धर्मगुरू होते. भोवतालच्या अन्यायाविरुद्ध समाजमन तयार करण्यात किंगचे वडील प्रयत्नशील असतं. वडिलांचाच प्रभाव मार्टिन ल्युथर किंगवर पडला. पुढे महाविद्यालयाच्या उंबरठयावर असताना त्यांच्या वाचनात अनेक क्रांतिकारक वैचारिक ग्रंथ आले. हेन्री, थोरो, रस्किन आणि टॉलस्टॉय यांच्या ग्रंथांनी त्यांच्या आंतरयामी हृदयात वादळे निर्माण झाली. भोवतालच्या समाजातील दुष्टप्रवृत्ती नष्ट करण्यासाठी त्यांना जाणीव झाली. याचवेळी भारतातील एक अहिंसक परंतु प्रबळ व्यक्ती म्हणून म. गांधींच्या नावाची चर्चा सर्व जगभर होऊ लागली. गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा प्रभाव डॉ. मार्टिन ल्युथर किंगवर पडला. महात्मा गांधींनी अवलंबिलेल्या पद्धतीचा अमेरीकेतील निग्रोचा लढा उभा करायचा असे त्यांचे मत महात्मा गांधीजींच्या विचारांशी जुळले गेले. भारतातील जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेले प्रश्न हे अमेरिकेतील गुलामगिरीएवढेच भयानक स्वरूपाचे होते. एक वर्ग दुसऱ्या वर्गाचे शोषण करून त्याचे जगणे नष्ट करून टाकतो. माणसेच माणसाचे पंख छाटून हे दु:ख महात्मा गांधीजींचे होते. तसेच निग्रोंना गुलामगिरीने वागवून त्यांची पिळवणूक करणाऱ्या गोऱ्याचीही वागणूक दु:खदायक होतो. हे दु:ख मार्टिन ल्युथरचे होते.

डॉ.मार्टिन ल्युथर किंगने “बर्मिंगहॅम” येथे वांशिक वर्णभेदावर १९६३ मध्ये सत्याग्रह केला. महात्मा गांधीजींच्या कार्यांची स्फूर्ती घेऊन सत्याग्रहाची तंत्रे अवलंबिली. त्यांनी आपल्या सत्याग्रहाला शालेय विद्यार्थी सामील करून घेतले. डॉ. किंग यांनी अमेरिकेतील स्वातंत्र्य चळवळीच्या इतर नेत्याबरोबर चर्चा केलीं आणि वॉशिंग्टन येथे दोन लख नागरिकांना समतेची वागणूक मिळाली पाहिजे. त्याचवेळी मार्टिन ल्युथर किंग यांनी केलेले भाषण उल्लेखनीय आहे. ते म्हणतात : स्वातंत्र्य कोणीही आपणहून देत नाही. दडपलेल्या जनतेला ताठ मानेने उभे राहून ते स्वातंत्र्य मागावे लागते. १९६४ मध्ये अमेरिकेच्या कायदेमंडळाने समान नागरी हक्काचा कायदा संमत केला. सार्वजनिक ठिकाणी वाहनातून वर्णभेद रद्द करण्याचे तसेच सरकारच्या सरकारी सवलती व नोकऱ्यामध्ये जागा देण्याची मागणी मांडली. गोऱ्यांबरोबर काळ्या म्हणजे इतर लोकांनाही हक्क मिळाला.

डॉ. मार्टिन ल्युथर किंग म्हणतात की, काळे लोक स्वातंत्र्य आणि न्याय मिळाल्यावाचून गप्प बसणार नाहीत. असा डॉ.किंग यांचा आत्मविश्वास पूर्ण झालेला होता. त्यांनी अमेरिकेत महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीच्या तंत्रातून नागरी हक्कांच्या चळवळीला एक वेगळी प्रेरणा त्यांना मिळाली. त्यावेळेस किंगच्या घरांवर गोऱ्यांनी बॉम्बने हल्ले केले. कौटुंबिक सुरक्षितता धोक्यात येऊनही किंग यांनी माघार घेतली नाही.

यावरून त्यांनी काळ्या व गोऱ्यांच्या वसाहती ज्या वेगळ्या होत्या टांच्या विरुद्ध प्रचार करून वर्णभेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

डॉ.किंग यांच्या मतानुसार कोणत्याही अहिंसक पद्धतींमध्ये प्रामुख्याने चार घटक किंवा पायऱ्या असतात, त्या पुढीलप्रमाणे –

१) वस्तुस्थितीची माहिती गोळा करने, खरोखरच अन्याय झाला आहे की नाही या संदर्भात सर्व प्रकारची माहिती गोळा करणे.

२) शासन किंवा अधिकारी वर्ग यांच्याशी त्या संदर्भात चर्चा करणे.

३) डॉ.मार्टिन ल्युथर किंगनी जी सुचिता सांगितली आहे, त्याचा अर्थ असा घेता येईल की, कायदेभंग करण्यामागे स्वार्थी हेतु नसावा, तर त्यातून समाजाचे हित साधले जावे. समाजाच्या कायद्याला त्यात महत्त्व दिले जावे.

४) प्रत्यक्ष कायदेभंग करताना प्रत्यक्ष कृतीत अपेक्षित आहे. धरणे, निदर्शने, उपोषण या सारख्या कृतींद्वारे शासनाचे लक्ष वेधले जाते.

जेव्हा कायदा हा अन्यायकारक असतो, समजतील विषमता वाढीस लावतो तेव्हा अशा कायद्याचे पालन करण्यापेक्षा तो कायदा मोडणे योग्यच ठराव. डॉ.मार्टिन ल्युथर किंग प्रत्यक्षात बर्मिंग हॅम येथील वस्तुस्थिती सांगतात की, तेथे वांशिक भेदामुळे सातत्याने निग्रो जमातीवर अन्यायच झाला आहे. निग्रोंना अन्यायकारकच वागणूक मिळाली. त्यांच्या घरावर व चर्चवर बॉम्ब टाकण्यात आले म्हणून ज्या कायद्याने त्यांना असमानतेची वागणूक मिळत आहे. त्यांच्यावर अन्याय होत आहे. अशा कायद्याचे पालन न करणे नैतिकदृष्ट्याही योग्य ठरते. म्हणून डॉ.मार्टिन ल्युथर किंग कायद्याचे न्याय व अन्यायकारक कायदा असे दोन प्रकार करतात.

न्याय व अन्यायकारक कायदा यातील फरक स्पष्ट करताना डॉ.मार्टिन ल्युथर किंग सांगतात की, अन्यायकारक कायदा किंवा नियम असा की बहुसंख्याकांच्या गटाने अल्पसंख्याक गटावर लादलेला असतो व अल्पसंख्याकांनी त्याचे पालन करणे बंधनकारक असते. परंतु बहुसंख्यांच्या गटावर असे बंधन नसते. अशा फरकाला कायदेशीर मान्यता मिलालेई नसते. याउलट न्यायकारक जो बहुसंख्यांकांनी बनविलेला नियम अल्पसंख्यांकावर बंधनकारक असतो. परंतु त्या नियमांचे पालन करण्याची त्यांची ही तयारी असते. अशा समानतेला कायदेशीर मान्यता असते. अल्पसंख्यांकावर लादलेला अधिकार नसतो किंवा कोणतेही स्थान नसते. उदा. निग्रोना मतदानाचा हक्क देण्यात आला नव्हता. त्यामुळे शासन कारभारात ते भाग घेऊ शकत नव्हते.

महात्मा गांधींनी व डॉ.मार्टिन ल्युथर किंग सविनय कायदेभंगात अहिंसात्मक मार्गाचा अवलंब केला आहे. कायदा हा अनैतिक असल्याने त्याला विरोध केला जात आहे. त्यांनी साधन सुचितेला महत्त्व दिले आहे. दोघांनीही प्रेमाची ताकद ओळखली होती. डॉ.मार्टिन ल्युथर किंग म्हणतात, “अंधार अंधाराला दूर करू शकत नाही तर प्रकाश

अंधाराला दूर करू शकतो. त्याप्रमाणेच द्वेष दोषाला नाहीसे करू शकत नाही. तर प्रेमाचा ते करू शकते.

१९६७ मध्ये न्युयॉर्कला बहरलेल्या शांतता सभेत व्हिएतनाम युद्धाला विरोध दर्शविण्यासाठी सर्व वर्णियांचे संयुक्त आंदोलन डॉ.किंग यांनी उभारले. तसेच अमेरिकेतील समान नागरी हक्काच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा पाया घातला. अहिंसात्मक प्रतिकार आंदोलनाचा पुरस्कर्ते म्हणून डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांचे कार्याचा अभ्यास करीत असताना महात्मा गांधीजींची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह तत्त्वज्ञानाचा डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांनी अभ्यास करून त्यातून स्फूर्ती घेतली आणि वांशिक वर्ण भेदाबरोबरचे आंदोलन, अहिंसा, सत्य आणि अहिंसात्मक प्रतिकारशक्ती या मार्गाने व सत्याग्रह तंत्राने सुरु केले. त्यांनी काळ्या लोकांना मानव अधिकार मिळवून दिले. त्यांच्यात जागृती निर्माण केली.

डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांना नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांच्या कार्यामुळे त्यांना हा बहुमान मिळाला आहे. लोकशाही म्हणजे, लोकांच्या करिता त्यांनी चालवलेले राज्य. सदाचार, न्याय प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. सर्व अमेरीकन लोकांना आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि वांशिक समता मिळणारच अशा आत्मविश्वासाने महात्मा गांधीजींची स्फूर्ती घेऊन सत्याग्रही चळवळी केल्या आणि त्यात ते यशस्वी झाले. ४ एप्रिल १९६८ मध्ये ते 'टेनेटी' राज्यात स्वच्छता कामगारांच्या संपाला पाठिंबा देण्यासाठी गेले होते. तेथे एका हॉटेलच्या बाल्कनीत डॉ.मार्टिन ल्युथर किंग उभे असताना अमेरीकेतील द. भागातील गोऱ्या वंशाच्या नागरिकाने नेमून अर्ल रे या व्यक्तीने डॉ. किंग यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यातच त्यांचा अंत झाला. किंगच्या या मारेकऱ्याला ९९ वर्षे कैदेची शिक्षा झाली. अगदी तसेच गांधीजींचा मारेकरी नथुराम गोडसे यानेही गोळ्या झाडून सायंकाळी प्रार्थनेला जात असताना त्यांचा खून केला. दोन्ही महान समाज सुधारकांचा अंत गोळ्यांनी झाला.

**आपली प्रगती तपासा :**

१) डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांच्यावर कोनाच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला होता ?

२) डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांच्या सविनय कायदेभंगाच्या तंत्राचे विश्लेषण करा.

## २.६ सारांश

स्वातंत्र्य हे प्रत्येकाला हवे हवेसे वाटते परंतु डॉरकीन म्हणतो की, आपणास स्वातंत्र्याचा अधिकार आहे काय ? तर त्याचे उत्तर स्वातंत्र्याचा अधिकार हा केवळ राजकीय अधिकार नाही. स्वातंत्र्याचा मर्यादित असायला हवा. डॉरकीन स्वातंत्र्याची व्याख्या समानतेच्या संदर्भात करतो. स्वातंत्र्याचा अधिकार उपभोगण्यासाठी काही इतर संसाधनाची आवश्यकता असते. स्वातंत्र्य याचा अर्थ माझ्या बरोबरीने इतरही व्यक्तींचा संसाधानातील समान हिस्सा आहे त्यांची जाणीव असणे.

बर्लीन स्वातंत्र्याची संकल्पना दोन रितीने मांडतो. सकारात्मक स्वातंत्र्याची सकारात्मक आणि नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना एखादी व्यक्ती कार्य करीत असेल तर तिला रोखले गेले तर ती जबरदस्ती होते. पण आपल्या शारिरीक क्षमतेपेक्षा मर्यादेबाहेर जाऊन आपण काही गोष्टी करू शकत नाही, त्याला जबरदस्ती म्हणता येत नाही.

व्यक्तीला कृती करण्यास कोणत्याही अडथळयांचा, बंधनाचा, मर्यादांचा अभाव असणे म्हणजे स्वातंत्र्य ही स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना तर सकारात्मक संकल्पनेत प्रत्येक व्यक्ती विचार करू शकते. इच्छा करू शकते. स्वतःच्या मर्जीचे मालक असल्याचे स्वातंत्र्य आणि ज्याला जे हवे ते त्याला करू देण्याचे स्वातंत्र्य आहे. या दोन महत्त्वाच्या संकल्पना आहेत.

गांधीजींच्या सविनय कायदेभंगाचा विचार डॉ.मार्टिन ल्युथर किंग यांनी अमेरीकेत अवलंबिला आणि निग्रोंना न्याय मिळवून दिला. या सविनय कायदेभंगाचा आधार घेऊन त्यांनी अमेरीकेतील कायदेमंडळाला धक्का दिला. ते म्हणतात, वांशिक भेदामुळे सातत्याने निग्रो जमातीवर अन्यायच झाला आहे. त्यांना अन्यायकारक वागणूक मिळाली आहे. अशा कायद्याचे पालन न करणे नैतिकदृष्टया योग्य ठरते. प्लेटोने आपल्या क्रिप्टो या ग्रंथात कायद्याचे पालन करावे की करू नये याचे विचार मांडले आहेत. जेव्हा एखादा कायदा अन्यायकारक किंवा नैतिकदृष्ट्या अनैतिक असेल तर कायदा न पाळणे योग्य ठरेल. लोकशाहीत बहुसंख्य लोकांचे मत महत्वाचे असते. त्यांच्या समोर कायदा अन्यायकारक कसा आहे हे सांगणे गरजेचे आहे.

म. गांधीजींनी इंग्रजांच्या विरुद्ध लढा देण्यासाठी साविनात कायदेभंग या तंत्राचा अवलंब केला. सविनय म्हणजेच विनयाने, अहिंसा, सत्य, सहनशीलता या मार्गाने आपल्यावर लादलेल्या अन्यायी कायद्याचे पालन करावयाचे नाही. म्हणजेच कायदे नाकारताना समोरच्याचे नुकसान होणार नाही. याची काळजी घ्यावी. म. गांधीजींनी सविनय कायदेभंगाचा जो पुरस्कार केला होता. त्याचे अहिंसक मार्ग हे वैशिष्टय आहे.

## २.७ दीर्घोत्तरी प्रश्न

१) स्वातंत्र्याचा हक्क विषयीचा हक्क नसणे असे रोनाल्ड डॉरकीनची संकल्पना स्पष्ट करा.

२) स्वातंत्र्याचा हक्क विषयीचा नसणे असे रोनाल्ड डॉरकीन यांनी केलेल्या विधानाच्या संदर्भात स्वातंत्र्याची संकल्पना मांडून तुमचे विचार स्पष्ट करा.

३) स्वातंत्र्य म्हणजे काय ते सांगून बर्लीन यांची स्वातंत्र्याची भावात्मक व अभावात्मक संकल्पना स्पष्ट करा.

४) बर्लीनने सांगितलेल्या दोन स्वातंत्र्याच्या संकल्पना स्पष्ट करून त्यामध्ये काही संबंध आहे का ? याविषयी तुमचे विचार मांडा.

५) टीपा लिहा.

१. स्वातंत्र्याची सकारात्मक संकल्पना (भावात्मक स्वातंत्र्य)

२. अभावात्मक स्वातंत्र्य-बर्लीन

३. समतेचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क – डॉरकीन

६) डॉ. मार्टिन ल्युथर किंगचे नागरी हक्क चळवळीविषयीचे विचार सविस्तर स्पष्ट करा आणि अहिंसक सविनय कायदेभंगाचे समर्थन कसे करतो ते सांगा.

७) सविनय कायदेभंग म्हणजे काय ? प्लेटो 'क्रिप्टो' या संभाषणात्मक ग्रंथाच्या आधारे कायद्याचे निरपेक्ष पालन झाले पाहिजे अशी मागणी का करतो ते सविस्तर स्पष्ट करा.

८) सविनय कायदेभंगविषयक म. गांधीजींचे विचार सुस्पष्ट करा.

९) सविनय कायदेभंग या तंत्राची म.गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात माहिती द्या.

१०) टीपा लिहा.

१. डॉ.मार्टिन ल्युथर किंगची वांशिक वर्णभेदाविरुद्ध चळवळ.

२. कायद्याचे निरपेक्ष पालन : प्लेटोचा दृष्टिकोन.

३. सविनय कायदेभंगविषयक म. गांधीजींचे विचार.

❖❖❖❖

# ३

## समता (EQUALITY)

**घटक रचना :**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ समता

३.३ सर्वोदय

३.४ सारांश

## ३.० उद्दिष्टे

१. समानतेची आधुनिक संकल्पना समजावून घेणे.

२. व्यक्तिस्वातंत्र्य व नागरिकांच्या हक्काबद्दल जाणून घेणे.

३. समता म्हणजे नेमकं काय ? याचा विचार करणे.

४. समतेचे प्रमुख प्रकार समजावून घेणे.

५. सर्वोदयविषयी विचार करणे.

६. सर्वोदयाच्या तत्त्वांचा सारासार विचार करणे.

७. सर्वोदयाच्या फायद्याविषयी चर्चा करणे.

८. सर्वोदयाच्या दोषांचा विचार करणे.

## ३.१ प्रस्तावना

मानव हा सामाजिक प्राणी असल्याने तो एकटा राहू शकत नाही. म्हणून दोन किंवा दोनपेक्षा जास्त मानव एकत्र येतात, तेव्हा त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे संबंध (Relationship) निर्माण होतात. या संबंधांना (Relationship) समाज म्हणतात. जेव्हा समाज निर्माण होतो, तेव्हा मानवी वेगवेगळ्या प्रकारच्या स्वभावामुळे अनेक प्रकारचे भेद निर्माण होतात. हे भेद नष्ट करून मानवी जीवनामध्ये सुदृढता आणणे म्हणजेच समानता होय. या समानतेमधून सर्वांचा सर्वांगीण विकास शक्य होतो. त्यासच सर्वोदय म्हटले आहे. थोडक्यात अनेक प्रकारच्या समानतेमधून सर्वोदय शक्य होता.

## ३.२ समता

समानतेची आधुनिक संकल्पना सतराव्या शतकात प्रस्तुत झाली. शास्त्रीय संशोधनानंतर तिचे विकसित रूप निर्माण झाले. 'समता' या संकल्पनेची सर्वप्रथम मांडणी जॉन लॉक या ब्रिटिश तत्त्वज्ञाने केली. मानवाची पहिली अवस्था नैसर्गिक अवस्था असून या अवस्थेत सर्व माणसे स्वतंत्र होती आणि सर्वांचे हक्कही समान होते. प्रत्येक व्यक्तीला आपले व्यवहार मनसोक्तपणे पूर्ण करण्याचे श्रेष्ठ सत्ता नव्हती. व्यक्तीच्या स्वातंत्र्याला मर्यादा फक्त नैसर्गिक कायद्याची होती. नैसर्गिक स्वातंत्र्याचा अर्थ आपण आपल्या आणि बांधवांच्या जीविताचे रक्षण करावे आणि कोणीही इतरांचे स्वातंत्र्य व सत्ता हिरावून घेण्याचा प्रयत्न करू नये, असे लॉक म्हणतो. लोकांतून नियुक्त झालेले शासन न्याय होय. टॉमस जेफर्सन हा जॉन लॉकचा अनुयायी होता. जॉन लॉकच्या समानतेच्या तत्त्वाचा पुरस्कार टॉमस जेफर्सनने अमेरिकेच्या १७७६ च्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात उघडपणे केला. त्यात मानवी हक्काचे संरक्षण हाच प्रमुख हेतू होता.

फ्रान्सचा व्यक्तिस्वातंत्र्याचा व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा १७८९ मध्ये प्रसिद्ध होऊन समानता या तत्त्वास प्राप्त झाले. फ्रान्सच्या क्रांतीमागे मानवी हक्काची प्रेरणा होती. १९ व्या शतकात १८७० नंतर अमेरिकेत १५ व्या घटनादुरुस्तीने गुलामांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. पुढे गुलामांना पूर्ण स्वातंत्र्य, तसेच स्त्रियांना समानता या गोष्टी २० व्या शतकात २३ व २४ व्या घटनादुरुस्तीने प्रदान करण्यात आल्या. त्यामुळे श्रीमंत आणि गरीब, कृष्णवर्णीय आणि गौरवर्णीय किंवा स्त्री-पुरुष असा भेद कायद्यानुसार राहिला नाही.

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्राद्वारे मानवी हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला होता. त्यामुळेही समानतेच्या मुल्यास गतिमानता प्राप्त झाली. संयुक्त राष्ट्रांमार्फत दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदावर टीका सुरु झाली. विषमतेविरुद्ध खंबीरपणे पावले टाकली गेली. त्यामुळे जागतिक लोकमत प्रभावित झाले. भारताच्या संविधानात अंतर्भूत झालेल्या मानवी हक्कात समानतेचे महत्त्व प्रतिपादन केले असून व्यक्तीचे मुलभूत अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी शासकीय यंत्रणा कटीबद्ध आहे.

धर्म, वर्ण, जात, संपत्ती यावरून भेदभाव न करता सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. यालाच सामाजिक समता म्हणतात. तसेच राजकीय समता प्रतिनिधिक लोकशाहीचे मुख्य तत्त्व आहे. सर्व नागरिकांना राजकीय अधिकार प्राप्त करून घेण्याची समान संधी मिळाली पाहिजे, नागरिकांना आपल्या हक्काचे, अधिकाराचे संरक्षण करता आले पाहिजे, राज्यभरात सर्व नागरिकांना समान संधी असणे हे राजकीय समतेचे प्रमुख लक्षण होय.

श्रम केल्याशिवाय कोणालाही जगण्याची संधि मिलता कामा नये आणि जो श्रम करेल त्याला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे, या दोन महत्त्वाच्या बाबींचा आर्थिक समतेशी संबंध आहे. कारण समता म्हणजेच न्याय. ज्या समाजात विषमता असेल, तेथे न्याय असू शकत नाही.

ॲरिस्टॉटल हा प्रसिद्ध तत्त्वज्ञ म्हणतो की, विषमतेमुळे क्रांती होते. अति दारिद्रय किंवा अति संपत्तीमुळे माणसाचा नैतिक अध:पात होतो. राज्यकारभारात इतरांप्रमाणे आपणास समान संधी आणि समान हक्क मिळाले पाहिजेत, ही इच्छा क्रांतीच्या मागे असते. इतरांपेक्षा आपल्याला कमी लेखले जाते अशी कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गाची भावना दृढ होऊ लागली की, त्यातून राजकीय उठाव होतो. विषमतेचे शल्य समाजात दीर्घ काळ बोचत राहिल्यास ती गोष्ट समाजाला विघातक ठरते. सामाजिक क्षेत्रातील विषमता मानवनिर्मित असते. म्हणून ती दूर करण्याचे प्रयत्न माणसानेच केले पाहिजेत, हे तत्त्व समानतेच्या संदर्भात महत्त्वाचे आहे. २०व्या शतकातील इतिहासाचा अनन्यार्थ म्हणजे समानतेच्या तत्त्वाचा शोध होय. यासाठी लोकांनी लढा दिला, मरण पत्करले आणि हे तत्त्व मिळवून लोकशाही दृढमूल केली. या काळात समानता ही सामाजिक चळवळीमागील प्रमुख प्रेरणा होती. तिने युरोप खंडाला झपाटून टाकले आणि युरोपीय देशातील साम्यवादी चळवळीलाही स्फूर्ती दिली. यामुळे स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता समान संधी देण्याचे समतातत्त्व विधीवत सर्व मान्य झाले असले, तरी व्यवहारात पूर्ण समानता दिलेली दिसत नाही.

समता म्हणजे विविधतेचा अभाव नव्हे. समाजात गुणांची, प्रवृत्तीची आणि आविष्काराची विविधता आवश्यक असते. त्यातूनच प्रगती होते. त्याचप्रमाणे समता म्हणजे निर्जीव साचेबंदपणाही नव्हे. साचेबंदपणामुळे स्वतंत्र विचाराची गळचेपी होते आणि समतेचे उद्दिष्ट विफल ठरते. व्यक्ती-व्यक्तीतील बुद्धिमत्ता व बौद्धिक क्षमता, कार्यकुशलता वगैरे लक्षात न घेता कोणत्या तरी वास्तवतत्त्वाच्या पायावर आणि भावनात्मक पद्धतीने समतेचे तत्त्व आर्थिक क्षेत्रात लागू करणे अव्यवहार्य व अशक्य आहे. अशा सर्व व्यक्तींना त्यांच्या कुवतीनुसार व कार्यकुशलतेनुसार वेतन मिळणे हा हक्क नाकारता येणार नाही.

**समता (Equality):**

राजकीय विचारात १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता व बंधुता यातील तत्त्वांची घोषणा केली. प्रत्येक व्यक्ती जन्मतः स्वतंत्र असून तिला स्वातंत्र्याचा व समतेचा अधिकार असतो, असे फ्रेंच राज्यक्रांतीच्या घोषणेत स्पष्टपणे म्हटले आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेद्वारे सर्व लोक समान आहेत, हे स्पष्ट केले आहे. भारतीय राज्यघटनेत समता या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे.

**समता म्हणजे काय ? :**

दैनंदिनी जीवनात समता म्हणजे सारखेपणा किंवा समान वागणूक असा अर्थ घेतला जातो. परंतु असा संकुचित अर्थ विचारात न घेता व्यापक दृष्टिकोणातून राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादी विविध क्षेत्रांत समानता निर्माण करणे म्हणजे समता होय. समता ही एक अमूर्त संकल्पना असून संपूर्ण समता प्रस्थापित करणे ही अशक्य गोष्ट आहे. समता निर्माण व्हावी किंवा समता प्रस्थापित व्हावी, हे ध्येय मानवाने स्वीकारले आहे. तो एक राजकीय आदर्श आहे. समता हे सामाजिक मूल्य आहे.

**व्याख्या :**

समता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे होय. राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रांतील विषमता नष्ट करून सर्वांना समान वागणूक देणे, सर्वांना विकासाची समान संधी देणे म्हणजे समता होय.

प्रा. लास्की यांच्या मते, "समता ही मूलत: समतलनप्रक्रिया (Levelling) आहे. याचा अर्थ असा की, जोपर्यंत समाजात व्यक्तीला विशेषाधिकार मिळत राहतील, तोपर्यंत समता प्रस्थापित होणार नाही. म्हणून जन्म, जात, वंश, भाषा, संपत्ती यांच्या आधारे समाजातील व्यक्तींना जो विशेषाधिकार दिले जातात. ते नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करणे आवश्यक आहे."

"समता म्हणजे विशेषधिकारांची अनुपस्थिती आणि सर्वांना योग्य प्रकारची समान संधि देणे होय."

**समतेचे प्रमुख प्रकार :**

i) Numerical Equqlity (संख्यात्मक समानता)

ii) Proportional Equality (अनुपातिक, प्रमाणबद्ध, प्रमाणशीर समानता)

iii) Moral Equality ( नैतिक समानता)

**i) Numerical Equaltiy & Proportional Equaltiy (संख्यात्मक आणि प्रमाणबद्ध समानता) :**

संख्यात्मक आणि प्रमाणबद्ध समानता असे समतेचे दोन प्रकार ॲरिस्टॉटल मानतो. जेव्हा आपण सर्व व्यक्तींना एकत्र मानतो किंवा एकमेकांपासून वेगळे न करता एक यासारखे मानतो आणि त्यांना समानतेची वागणूक देतो, तेव्हा तो इतरांशी वागण्याचा एक मार्ग असतो आणि त्यातूनच समानतेचे वाटप संख्यात्मक दृष्टया समान असते. प्रत्येक व्यक्तीला जी वागणुकीतील समानता दिली जाते, ती त्या व्यक्तीला देणे गरजेचे असते. त्यामुळे समानतेचे योग्य व समान वितरण होते. संख्यात्मक समानतेचे वैशिष्टय असे की, ती केवळ विशेष परिस्थितीत असते. उपस्थित सर्व व्यक्ती या विशिष्ट बाबतीत समान असतील, तेव्हा संख्यात्मक समानता समान प्रमाणात असते. प्रमाणबद्ध सामानात पुढे औपचारिक समानता निर्दिष्टित करते. हे औपचारिक समानतेचे अधिक अचूक आणि सर्वसमावेशक सूत्र आहे आणि ते पुरेशा समानतेचे सूचक आहे.

प्रमाणबद्ध समानता असणे म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये दोन किंवा अधिक वस्तुंचे वाटप हे समान प्रमाणात करणे होय. एखाद्या विशिष्ट बाबतीमध्ये जेव्हा व्यक्ती असमान असतात आणि अशा परिस्थितीत जेव्हा घटकांचे असमान वितरण होते, तेव्हा घटकांचे वितरण न्याय असते. वितरणासाठी असमान प्रमाणानुसार विचारात घेतले जाणे आवश्यक आहे. समानतेचे विचारात घेतलेल्या व्यक्तीसाठी ही शर्ट पूर्व तत्त्व श्रेणीबद्ध

असमानतावादी सिद्धांतामध्ये देखील समाविष्ट केले जाऊ शकते. समान इनपुटसह समान आउटपुटची मागणी केली जाते. अभिजात परिपूर्णतावादी आणि गुणवंत सर्वांचा असा विश्वास आहे की, व्यक्तींचे आहे की, व्यक्तींचे मुल्यांकन त्यांच्या भिन्न निकडीनुसार केले जावे. ते बक्षीस आणि शिक्षा, फायदे आणि तोटे अशा निकडींच्या प्रमाणात असावे. नैसर्गिक मुलभूत हक्क निकड आणि मूल्य धरल्यास मोठी असमानता निर्माण होऊ शकते, हे प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या दोघांचेही मत आहे.

प्रमाणबद्ध समानतेविषयी ॲरिस्टॉटलच्या कल्पनेमध्ये मुलभूत अंतदृष्टी आहे. ही कल्पना न्यायाच्या समतावादी आणि गैरसमतावादी कल्पनामधील तर्कशुद्ध व्यक्तीवादासाठी एक फ्रेमवर्क प्रदान करते. त्याचा केंद्रबिंदू पुरेसा पुरेसा समानतेच्या आधाराचा प्रश्न आहे. दोन्ही बाजू प्रमाणबद्ध समानता म्हणून न्याय स्वीकारतात. ॲरिस्टॉटल स्पष्ट करतात की, व्यक्तीवादात दोन व्यक्तींना समान किंवा असमान मानायचे की नाही हे ठरविणारी वैशिष्टये यात समाविष्ट आहेत. शुद्ध संकल्पनात्मक स्पष्टीकरणाच्या स्तरावर न्याय आणि समानता या दोन संकल्पना औपचारिक आणि प्रमाणात्मक तत्त्वांद्वारे जोडलेल्या आहेत. समानतेच्या या तत्त्वांशी न्यायाचे स्पष्टीकरण केले जाऊ शकत नाही. औपचारिक आणि प्रमाणबद्ध समानता ही एक संकल्पनात्मक योजना आहे. तिथे तथ्य अमलात आणणे आवश्यक आहे. म्हणजे त्याचे एकक ठरवणे आवश्यक आहे. दोन किंवा अधिक व्यक्ती किंवा प्रकरणे कोणत्या वैशिष्ट्यांद्वारे समान मानली जावीत. हे स्पष्ट होत नाही, जोपर्यंत गृहीततत्त्व टिकून रहते. न्यायाविषयीच्या संकल्पनेवरील सर्व वाद-विवाद कोण, कशासाठी कारणीभूत आहे, कोणती प्रकरणे समान आहे आणि कोणती असमान आहेत, या प्रश्नांवरील विवाद म्हणून समजले जाऊ शकतात. जेव्हा एखाद्याला कोणत्या प्रकाराची समानता दिली जात आहे, हे माहित असेल किंवा सांगितले जाते, तेव्हाच तिला देण्याची प्रक्रिया खरी आहे. असे मानता येईल. समानतेच्या संकल्पनेची मुलभूत तत्त्वे ओळखणे आवश्यक आहे. समानतेचा सिद्धत समानतेचे विविध पैलू सूचित करतो. ते पैलू समजून घेण्यासाठी समतावाद्यांनी समानतेच्या विशिष्ट संकल्पनेचा विचार केला पाहिजे. त्यासाठी त्यांनी समतेच्या मुलभूत तत्त्वांची ओळख करून घेतली पाहिजे. त्याची चर्चाही केली पाहिजे.

**ii) नैतिक समानता :**

अठराव्या शतकापर्यंत मानव हा स्वभावाने असमान आहे, असे मानले जात होते. परंतु मानवाच्या नैसर्गिक अधिकाराच्या कल्पनेने ते आधार कोडमोडले. नैसर्गिक अधिकारांमध्ये एक क्रम गृहीत धरला गेला, ज्यामध्ये सर्व मानव समान आहेत, असे मानले गेले. एखादी कृती प्रत्येक व्यक्तीला तिची योग्यता निश्चित करण्यात मदत करते, तेव्हा तिथे समानतावादी अर्थ अधोरेखित होतो. प्रत्येक जण समान सन्मानास पत्र आहे. ही वस्तुनिष्ठ सर्वाभौमिक नैतिक समानतेची व्यापकपणे मांडलेली संकल्पना आहे.

ख्रिश्चन धर्मामध्ये ईश्वरासमोर सर्व मानव समान आहेत, अशी कल्पना सर्वप्रथम मंडली गेली. परंतु नंतरच्या काळात हे तत्त्व पाळले गेले नाही. इस्लाममध्येही ही कल्पना घेतली गेली होती. ती ग्रीक आणि हिब्राईक दोन्ही घटकावर आधारित होती. सोळाव्या

शतकापासून सुरु झालेल्या आधुनिक काळात नैसर्गिक कायदा आणि सामाजिक करार सिद्धांताच्या परंपरेत नैसर्गिक समानतेची प्रबळ कल्पना होती. हॉब्स (१६५१) यांनी असे मांडले की, त्यांच्या नैसर्गिक स्थितीत व्यक्तींना समान अधिकार असतात. कारण कालांतराने एकमेकांना हानी पोहोचवण्याची क्षमता समान असते.

जॉन लॉक यांनी असे म्हटले आहे की, सर्व मनुष्यांना मालकी आणि स्वातंत्र्य दोन्हीचा समान नैसर्गिक अधिकार आहे. रुसोने सामाजिक असमानता ही नैसर्गिक समानतेच्या घटकाचा परिणाम असल्याचे घोषित केले. रुसोच्या मते, परिणामाची असमानता आणि हिंसेचे नियम केवळ वैयक्तिक व्यक्तिमत्वाला समान नागरी अस्तित्व आणि लोकप्रिय सार्वभौमत्वाशी बांधूनच मात करू शकतात. कांटचे नैतिक तत्त्व सर्व प्राण्यांसाठी समान स्वातंत्र्याची मान्यता देते. प्रबोधनात्मक कल्पनांनी महान आधुनिक सामाजिक चळवळी आणि क्रांतीला चालना दिली. आधुनिक संविधानामध्ये आणि आणि मानवी हक्कांच्या घोषणेमध्ये ती घेतली गेली. मानवांमध्ये फरक असूनही त्यांना एकमेकांच्या बरोबरीचे मानले जावे, या तत्त्वाला अनेकदा मानवी समानता किंवा मुलभूत समानता किंवा समान मूल्य किंवा मानवी प्रतिष्ठा असेही म्हणतात. या संज्ञा एक शक्तिशाली तत्त्व तयार करण्यासाठी एकत्र येतात. नैतिक समानता ही व्यक्तींना समानतेची वागणूक प्रदान करण्याचे सहसा अकल्पनीय तत्त्व म्हणून समजले जाऊ शकते.

नैतिक समानतेचे तत्त्व खूप अमूर्त आहे आणि जर आपल्याला स्पष्ट नैतिक मानकांवर पोहोचवायचे असेल, तर ते ठोस केले पाहिजे. तरीसुद्धा नैतिक समानतेच्या कल्पनेतून न्याय समानतेची कोणतीही संकल्पना काढता येत नाही. उलट नैतिक समानतेचा अर्थ लावणाऱ्या समान वागणुकीच्या स्पर्धात्मक दार्शनिक संकल्पना आपल्याला आढळतात. नैतिक समानतेच्या सखोल आदर्शाप्रती त्यांच्या निष्ठेनुसार त्यांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

Ronald Dworkins View On The Equility Of Resources रोनाल्ड डॉकिंग यांचा संसाधनांच्या समतेविषयीचा दृष्टिकोन :

रोनाल्ड डॉकिंग यांचा जन्म वॉरसेस्टर मॅशशूटरत येथे झाला. टॉरवर्ड लॉ स्कूलमधून त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले. ते ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रोफेसर जुरीस प्रुडन्स या पदावर कार्यरत होते. कायद्याचे तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान डार्किंगचे राजकीय तत्त्वज्ञान त्यांच्या विशी विचारांशी सुसंगत आहे. जोपर्यंत राजकीय सत्ता नागरिकांना समान लेखात नाही, तोपर्यंत त्यांना कोणतेच अधिकार नाहीत. त्यांनी प्रत्येकाला समान दर्जा द्यायला हवा, असे त्यांनी प्रतिपादन केले. डार्किंग अशा स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात की, त्यात समानतेचा हक्क सर्वोच्च राजकीय तत्त्व असेल. डार्किंगच्या मते, वरवर पाहता समानतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यांच्यात संघर्ष आहे, असे वाटते. परंतु प्रत्यक्षात तसे नाही. समता ही नागरी आणि राजकीय स्वातंत्र्याचा आधार आहे. ज्याप्रमाणे समानतेचा हक्क आहे, त्याप्रमाणे स्वातंत्र्याचा हक्क आहे का, याबाबत साशंकता आहे. सर्वांनाच समानतेचा अधिकार आहे, असे मानले जाते. कोणतीही व्यक्ति असो, कोणत्याही स्तरावरील असो, श्रीमंत

किंवा गरीब, शिक्षित किंवा अशिक्षित, कोणत्याही जाती-धर्म-वंशाची असो, प्रत्येकाला समानतेचा अधिकार आहे. प्रत्येकाला समानतेची वागणूक मिळावी, असे अपेक्षित असते. समानतेचा अधिकार आणि स्वातंत्र्याचा अधिकार यामध्ये तडजोड केली जाते. सर्वांना समान दर्जाची वागणूक मिळावी, असे अपेक्षित असते आणि तो त्याचा अधिकार आहे.

संसाधनाच्या समानतेत डार्किंग फरक करतात. त्यांच्या मते, संसाधने ही दोन प्रकारची असतात. १) बाह्य संसाधने आणि २) अंतर्गत संसाधने बाह्य संसाधने ही समाजिक आणि आर्थिक आहेत. ती व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या बाहेर असतात. तर अंतर्गत संसाधने ही व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये असतात. नैसर्गिक प्रतिभा किंवा शारीरिक तंदुरुस्ती तसेच मानसिक कणखरपणा ही अंतर्गत संसाधने आहेत. प्रतिकूल परिस्थितीत अंतर्गत संसाधने ही व्यक्तीचे व्यक्तिमत्व व विचारप्रक्रिया समतोल जीवन सुयोग्य पद्धतीने पुढे नेण्यासाठी उपयोगी पडतात. दोन्हीपैकी कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीमध्ये अन्तागत व बाह्य संसाधने ही योग्य प्रमाणात वापरून व्यक्ती सामाजिक व मानसिक स्तरावर समतोल राखण्याचा प्रयत्न करते.

अशा प्रकारे थोडक्यात आपल्याला डार्किंग यांच्या संसाधनाच्या समानतेचा दृष्टिकोन मांडता येईल.

## ३.३ सर्वोदय

महात्मा गांधी हे आदर्शवादी विचारवंत व राजकारणी होते. आदर्शाबरोबरच व्यवहारवादीही होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या निमित्ताने गांधीजींनी भारतभर प्रवास केला होता. आपल्या देशात सर्वांचा विकास साधला पाहिजे, जो समाजाच्या सर्वांत खालच्या स्तरात आहे, त्याच्या विकासाकडे प्राधान्याने लक्ष दिले गेले पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्याच विचारातून त्यांनी त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले.

महात्मा गांधीजींच्या विचारांवर जोन रस्किन थोटो आणि टॉलस्टोय यांच्या तत्त्वज्ञानाच्या विशेष प्रभाव आढळतो. रस्किन यांच्या 'Unto This Last' या ग्रंथाने आपल्याला नवीन दृष्टि दिली, असे गांधीजी म्हणतात. विकासाची फळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजेत. या विचारावर रस्किनने आपले विचारविश्व उभे केले आहे. मानवी समाजात जि प्रगती होते, ती समजतील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचली पाहिजे, असे त्यांचे मत होते.

**सर्वोदयाची व्याख्या (Defination Of Sarvodaya) :**

सर्वोदय हा शब्द सर्व आणि उदय या दोन शब्दांचा शब्द आहे. त्याचा अर्थ सर्वांचा उदय, सर्वांचा विकास (Uplist Or Development Of All) असा होतो. सर्वोदयाचा अर्थ सर्वांचे कल्याण, सर्वांची सेवा. याचा एक अर्थ गांधीजींना अभिप्रेत असलेला समाजवाद सहकारी समाज असाही केला जातो.

गांधीजींच्या मतानुसार समाजातील सर्वांचाच उदय एकाच वेळी हवा व सामाजिक प्रगतीचा लाभ सर्वांना एकदमच मिळावा म्हणजे सर्वोदय होय.

**सर्वोदायाची तत्त्वे (Principles of Sarvodaya) :**

गांधीजींच्या स्वप्नातील आदर्शवादी समाजरचना म्हणजे सर्वोदय होय. सर्वोदयाची तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सर्वांच्या कल्याणासाठी आदर्श समाजव्यवस्था :**

सर्वोदय तत्त्वज्ञानात समजतील सर्वांच्या कल्याणाचा किंवा हिताचा विचार करण्याची समाजव्यवस्था आहे. समाजात आर्थिक प्राप्तीनुसार गरीब वर्ग, मध्यमवर्ग व श्रीमंत अथवा सधन वर्ग अशी वर्गवारी झालेली असते. उपयुक्ततावादी विचारप्रणाली अधिकाऱ्यांच्या सुखाचा विचार करीत नाही, तर सर्वांच्या कल्याणाचा विचार करते.

**२) राज्यविरहित समाजव्यवस्था (Society Without State) :**

महात्मा गांधीजींच्या मते, राज्यविरहित समाजाची स्थापना झाली पाहिजे. राज्य जरी कल्याणकारी असले, तरी कल्याणकारी राज्याची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी दंडशक्तीचा वापर करावा लागतो. गांधीजींच्या मते, राज्य हे व्यक्तिविकासाचे साधन आहे. सर्वोदय हा अहिंसावादी नवसमाज असेल. या समाजात प्रत्येक व्यक्ति स्वयंस्फूर्तीने कायदापालन करील. म्हणून सर्वोदय समाजात राज्याची आवश्यकता असणार नाही.

**३) विकेंद्रीकरण आणि ग्राम राज्याची निर्मिती (Decentralization And Constitution Gramrajya) :**

महात्मा गांधीजींनी पंचायत राज्याचा पुरस्कार केला. प्राचीन काळी लहान-लहान ग्राम राज्य होती. त्याचा धर्तीवर आधुनिक काळात ग्रामराज्य आहे. गांधीजी ग्रामराज्य व रामराज्य हे शब्द सामानार्थाने वापरतात. राज्यामध्ये संपत्ती व सत्ता यांचे विशिष्ट वर्ण अथवा विशिष्ट व्यक्तींच्या हाती केंद्रीकरण केले जाणार नाही. ग्राहक राज्यात आपले आर्थिक व सामाजिक [प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडविले पाहिजेत. ग्रामराज्यातील लोकांनी राजकीय सत्ता वापरली पाहिजे. खरी लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी जिल्हा, प्रांत, केंद्र या पातळ्यांवर प्रत्यक्ष लोकांनीच राज्यकारभार केला पाहिजे. प्रत्येक खेडे हे एक लहानसे राज्य असेल.

**४) साध्य-साधन साचीतेवर भर (Emphasis on End means parity) :**

राज्यकारभारात सध्या साधनांच्या सुचितेला विशेष महत्त्व दिले जाते. ग्रामराज्यात चांगल्या प्रशासनासाठी जो पैसा आवश्यक असतो, तो वाईट मार्गाने उपलब्ध केला जाऊ नये, साध्य व साधन हे दोन्ही वैध असले पाहिजेत.

### ५) भूदान संपत्ती दान (Bhudana) :

आपल्या देशात मोठे जमिन्दन व भूमिती असे परस्परविरोधी चित्र होते. एकीकडे जमीनी अधिक आहेत, म्हणून पडीक आहेत, तर दुसरिअक्दे स्वतःच्या निर्वाहासाठी स्वतःची जमीनच नाही. म्हणून सर्वोदय तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून जमीन दान वर्गाचे मतपरिवर्तन करून तुम्हाला जेवढे आवश्यक आहे, तेवढी जमीन स्वतःकडे ठेवून जी जमीन अतिरिक्त आहे, ती दान द्या असे आवाहन करून विनोब भावे यांच्यासारख्या सर्वोदयी कार्यकर्त्यांनी जमीनी मिळवून त्या भूमिहीनांना दान दिल्या.

### अ) सर्वोदयाचे फायदे (Merits Of Sarvodaya) :

सर्वोदय ही आदर्शवादी विचार प्रणाली आहे. या प्रणालीचे फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

#### i) हिंसारहित समाजव्यवस्था

सर्वोदय प्रणालीत हिंसेला अजिबात स्थान नाही.

#### ii) राज्याची आवश्यकता नाही,

राज्यसत्तेचा उगम दंडशक्तीतून होत असल्याने राज्य नावाच्या यंत्रणेची सर्वोदयासाठी गरज नाही. सर्वोदयासाठी गरज नाही. सर्वोदयात लोक असतील. तेथे स्वयंशासन असते, तेथे बाह्य नियंत्रणशक्तीची गरज निर्माण होत नाही.

#### iii) अधिकारांचे विकेंद्रीकरण

सर्वोदयात समाजाच्या प्रशासनाचे विकेंद्रीकरण असेल. त्यामुळे कोणी कोणावर प्रभाव टाकण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

### ब) सर्वोदयप्रणालीचे दोष (Demerit of Sarvodaya) :

सर्वोदय ही एक पद्धती आहे. दीर्घ काल भारतावर राज्य केलेल्या परिकीय सत्तेतील दोष भारतीय समाजव्यवस्थेत घुसू नयेत, म्हणून महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण, विनोबा भावे यांसारख्या त्यागी महापुरुषांनी भारतात देखील आदर्शवादावर आधारित समाजव्यवस्था असू शकते, असा आशावाद व्यक्त केला होता. त्यांचे समर्थनही केले होते. ही विचारसरणी मानवतावादाचे एक तत्त्वज्ञान म्हणून नक्कीच स्वीकार्य आहे. तरीसुद्धा सर्वोदयाच्या टीकाकारांनी या विचारसरणीत खालीलप्रमाणे दोष दाखविले आहेत.

१. सर्वोदय विचारसरणी सत्य, अहिंसा, न्याय या श्रेष्ठ जीवनमूल्यांवर आधारित असली. तरी ती प्रत्यक्षात आचरणात असणे शक्य नाही. सर्व माणसांचा स्वभाव निसर्गतः स्वार्थी असल्याने स्वतः च्या कल्याणासाठी वरील तत्त्वे उपयुक्त ठरत नसतील, तर त्यांचा स्वीकार कोण करणार ?

२. सर्वोदय विचारप्रणालीनुसार जगण्यासाठी समाजाची व व्यक्तीची उच्च पातळीवरील आध्यात्मिक व नैतिक प्रगती होणे आवश्यक असते. या दोन्ही बाबींची समाजात कातरता असल्याने सर्वोदय समाजाची निर्मिती हे एक दिवास्वप्न ठरते.

३. सर्वोदय विचारप्रणाली समाजातील पक्षपद्धतीवर आधारित राजकारणाला विरोध करते. लोकशाही देशांमध्ये पक्षपद्धतीवर राजकारण ही काळाची गरज झालेली आहे. आपण फार तर पक्षपद्धतीवर आधारित राजकारणाचे व लोकशाहीचे नियंत्रण करू शकतो.

## ३.४ सारांश

मानवी समाज सुदृढ असणे अत्यंत आवश्यक आहे. मानवी जीवनामध्ये समानता विकास होणे शक्य नाही. सर्वप्रथम अनेक प्रकारचे भेद नष्ट होऊन समानता मानवी जीवनामध्ये गरहेचे आहे. जेव्हा मानवी जीवनामध्ये समानता येते, तेव्हा मानवाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. याचा सर्वोदयाशी अत्यंत जवळचा संबंध आहे.

❖❖❖❖

# ४

## न्याय (JUSTICE)

**घटक रचना :**

४.० उदिष्टये

४.१ प्रस्तावना

४.२ प्लेटोची न्यायाची संकल्पना

४.३ रॉबर्ट नोझिकचा न्यायाचा हक्क सिद्धांत

४.४ जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना

४.५ डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व

४.६ सारांश

४.७ दिर्घोत्तरी प्रश्न

### ४.० उदिष्टये

१. न्यायाच्या संकल्पनेचा अभ्यास करता येईल.

२. प्लेटोची व नॉझिकची न्यायाची संकल्पना समजून घेता येईल.

३. जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना समजून घेता येईल.

४. डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व अभ्यासता येईल.

### ४.१ प्रस्तावना

न्याय ह्या शब्दाचा अर्थ शब्दशः अर्थ 'जोडणे, बसवणे, एकत्र बांधणे' असा होतो. परंतु त्याचा लाक्षणिक अर्थ मनुष्य जातीला समाजात योग्य जागी जोडणाऱ्या वा बसणाऱ्या सामाईक परंपरा असा होतो, म्हणजेच लोकांना बंधनकारक असणाऱ्या नियमांचा संच असा अर्थ आहे. हे नियम रुढीतून आलेले असोत किंवा विधीमंडळाने तयार केलेले असोत त्या नियमांना न्यायालये मान्यता देतात. अर्नेस्ट बार्कर यांच्या मतानुसार "न्याय हा मुल्यांचा मेल घालणारा वा समन्वय साधणारा असतो. तो त्या मूल्यांची व एकात्म समन्वीन पूर्णकृतीच असते.

कोणत्याही समाजातील न्यायसंकल्पना ही जनसमुदायांच्या निकषांवर अवलंबून असते. हे सर्व निकष नैतिक सद्विवेकात अभिप्रेत असतात. आणि त्यातूनच कार्यान्वित होतात.

जेव्हा कायदा समाजाच्या सर्वसाधारण सद्विवेकाच्या अपेक्षा पूर्ण करतो त्याचवेळी त्याच्या वैधतेला औचित्याची व मूल्यात्मकतेची जोड मिळते.

परंपरेने सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजामध्ये आज सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची ओढ आहे. समाजात ज्या वस्तूंची आणि सेवांची निर्मिती होते त्यांचे वितरण संपूर्ण समाजात योग्यप्रकारे झाले पाहिजे. सर्वांच्या अन्न, निवारा इत्यादी मुलभूत गरजा शमल्या पाहिजेत आणि त्या गरजा भागविण्याचा प्रत्येकाला अधिकार असला पाहिजे. त्याखेरीज ज्या वस्तू व सेवा निर्माण होतील त्यांचे समजेच्या, न्यायाच्या व रास्त्तेच्या तत्त्वावर वाटप देखील झाले पाहिजे, हीच सामाजिक न्यायाची मुख्य सूत्रे आहेत.

न्याय ही संकल्पना अशा नैतिक नियमांचा संच आहे की, ज्यात मानवी कल्याणाच्या तत्त्वावर भर दिला आहे. ही जीवनातील मार्गदर्शक तत्त्वे होत. न्याय हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे असून ते म्हणजे प्रत्येकाला त्याचे जे देणे लागते ते देणे 'चांगल्यास चांगले' आणि 'वाईटास वाईट' हा ही अर्थ या संकल्पनेस अभिप्रेत आहे. म्हणजेच योग्य कामास उत्तेजन व अयोग्य कामास दंड असाही 'न्याय' संकल्पनेचा अर्थ लावता येईल. न्याय ही संकल्पना समानतेवर अधिष्ठीत आहे. न्याय म्हणजे दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे व प्रत्येकाने आपले नेमून दिलेले काम चोख बजावणे. त्यामुळेच न्याय ही संकल्पना सामाजिक आहे. उलटपक्षी तो सामाजिक आदर्श आहे. व्यक्तींनी परस्परांशी जबाबदारीने कसे वागावे हे सांगणारा तो एक आदर्श आहे. यात स्वातंत्र्य आणि समता या गोष्टी अंतर्भूत आहेत. प्लेटो म्हणतो न्याय हा एक सद्गुण आहे.

प्लेटोचे 'समाज म्हणजे व्यक्तीचेच अविष्करण' हे सूत्र पकडून ॲरिस्टॉटल, सेन्ट ऑगस्टीन, सेन्ट थॉमस ॲक्वायनस, जॉन लॉक, रुसो, बेंथॅम, जे. एस. मिल्ल इत्यादी विचारवंतानी समाजरचना व त्यात अनुस्थुत असलेल्या नीती तत्त्वांवर किंवा न्याय तत्त्वांवर विविध प्रकारे चिंतन करून आपल्याला विचार प्रणाल्या मांडल्या आहेत. या सर्वांच्या पार्श्वभूमिवर अगदी अलिकडील काळात म्हणजेच विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जॉन रॉल्सने त्याची न्याय विषयक विचार प्रणाली मांडली.

## ४.२ प्लेटोचा न्यायसिद्धांत

प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथाचे दुसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. ग्रंथाच्या नावावरून न्यायाला त्याने किती महत्त्व दिले आहे ते स्पष्ट होते. प्लेटोच्या आदर्श राज्याचा आधारच न्याय आहे. न्यायाशिवाय आदर्श राज्याची कल्पनाच करता येत नाही. समाजात सुव्यवस्था, संघटन आणि न्याय असेल तरच आदर्श राज्याची निर्मिती होऊ शकते. मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करून त्याने असा सिद्धांत मांडला की, भिन्न व्यक्ती भिन्न प्रकारची कार्ये करतील पण ती करीत असतानाही ते त्या एकतेच्या सूत्रात बांधलेल्या राहतील. आदर्श समाजाला घातक ठरणाऱ्या गोष्टी दूर करून व मनुष्याला आपल्या कर्तव्यशीलतेची जाणीव करून देऊन त्यांना संघटीत ठेवण्याचे कार्य

प्लेटोचा न्यायसिद्धांत करतो. प्लेटोच्या न्यायसिद्धांताप्रमाणे इतरांना हानी न पोहोचविताही मनुष्याला आपला व्यक्तीमत्वाचा विकास करता येतो.

प्लेटोने न्यायाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, 'प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तिला प्राप्तआहे'. म्हणजेच प्लेटोने योग्यता आणि शिक्षणाच्या अनुरूप व्यवहारांसाठी व्यक्तीला पत्र ठरविले. आधुनिक वाचकांना न्यायाची ही कल्पना एकदम आश्चर्यकारक वाटेल. कारण वकिली दृष्टिकोनातून ही व्याख्या केलेली नाही.

प्लेटोने आपली न्यायाची कल्पना स्पष्ट करतांना पूर्वी प्रचलित असलेल्या न्यायासंबंधीच्या सिद्धांताचे खंडन केले. प्लेटोने आपली न्यायाची कल्पना स्पष्ट करतांना पूर्वी प्रचलित असलेल्या न्यायासंबंधीच्या सिद्धांताचे खंडन केले. प्लेटोने ज्या न्यायसिद्धांताचे खंडन केले ते सिद्धांत पुढीलप्रमाणे आहेत.

१. न्यायाचा परंपरावादी किंवा सेफेल्सचा सिद्धांत (Traclitional Theory of Justice)

२. न्यायाचा क्रांतीकारी सिद्धांत किंवा थेरिसिमेक्स सिद्धांत (Radical Theory of Justice)

३. न्यायाचा व्यवहारवादी किंवा ग्लाकाँचा सिद्धांत (Pragmatist Theory of Justice)

**१) न्यायाचा परंपरागत दृष्टिकोण :**

'रिपब्लिक' ग्रंथात प्रथम सेफेल्स आणि पॉलिमार्क्स न्यायाचा परंपरावादी सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. सेफेल्सच्या मते, 'भाषणामध्ये सत्यता असणे, कार्यात उचितता असणे तसेच ईश्वराचे व मनुष्याचे ऋण फेडणे हाच खरा न्याय आहे.' त्यानंतर पॉलिमार्क्सने न्यायाच्या परंपरावादी दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व केले. त्याच्या मते, 'मित्रांशी चांगला व्यवहार करणे आणि शत्रूचा तिरस्कार करणे हाच खरा न्याय आहे.'

न्यायाची ही कल्पना चुकीची वाटते. यामुळे शासकाचा मित्र असलेल्या अपराध्याला चांगली वागणूक मिळेल तर शासकाच्या शत्रू अपराध्याला कठोर शिक्षा मिळेल म्हणजेच एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी दोन भिन्न अपराध्यांना भिन्न प्रकारच्या शिक्षा शासकास कराव्या लागतील. त्याला न्यायाऐवजी अन्यायच म्हणावे लागेल. वास्तविक न्यायाच्या दृष्टीने सर्व समान पाहिजेत. शत्रू आणि मित्र हा भेदभाव त्यात नको.

प्लेटोने अनेक दोष दाखवून परंपरावादी न्यायसिद्धांत अमान्य ठरविला. प्लेटोच्या मते परंपरावादी दृष्टिकोन मित्राशी आणि शत्रूशी अलग व्यवहार करतो पण प्रत्यक्षात मित्र आणि शत्रू ओळखणे ही गोष्ट सोपी नाही. एखादी व्यक्ती वाईट म्हणून त्या व्यक्तीशी वाईटच व्यवहार केला तर ती व्यक्ती पहिल्यापेक्षाही अधिक वाईट होईल, पण हा न्यायाचा उद्देश राहू शकत नाही. परंपरावादी सिद्धांतानुसार न्याय देश, काल, परिस्थितीनुसार अपराधाच्या मान्यता बदलू शकतात पण न्यायमार्ग सर्वठिकाणी एकच पाहिजे. परंपरागत दृष्टिकोनातील दोष दाखवून प्लेटोने तो सिद्धांत चुकीचा असल्याचे

स्पष्ट केले. प्लेटोच्या मते, 'परंपरावादी न्यायाची कल्पना एका मर्यादेपर्यंत आंशिक रुपात उपयुक्त वाटत असली तरी त्या कल्पनेच्या खोलात शिरल्यास अनेक अडचणी आणि परस्परविरोधी तत्त्वे उभी रहातात.

**२) न्यायाचा क्रांतिकारी सिद्धांत :**

थेरिसिमेमक्स हा क्रांतीकारी सोफिस्टांचे प्रतिनिधित्व करतो. त्याच्या मते, 'शक्तिशाली व्यक्तीची इच्छा म्हणजे न्याय.' त्यात म्हणजे शक्तिशाली व्यक्तीचा लाभ आहे. या सिद्धांतानुसार शक्ती व सत्य समानार्थी आहेत. शक्तिशाली व्यक्तीसाठी जो कायदा बनविल तोच न्याय आहे. व्यवहारात बळी तो कण पिळी हाच सिद्धांत सर्वत्र चालत आलेला दिसून येतो.

प्लेटोच्या मते, शासनाची प्रत्येक आज्ञा न्याय ठरू शकत नाही. ज्या आज्ञेमुळे समाजकल्याण साधत असेल त्याला न्याय म्हणता येईल. ज्या आज्ञेने समाजहित साधले न जाता समाजाचे अहित साधले न जाता समाजाचे अहित होते त्याला न्याय म्हणता येत नाही. शासनाने स्वार्थी दृष्टिकोणातून दिलेल्या आज्ञा अनैतिकही असू शकतात. क्रांतिवादी सिद्धांत अविवेकावर आधारित असल्याने प्लेटोने तो टाकाऊ ठरविला.

**३) न्यायाचा व्यवहारवादी सिद्धांत :**

क्रांतीकारी सिद्धांताच्या विरोधी असा हा न्याय सिद्धांत आहे. या सिद्धांताच्या प्रतिपादन ग्लॉकन करतो. न्याय एक कृत्रिम तत्त्व आहे. निसर्गावस्थेचा आधार घेऊन त्याने हा सिद्धांत मांडला. निसर्गावस्थेत बलवान लोक समाजात मनमानी करीत होते. निर्बल लोक अत्याचार सहन करीत होते. हा अत्याचाराचा विरोध म्हणून त्यांनी आपसात करार केला. त्यानुसार कायद्याचे स्वरूप निश्चित करण्यात आले. शक्तिशाली व्यक्तींच्या भितीमुळे संघटीत होऊन दुर्बल लोकांनी आपल्या रक्षणासाठी कायद्याची व न्यायाची निर्मिती केली म्हणून न्याय कृत्रिम आहे.

प्लेटोच्या मते, न्याय कृत्रिम व्यवस्था नाही. न्याय हा आत्म्याचा गुण आहे. ती एक आंतरिक स्थिती आहे. कायदे पाळले जातात ते शक्तीच्या आधारावर नव्हते तर ते त्यांनी स्वतःच्या इच्छेने बनविलेले असतात. म्हणून समाजाच्या इच्छेने साकार रूप म्हणजे कायदा आहे. व्यवहारवादी सिद्धांत मनुष्याला स्वार्थी ठरवून कायद्याला कृत्रिम मानतो. प्लेटोने या तिन्ही सिद्धांताचे खंडन करून आपला स्वतःचा सिद्धांत मांडला आहे.

**प्लेटोचा न्यायसिद्धांत :**

आपला न्यायसिद्धांत मांडतांना प्रथम मानवी स्वभावाच्या विश्लेषणाने प्लेटो त्याचा आरंभ करतो. त्याच्या मते, प्रत्येकाने व्यक्ती समाजात राहून आपली योग्यता अ आवड लक्षात घेऊन कार्य करील तर समाजाचे अधिकतम कल्याण होईल. प्रत्येकाने व्यक्तीने आपले कर्तव्यपालन चोखपणे करावे, इतरांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. न्याय म्हणजे

आंतरिक इच्छेची अभिव्यक्ती आहे. फॉस्टरच्या मते, 'ज्याला आम्ही नैतिकता म्हणतो तोच प्लेटोचा न्याय आहे.'

१. वासना (Appetite) २. साहस (Spirit) ३. बुद्धी (Wisdom)

या तिन्ही भावनांचा समन्वय योग्य तऱ्हेने एखाद्या व्यक्तीत होत असेल तर ती व्यक्ती न्यायी परंतु या तिन्ही प्रकारच्या भावना व्यक्तिमध्ये सारख्या प्रमाणात नसतात. एखाद्या व्यक्तीत बुद्धीची भावना प्रखर राहते तर एखाद्या व्यक्तीत वासना तीव्र असते. काही लोकांमध्ये साहसी वृत्ती अधिक आढळते. त्यामुळे समाजात काही व्यक्ती वासनाप्रधान, काही साहसप्रधान तर काही बुद्धीप्रधान असतात. प्लेटोच्या मते, वासनाप्रधान लोक उत्पादनकार्य चांगल्या रीतीने करू शकतात. बुद्धीप्रधान लोक शासनकार्य कुशलता पूर्वक करू शकतात. साहसप्रधान लोक आंतरिक व बाह्य रक्षणाचे कार्य म्हणजेच सैनिकाचे कार्य अधिक चांगल्या प्रकारे करतात.

भावनेच्या प्रधानतेवर समाजातील वर्गाची उत्पत्ती

भावना वर्ग

वासना उत्पादक, साहस उत्पादक, बुद्धी शासक, आदर्श राजा

प्लेटोची न्यायाची कल्पना या तीन वर्गावर आधारित आहे. समाजातील उत्पादक सैनिक, शासनकर्ता जर आपलआपली कार्ये करतील आणि दुसऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाहीत तर आपोआपच न्यायाची स्थापना होईल. प्लेटो राज्याला व्यक्तीचा विस्तार मानतो. समाजात न्याय तेव्हाच निर्माण होऊ शकतो की जेव्हा प्रत्येक घटक नैसर्गिक गुणांच्या प्रधानतेनुसार आचरण करील, स्वधर्माचे पालन करील. प्लेटोच्या वर्गव्यवस्थेत भारतातील वर्गव्यवस्थेची बरेच साम्य आढळते.

न्याय म्हणजे राज्यरूपी शरीराचा आत्मा आहे. आदर्श राज्यापासून तो अलग होऊ शकत नाही. राज्य हे व्यक्तीनेच विस्तृत रूप तो मानत असल्यामुळे त्याने व्यक्तिगत न्याय असा भेद केला नाही. राज्यातील शासक, सैनिक व उत्पादन या तिन्ही वर्गानी दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप केला नाही व आपले कार्य व्यवस्थित रितीने पार पाडले तर सर्वाच्याच आवश्यकता पूर्ण होतील आणि न्यायाची स्थापना होईल. सेवाईनच्या मते, 'न्यायाचे बंधन समाजाला एकतेच्या सूत्रात बांधते. आपआपल्या योग्यतेनुसार कर्तव्ये पार पडणाऱ्या सामन्वयाचे ते नाव आहे. हा एक व्यक्तिगत आणि सामाजिक गुण आहे. यामुळे राज्यातील घटकांचे अधिकतम कल्याण होते.' बार्करच्या मते, 'समाजामध्ये विभिन्न प्रकारच्या व्यक्ती असतात. उदा. शासक, सैनिक व उत्पादक या व्यक्ती एक दुसऱ्याच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी समाजात संघटीत होतात. स्वधर्माचे पालन करून समाजाला एकतेच्या सूत्रात बांधतात. प्लेटोने सामाजिक जीवनाच्या या मूलभूत सिद्धांतालाच न्याय म्हटले आहे.'

**प्लेटोच्या न्यायसिद्धांताची वैशिष्टये :**

१. प्लेटोच्या न्याय म्हणजे आत्म्याचा प्रतिध्वनी आहे.

२. प्रत्येक वर्ग आपआपले कार्य करील, दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाही.

३. मनुष्यातील तीन प्रवृत्तींच्या (वासना, साहस व बुद्धी) आधारावर समाजात तीन वर्ग पडतात. उत्पादक, सैनिक व शासक.

४. राज्यातील शासनप्रबंध बुद्धिमान व्यक्तींच्या हाती राहील. योग्य शासनासाठी शासक आणि सैनिक संपत्तीचा आणि स्त्रियांचा साम्यवाद पाळतील.

५. राज्य व्यक्तीचे विस्तृत रूप आहे.

६. प्लेटोचा न्याय सैनिक अधिक आहे, वैधानिक कमी.

७. तिन्ही वर्ग आपापल्या प्रवृत्तीनुसार कार्य करीत असले तरी ते त्यांच्या भिन्नतेचे प्रतीक नाही, तर एकतेचे प्रतीक आहे. प्लेटोच्या न्यायसिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :

१. बार्करच्या मते, 'प्लेटोचा न्याय वास्तविक न्याय नाही तर मनुष्याला आपल्या कर्तव्याप्रती सीमित करणारी भावना आहे.' प्लेटोचा न्याय म्हणजे केवळ नैतिक भावना आहे.

२. प्लेटोच्या मते, मनुष्यात वासना, साहस, बुद्धी यापैकी एक प्रवृत्ती प्रधान असते. पण मनुष्यातील एकच प्रवृत्ती कायमची प्रधान असते असे म्हणता येत नाही. कारण निरनिराळ्या परिस्थितीत मनुष्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती प्रबल असू शकतात.

३. प्लेटोचा न्याय निष्क्रिय आहे. न्यायाच्या बळावर व्यक्ती अधिकारासाठी संघर्ष करते पण प्लेटोने न्यायाला इतके आत्मसंयमी बनविले आहे की सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने सक्रिय भूमिका वठवू शकत नाही.

४. प्लेटोचा न्याय स्वामित्वाकडे झुकला आहे.

५. व्यक्तीची स्वभावाशी निरगाठ बांधून कार्यविशेषीकरण केल्यामुळे समाजात वर्गसंघर्ष निर्माण होतो.

६. प्लेटोने आपल्या न्यायसिद्धांतात तत्त्वज्ञानी शासकाला इतकी सत्ता प्रदान केली आहे की तो निरंकुश बनेल.

७. शासक आणि सैनिक यांच्यासाठी त्याने संपत्तीचा व स्त्रियांचा साम्यवाद सांगितला आहे. वासनापूर्तीसाठी स्त्रियांशी त्यांनी अल्पकाळ सहवास करावा असे तो म्हणतो. म्हणजेच त्याने केवळ मनुष्याचा वासना या तत्त्वाकडे लक्ष दिले आहे आणि आंतरिक भावनेकडे दुर्लक्ष केले आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) न्यायाचा परंपरागत दृष्टिकोण विशद करा.

२) प्लेटोच्या न्यायसिद्धांताची वैशिष्टये विशद करा.

## ४.३ रॉबर्ट नोझिकचा न्यायाचा हक्क सिद्धांत

रॉबर्ट नोझिकचा, (१६ नोव्हेंबर १९३८) - जन्म, ब्रुकलिन, न्युयॉर्क, यूएस. मृत्यू - २३ जानेवारी, २००२, केंब्रिज, मास.), अमेरिकन तत्त्ववेत्ता, त्याच्या पहिल्या प्रमुख कामात स्वातंत्र्यवादाच्या कठोर बचावासाठी प्रसिद्ध, अराजकता, राज्य, आणि युटोपिया (१९७४). एक व्यापक विचारवंत, नोझिकने ज्ञानरचनाशास्त्र, वैयक्तिक ओळखीची समस्या आणि निर्णय सिद्धांतामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. नोझिकच्या हक्क सिद्धांतामध्ये  तीन मुख्य तत्त्वे आहेत: अधिग्रहणात न्यायाचे तत्त्व - हे तत्त्व होल्डिंगच्या प्रारंभिक संपादनाशी संबंधित आहे. लोक प्रथम अनधिकृत आणि नैसर्गिक जागतिक मालमत्तेवर कसे येतात. कोणत्या प्रकारच्या गोष्टी ठेवल्या जाऊ शकतात. इत्यादींचा हिशोब आहे. हस्तांतरणात न्यायाचे तत्त्व - हे तत्त्व स्पष्ट करते की एखादी व्यक्ती स्वैच्छिक देवाणघेवाण आणि भेटवस्तूंसह दुसऱ्याकडून होल्डिंग कशी मिळवू शकते. अन्यायाच्या दुरुस्तीचे तत्त्व - अन्यायाने मिळवलेल्या किंवा हस्तांतरित केलेल्या मालमत्तांना कसे सामोरे जावे, पीडितांना किती आणि किती नुकसान भरपाई दिली जाऊ शकते. अत्याचार किंवा सरकारने केलेल्या अन्यायाला कसे सामोरे जावे वगैरे.

नोझिकचा असा विश्वास आहे की जग पूर्णपणे न्याय असते, तर फक्त पहिल्या दोन तत्त्वांची आवश्यकता असेल, कारण "खालील प्रेरक व्याख्या होल्डिंगमध्ये न्यायाचा विषय संपूर्णपणे समाविष्ट करेल, : अधिग्रहण करताना न्यायाच्या तत्त्वानुसार जो व्यक्ती होल्डिंग घेतो तो त्या होल्डिंगचा हक्कदार असतो.

ज्या व्यक्तीने हस्तांतरणात न्यायाच्या तत्त्वानुसार होल्डिंग प्राप्त केले आहे, ज्याच्याकडून होल्डिंगचे अधिकार आहेत, त्याच्याकडून होल्डिंगचा हक्क आहे. १ आणि २ च्या (पुनरावृत्ती) अर्जांविषयी कोणालाही होल्डिंगचा अधिकार नाही.

अशाप्रकारे, हक्क सिद्धांत सूचित करेल " वितरण म्हणजे प्रत्येकजण वितरणाखाली त्यांच्या मालकीच्या मालकीचा हक्कदार असेल तरच" (नोझिक १९७४: १५१). तथापि, प्रत्येकजण या नियमांचे पालन करत नाही: "काही लोक इतरांकडून चोरी करतात, किंवा त्यांना गुलाम बनवतात, त्यांचे उत्पादन जप्त करतात आणि त्यांना निवडल्याप्रमाणे जगण्यापासून रोखतात, किंवा इतरांना एक्सचेंजमध्ये स्पर्धा करण्यापासून जबरदस्तीने वगळतात" (नोझिक १९७४: १५२). अशा प्रकारे दुरुस्तीचे तिसरे तत्त्व आवश्यक आहे.

हक्क सिद्धांत जॉन लॉकच्या कल्पनांवर आधारित आहे. [१] हक्क सिद्धांताअंतर्गत, कांत यांनी दावा केल्याप्रमाणे, लोकांना स्वतःमध्ये शेवट आणि समान म्हणून प्रतिनिधित्व केले जाते, जरी भिन्न लोक मालमत्तेच्या वेगवेगळ्या रकमेचे (म्हणजेच

हक्कदार) असू शकतात. नोझिकच्या कल्पना खासगी मालमत्तेची एक मजबूत प्रणाली आणि बाजार अर्थव्यवस्था तयार करतात. एकमेव न्याय व्यवहार स्वैच्छिक आहे. गरिबांसाठी पूर्ण मजबूत सामाजिक कार्यक्रमांना समर्थन देण्यासाठी श्रीमंतांचा कर अन्यायकारक आहे कारण राज्य ऐच्छिक व्यवहाराच्या ऐवजी बळजबरीने पैसे मिळवत आहे. तथापि, नोझिकच्या कल्पना गरीबांसाठी किमान सामाजिक कार्यक्रम तयार करण्यास मान्यता देऊ शकतात. निसर्गाच्या अवस्थेतील प्रत्येक व्यक्ती आपापल्या क्षमतेनुसार विशिष्ट पातळीचे कल्याण साधू शकते. कल्याणाचा हा स्तर, समान नसतानाही, लॉकियन प्रोविझोद्वारे राखला गेला पाहिजे. अधिग्रहण स्थिती आणि लॉकियन प्रोविझोद्वारे राखला गेला पाहिजे. अधिग्रहण स्थिती लॉकियन प्रोवीझोचा न्याय दिल्यास, "हे समजण्यासारखे आहे की अर्थव्यवस्थेच्या सामान्य कार्यात, काही लोकांसाठी खाजगी मालमत्ता शासन काही वेळा, स्वतःला सोडवल्यावर या स्तराच्या कल्याणात प्रवेश देण्यात अपयशी ठरू शकते. जर तसे असेल, तर न्याय - जसे की स्वातंत्र्यवादी हे समजून घेतात - बाजारातील शक्तींच्या उत्स्फूर्त खेळाने निर्माण झालेल्या कल्याणाचे वितरण सुधारण्यासाठी राज्याने कार्य करावे अशी मागणी करते."

कायदेशीर राज्य सत्तेबद्दल नोझिकची दृष्टी अशा प्रकारे रॉल्स आणि त्याच्या अनुयायांच्या विरोधाभासांशी स्पष्टपणे विरोधाभासी आहे. रॉल्सचा युक्तिवाद आहे की जे नागरिक कमीत कमी सुस्थितीत आहेत ते शक्य तितके चांगले आहेत याची खात्री करण्यासाठी राज्याला आवश्यक असलेल्या सर्व शक्ती असाव्यात (जरी हे अधिकार विविध मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्याशी सुसंगत असले पाहिजेत). हा दृष्टिकोन रॉल्सच्या न्याय सिद्धांतावरून आला आहे, ज्याचे एक तत्त्व असे आहे की संपत्ती आणि उत्पन्नाचे असमान वितरण तेव्हाच स्वीकार्य आहे जेव्हा ते तळाशी असलेले लोक इतर कोणत्याही वितरणापेक्षाही चांगले असतील. अशा युक्तिवादांना नोझिकचा प्रतिसाद हक्क आहे. की ते वितरणाच्या न्यायाच्या चुकीच्या संकल्पनेवर विसंबून आहेत: ते दिलेल्या वेळी दाखवलेल्या पॅटर्नच्या दृष्टीने न्याय वितरण चुकीचे ठरवतात (उदा.,समान वितरण किंवा विशिष्ट प्रमाणात असमान असणारे वितरण) किंवा दृष्टीने ज्या व्यव्हाराद्वारे वितरण झाले त्या स्वरूपाच्या ऐवजी त्याच्या विकासाच्या आसपासच्या ऐतिहासिक परिस्थिती (उदा. ज्यांनी जास्त मेहनत ते त्यांना म्हणतात. कितीही असमान असले तरीही, जर ते (आणि फक्त जर) वैध माध्यमांद्वारे न्याय वितरणातून उद्भवते. एक वैध साधन म्हणजे अशा गोष्टीचे विनियोग जे साधन म्हणजे होल्डिंगची मालकी दुसऱ्याला स्वैच्छिक हस्तांतरित करणे. तिसरे साधन म्हणजे होल्डिंगसचे अधिग्रहण किंवा हस्तांतरण करताना मागील अन्याय सुधारणे. नोझिकच्या म्हणण्यानुसार. ज्याने माध्यमांद्वारे त्याचाकडे जे काही ते मिळवले तो नैतिकदृष्टया त्याचा हक्कदार आहे. अशाप्रकारे न्यायाचा "हक्क" सिद्धांत सांगतो की समाजात होल्डिंगचे वितरण फक्त जर (आणि फक्त) असेल तर त्या समाजातील प्रत्येकाला त्याच्याकडे जे आहे. त्याचा हक्क आहे.

नमुन्यांवर किंवा ऐतिहासिक परिस्थितीवर आधारित न्यायाचे सिद्धांत खोटे आहेत हे दाखवण्यासाठी, नोझिकने एक साधा पण कल्पक आक्षेप तयार केला, ज्याला "विल्ट चेंबरलेन" युक्तिवाद म्हणून ओळखले जाऊ लागले. गृहीत धरा, तो म्हणतो की, दिलेल्या

समाजात होल्डिंगचे वितरण नमुने किंवा ऐतिहासिक परिस्थितीवर आधारित काही सिद्धांताप्रमाणे आहे- उदा., समतावादी सिद्धांत ज्यानुसार केवळ होल्डिंगचे काटेकोरपणे समान वितरण आहे. या समाजात, विल्ट चेंबरलेन एक उत्कृष्ट बास्केटबॉल खेळाडू आहे, आणि अनेक संघ त्याच्या सेवांमध्ये गुंतवण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करतात. चेंबरलेन अखेरीस एका विशिष्ट संघासाठी या अटीवर खेळण्यास सहमत आहे की प्रत्येकजण जो खेळतो त्यामध्ये भाग घेणारा प्रत्येकजण गेटवरील एका विशेष बॉक्समध्ये २५ सेंट ठेवतो, जायची सामग्री त्याच्याकडे जाईल. हंगामात, १० लाख चाहते संघाच्या खेळांना उपस्थित राहतात आणि म्हणून चेंबरलेनला $२५०,००० मिळतात. आता मात्र कथितपणे फक्त होल्डिंगचे वितरण अस्वस्थ आहे, कारण चेंबरलेनकडे इतर कोणापेक्षा $२५०,००० अधिक आहे. नवीन वितरण अन्यायकारक आहे का ? तो अन्यायकारक नसल्याची तीव्र अंतर्ज्ञान नोझिकच्या पात्रता सिद्धांतामुळे (कारण चेंबरलेनने कायदेशीर मार्गाने) आपली मालकी मिळवली) परंतु समतावादी सिद्धांताशी विरोधाभास आहे. नोझिकचा असा युक्तिवाद आहे की हा युक्तिवाद नमुन्यांवर ऐतिहासिक आधारावर कोणत्याही सिद्धांताचे सामान्यीकरण करतो परिस्थिती, कारण अशा सिद्धांताद्वारे निर्धारित केलेले कोणतेही वितरण चेंबरलेन सारख्या सामान्य आणि अस्वीकार्य व्यवहारांमुळे अस्वस्थ होऊ शकते. नोझिकने असे निष्कर्ष काढले की ज्या समाजाने असा सिद्धांत अंमलात आणण्याचा प्रयत्न केला आहे त्याला त्याच्या नागरिकांच्या स्वातंत्र्यावर कठोरपणे घुसखोरी करावी लागेल जेणेकरून ते योग्य वाटणारे वितरण लागू करेल. "समाजासाठी समाज." जसे तो म्हणतो, "सहमती असलेल्या प्रौढांमधील भांडवलशाही कृत्यांना मनाई करावी लागेल."

नोझिक यावर जोर देतो की त्याची किमान राज्याबद्दलची दृष्टी सर्वसमावेशक आहे. आणि विविध समुदायाच्या अस्तित्वाशी सुसंगत आहे आणि विविध न्याय सिद्धांतांवर आधारित आहे. जो समूह समतावादी सिद्धांताद्वारे शासित समाजवादी समाज निर्माण करू इच्छितो तो असे करण्यास स्वतंत्र असेल, जोपर्यंत तो इतरांना त्यांच्या इच्छेविरुद्ध समाजात सामील होण्यास भाग पाडत नाही. खरचं, प्रत्येक समुदायाला स्वतः च्या चांगल्या समाजाची कल्पना साकारण्याचे समान स्वातंत्र्य असेल. अशाप्रकारे, नोझिकच्या मते, किमान राज्य "युटोपियासाठी एक चौकट" बनवते.

**आपली प्रगती तपासा.**

१) रॉबर्ट नोझिकचा न्यायाचा हक्क सिद्धांत विशद करा.

## ४.४ जॉन रॉल्सची न्यायाची संकल्पना

न्याय विषयक मीमांसेची आपली पहिली मांडणी जॉन रॉल्सने १९८५ मध्ये "Justice as fairness" या निबंधाद्वारे केली. १९७२ मध्ये "A theory of Justice" हा ग्रंथ प्रसिद्ध केला. हा ग्रंथ सामाजिक न्याय या संकल्पनेवर भाष्य करतो. न्याय संकल्पनेद्वारे लोकशाहीतील समाजरचना आदर्श कशी होऊ शकते ह्याचे उत्तम विवरण या ग्रंथात केले आहे. अंत: प्रज्ञावाद आणि उपयुक्ततावाद या सर्वांशी स्पर्धा करून स्पर्धेत टिकून अशी

प्रणाली तयार करणे या उद्देशाने प्रेरित होऊन जॉन रॉल्सने त्याच्या प्रणालीची आखणी केली आहे. हे करण्यासाठी त्यांनी कांटच्या नीतिविषयक मीमांसेचा आधार घेतला आहे.

जॉन रॉल्सची दोन न्याय तत्त्वे :- सामाजिक न्यायाची दोन तत्त्वे समाजाच्या मुलभूत रचनेत लागू करणे व त्याचा सहकारनिर्मितीसाठी उभारल्या जाणाऱ्या व्यवस्थेत किंवा त्यांच्या कार्यात अंतर्भाव करणे. रॉल्सची दोन न्याय तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

**तत्त्व पहिले :-** सामाजिक व्यवहारात भागीदार होणाऱ्या किंवा त्यामुळे प्रभावित होणाऱ्या व्यक्तीला त्या संदर्भात जास्तीत जास्त स्वातंत्र्य असण्याचा हक्क असणे आणि तेवढाच मोकळीक असण्याचा हक्क इतर सर्वांनाही असणे, असा हक्क किंवा अधिकार निर्वेध असेल व एकाचा असा हक्क दुसऱ्या कोणाच्याही अशा हक्कास कसलीही बाधा आणू शकणार नाही. म्हणजेच एकाचे स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्याशी पूर्णपणे सुसंगत असेल.

**तत्त्व दुसरे :-** एखाद्या व्यवहारात जर काही सामाजिक वा आर्थिक विषमता असेल तर त्याचे समर्थन नियमन वा व्यवस्थापन हे अशा पद्धतीने केले गेले पाहिजे की ज्यायोगे,
**अ)** दोन्ही प्रकारच्या विषमता इतर सर्वांना सोयीच्या व हितावह हव्यात, आणि

**ब)** या सर्व विषमता अधिकारपदे व योग्यता स्थाने यांच्याशी निगडीत हव्यात. तसेच ही सर्व पडे व स्थाने अशी असतील की ती सर्वांना खुली असतील. जर तसे नसेल तर उद्भवणारी विषमता ही तत्त्वशून्य, तत्त्वहीन म्हणजेच स्वैर आणि मनमानीकृत असेल.

पहिले तत्त्व समानता आणि स्वातंत्र्य या विषयाचे प्रतिपादन करतो, दुसरे तत्त्व विषमता असल्यास (आणि ती असणारच ) ती विषमता न्याय स्वरुपात स्वीकारायची असेल तर तिचे स्वरूप कसे असावे याविषयी प्रतिपादन करते. स्वातंत्र्य व समता यांवर भाष्य करणारे पहिले तत्त्व प्रधान तत्त्व असून आणि दुसरे तत्त्व त्यापेक्षा थोडेसे कमी महत्त्वाचे वा गौण असे आहे. असे जॉन रॉल्स सांगतो. परंतु एकंदरीत समाजरचनेची दृश्यमान होणारी ही दोन अंगे समानता आणि विषमता या दोन तत्त्वत विभागलेली गेली आहेत. पहिले तत्त्व नागरिकांच्या समान स्वातंत्र्याच्या हक्कांचे संरक्षण करते, तर दुसरे तत्त्व कोणत्या स्वरूपाच्या विषमता समाजात मान्य करता येतील याची कारण मीमांसा करते. या दोन तत्त्वांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, 'न्याय' या संकल्पनेत पुढील तीन महत्त्वाच्या संकल्पनेचा अंतर्भाव होतो.

१. स्वातंत्र्य २. समानता ३. स्वः हितासाठी आणि सामाजिक हितासाठी केलेल्या सेवेचा मोबदला

स्वातंत्र्य हा पेअत्येकाचा अधिकार असून प्रत्येकाला स्वातंत्र्याची समान संधी देखील आहे. परंतु काही कारणास्तव जर एखाद्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात असेल तर त्याने त्यासाठी योग्य समर्थन करणे आवश्यक आहे. आणि असे का केले का याचे त्यास स्प्ष्टीकरण देखील देता यायला हवे. जर तशाच प्रकारची परिस्थिती उद्भवल्यास तशीच वागणूक प्रत्येकास मिळणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात कृती या नियमांनुसार केल्या जाव्यात असे अपेक्षित आहे. कोणत्याही कायदेप्रणालीत असे गृहीत धरले जाते की त्यात सहभागी असणाऱ्या व्यक्तींना स्वातंत्र्याच्या समानसंधी उपलब्ध असतील, माझे

कृतिस्वातंत्र्याच्या आड येणार नाही हे पाहणे म्हणजेच न्याय पद्धतीने वागणे होय. व्यवहारातील ऋतुजा, सरळपणा याचा समावेश अशा वागण्यात असतो. ऋजुतेने व सरलपणाने वागण्यात जो न्याय समाविष्ट असतो तोच न्याय जॉन रॉल्सला देखील अभिप्रेत आहे. अशी ऋजूता, समानता, स्वातंत्र्यता ज्यातून अविष्कृत होते ती न्यायच असते. हाच आशय पहिल्या तत्त्वात अंतर्भूत आहे. दुसऱ्या तत्त्वानुसार कोणत्या प्रकारच्या असमानतेच मान्यता दिली जाते ते स्पष्ट केले आहे. असमानता म्हणजे कायदे किंवा जबाबदाऱ्यामधील उद्भवणारी दरी होय.

उदा. प्रत्येकाची आर्थिक परिस्थिती समान असतेच असे नाही. तसेच प्रत्येकाला मिळणारा सामाजिक दर्जा ही सारखाच असतो असे नाही. प्रत्येकाच्या जबाबदाऱ्यांमध्येही समानता असतेच असे नाही. प्रत्येकाला मिळणारा समान दर्जा हाही सारखाच असतो असे देखील नाही. प्रत्येकजण सरकारात समान कर भरतो असेही नाही. समाजात जसजसा प्रत्येक व्यक्तीचा दर्जा असतो तसेच त्याला मिळणारे अधिकारही वेगवेगळे असतात. कोणत्याही देशात त्या देशातील सर्वोच्च पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना म्हणजेच राष्ट्रपती, पंतप्रधान राज्यपाल यांना काही विशिष्ट अधिकार आणि विशिष्ट कर्तव्य आखून दिलेली असतात व त्याबाबतीत कोनी आक्षेप घेत नाही. अशाप्रकारच्या भेदांना असमानता असे मानले जात नाही.

समाजात फायद्यांची जी वितरण प्रणाली केलेली आहे त्यात प्रत्येकाला समान संधि असावी असे अपेक्षित आहे. म्हणूनच सत्ता आणि संपत्तीचे वितरण समानतेचे होणे गरजेचे आहे आणि तसे झाले नाही तर त्यावर आक्षेप घेता येतो. म्हणजेच सत्ता मिळविणे आणि संपत्ती मिळविणे यावर प्रत्येकाचा समान अधिकार आहे. अर्थातच असमानता ही तेव्हाच मान्य केली जाते. त्या असमानतेमुळे त्यात सहभागी असणाऱ्या व्यक्तीचा फायदाच होईल.

रॉल्सच्या मतानुसार असमानतेला मान्यता देण्याचा नियम प्रत्यक्ष व्यवहारात देखील लागू होतो. अर्थातच तो एक महत्त्वाचा मुद्दा मांडतो. तो असा की, समाजात काही विशिष्ट पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना वेगळी खास वागणूक दिली जाते आणि त्यांना जे फायदे सोयी सुविधा व वागंक मिळते ती इतरांना मिळत नाही. जरी ही खास वागणूक त्या पदांना मिळत असली तरी त्या पदांवर जाण्याची संधी सर्वांना उपलब्ध आहे. किंबहुना त्या पदावर चांगल्या हुशार व्यक्तींना आकर्षित करण्यासाठी हे विशेष फायदे त्यांना दिले जातात. म्हणूनच अशा पदांसाठी घेतली जाणारी स्पर्ध किंवा त्यासाठीची निवड प्रक्रिया ही प्रामाणिकपणाने न्याय मार्गाने होणे गरजेचे आहे. त्यातील स्पर्धकांची निवड ही संपूर्णता त्यांच्या पात्रतेनुसार, बुद्धीमत्तेनुसार आणि ज्ञान कौशल्यानुसार होणे आवश्यक आहे.

रॉल्स अशा समाजाची कल्पना करतो की, ज्याय विशिष्ट कार्यप्रणाली अस्तित्वात आहे. आणि सर्व व्यक्ति या स्वतःच प्रणालीत भाग घेण्यास उत्सुक आहेत.कारण या व्यवस्थेशी प्रामाणिक राहणे हे त्यांच्या फायद्याचे आहे. अर्थातच त्या व्यक्ति एकमेकांत गुंतलेल्या आहेत असे नाही जसे कुटुंबातील नाते संबंध वेगवेगळ्या प्रकारचे असतात. कुटुंबातील

प्रत्येकजण एकमेकांच्या हिताचा विचार करत असतो व परस्परांविषयी प्रेम आदर असतो आणि ते एकमेकांप्रती असलेल्या कर्तव्याचे पालन देखील करत असतात. तसेच एकमेकांमध्ये रस घेत असतात. अशा कुटुंबरचनेवर आधारित समाजाची कल्पना जॉन रॉल्स करतो की, त्या समजतील व्यक्ति परस्परांमध्ये नाही तर ]काही विशिष्ट कारणांसाठी ते एकत्र येतात. तेव्हा ते एकमेकांना समजून घेतात. रॉल्सच्या मतानुसार या व्यक्ती विचारशील असून त्यांना स्वतःचे हित कशात आहे. हे माहिती आहे. इतकेच नव्हे तर आपल्या विचारपद्धतीचा समाजावर परिणाम होतो हे ते जाणून आहेत. त्यामुळेच अशांना आपली व इतरांची परिस्थतीत यात फरक समजू .शकतो. म्हणूनच जॉन रॉल्स न्यायाच्या संकल्पनेत बुद्धीने वागण्याला महत्त्व देतो.

जॉन रॉल्स ने लिहिलेल्या **'थिअरी ऑफ जस्टीस'** या पुस्तकावर बरीच चर्चा झाली आहे. त्याच्या मतानुसार न्याय ही नितिमधील मध्यवर्ती संकल्पना असून त्याने जुन्या राजकीय तत्त्वज्ञानातील सामाजिक करारांच्या संकल्पनेचे साह्य घेतले आहे. अगदी सुरुवातीच्या काळात संस्था निर्माण करताना माणसे ही करार करतात. आणि या करारांच्या आधारावर संस्थांचे समर्थन केले जाई. रॉल्सच्या मतानुसार या कराराचा उद्देश हा अधिकाधिक लोकांना जास्तीत जास्त सुख लाभावे हा नसून फायद्याचे योग्य प्रकारे वितरण व्हावे ह अआहे. म्हणूनच करार करताना त्यात व्यक्तीगत फायद्याचा विचार केलेला नसतो.

अज्ञानाच्या एका पडद्यामागे राहून माणसे विचार विनिमय करताना अशा परिस्थितीत अत्यंत समंजसपणे व विचाराने निवड करतात. यात फायद्याचे वितरण करताना असे बघितले जाते की, जी व्यक्ति हलाखीच्या परिस्थितीत किंवा वाईट परिस्थितीत आहेत त्यांना तिचा अधिक फायदा व्हावा. त्याचप्रमाणे सुव्यवस्थितीतील व्यक्तींना तेव्हाच जास्त फायदा मिळावा जेव्हा त्यांना मिळणाऱ्या फायद्याने वाईट परिस्थितीतील व्यक्तींचे अधिक कल्याण होईल.

उदाहरणार्थ एखाद्या उद्योजकाला तेव्हाच जास्तीत जास्त सोयी सुविधा मिळाव्यात की, ज्यामुळे अनेक व्यक्तींना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. पुढील उदाहरणाच्या आधारे रॉल्स अधिक सुस्पष्टपणे आपले म्हणजे मांडतो, जर अधिक सुस्थितीतील माणूस शिकून शल्यविशारद झाला तर गरीब माणसांवर शस्त्रक्रिया करून तो त्यांचे प्राण वाचवू शकेल. अर्थातच रॉल्स म्हणतो, समाजात सर्वांनाच समानतेची वागणूक दिली जात नाही ही गोष्ट तो स्वीकारतो देखील म्हणूनच काहींना मिळणारी विशिष्ट वागणूक हे तो स्वीकारतो देखील आणि त्याचे समर्थन देखील करतो.

न्याय संकल्पनेत जॉन रॉल्स नीतिच्या तत्त्वाला अतिशय महत्त्व देतो. आपण कोणतीही गोष्ट करताना हे लक्षात ठेवायला हवे की, जी गोष्ट कोणीही करावी असे जर आपल्याला वाटत असेल तर तेवढीच आपणही करणे गरजेचे आहे. प्रस्तुत ठिकाणी या तत्त्वाचा विशेष संदर्भ हव्या असणाऱ्या गोष्टी समाजात कशा असाव्यात यांच्याशी आहे. या समाजात काही अधिक मुलभूत अधिकाराने प्रत्येक /व्यक्तीस जगण्यासाठी आणि आपल्या हित प्राप्तीसाठी सारखाच अधिकाराने प्रत्येक व्यक्तीस जगण्यासाठी आणि

आपल्या हित प्राप्तीसाठी सारखाच अधिकार आहे. आपल्या निवडीसाठी विचार करण्याचे तत्त्व हे सारखेच आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) जॉन रॉल्स न्यायाची संकल्पना विशद करा.

## ४.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्याघातानेचे शिल्पकार असून त्यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांना भारतीय राज्य घटनेत महत्त्वाचे स्थान दिले आहे ते घटना समितीतील मसुदा समितीचे अध्यक्ष होते. या तत्त्वांना अनुसरूनच भारतातील सर्व कायदे व नियम तयार करण्यात आले आहेत. सामाजिक न्यायाचे तत्त्व स्पष्ट करताना आंबेडकर म्हणतात, ब्रिटीशांचे राज्य भारतावर आल्यापासून भारतीय समाज रचनेत अनेक प्रवाह आले. त्यामुळे पाश्चात्य संस्कृती आणि भारतीय मूल्ये यांत संघर्ष होऊ लागला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, आर्थिक, सामाजिक, राजकीय, हक्क, स्त्री-पुरुष समानता, समजतील सर्व व्यक्तींना विकासाची, शिक्षणाची, सरकारी सेवेत दाखल होण्याची संधि ही नवीन मूल्ये एका बाजूला पडली तर जन्मत:च उच्चनीचता, श्रेष्ठ-कनिष्ठपणा, जातीप्रधान समाजरचना, शिक्षणापासून वंचित असा समाजाचा मोठा वर्ग, वंश परंपरागत करावे लागणारे व्यवसाय, व्यक्ति विकासासाठी आवश्यक असलेली संधी न मिलानेन आर्थिक विषमता, स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन या मूल्यांचे आचरण करणारा बारतीय समाज दुसऱ्या बाजूला निर्माण झाला.

डॉ. आंबेडकरांनी सर्वप्रथम लोकशाहीत स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांना स्थान देण्याचा प्रयत्न केला. कारण हुं जोगे त्यांना सामाजिक न्याय प्रस्थापित करावयाचा होता. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट राज्यघटनेत नमूद करण्यात आले आणि ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांची सरकारे यांनी कायदे करावेत असे आंबेडकरांनी घटनेत लिहिलेले आहे. कारण या उद्दिष्टांद्वारेच अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्यात आला व सर्वांना समान संधीची हमी देण्यात आली. भारतीय समाजरचनेत जन्मत:च जातीव्यवस्थेमुळे विषमतेची मुळे खोलवर रुजली गेली आहेत. जन्मजात श्रेष्ठ-कानिष्ठापणा दूर करण्यात येऊन कायद्यापुढे सर्व समान आहेत असे सांगितले. वंश, ज्ञान, धर्म, संपत्ती, मानमरातब, पदव्या यामुळे निर्माण होणारी विषमता नष्ट करून सर्वांना समान मुलभूत हक्क राज्य घटनेने बहाल केले. राज्यघटनेमुळे सर्वांना कायद्याचे संरक्षणही समान देण्यात आले. परंतु या मार्गानेदेखील सामाजिक न्याय पूर्णतः प्रस्थापित होऊ शकत नाही असे आंबेडकरांना वाटले, कारण हजारो शिक्षण संस्कार, समान संधी, हक्क इत्यादी गोष्टीपासून वंचित असणारा वर्ग समाजात फार मोठया प्रमाणात अस्तित्वात आहे. त्यात अस्पृश्य असे विविध प्रकारचे लोक येतात आणि हा दुरावा भरून काढण्यासाठी सरकारी नोकरी शिक्षण क्षेत्रात तसेच कायदेमंडळात या वर्गाला प्रतिनिधीत्त्व देऊन समान संधीच्या तत्त्वाचा अंगीकार व्हावा असे त्यांना वाटत होते.

सामाजिक पातळीवरील न्याय हा वितरणासाठी न्याय असतो. तो समजातील लोकांना खालील पद्धतीने देता येतो.

१) समाजातील दुबळ्या घटकांना विशेष सवलती देणे.

२) अल्पसंख्याकांना विशेष सवलत देणे.

३) शिक्षणसंस्था तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये आजवर उपेक्षित राहिलेल्यांना विशेष सवलती देणे.

४) स्त्रियांना विशेष सवलत व संरक्षण देणे.

५) स्त्रियांवर होणारे अत्याचार, हुंड्यासारख्या प्रथा, बहुपत्नित्व यासारख्या सामाजिक अन्यायाला प्रतिबंध करणरे कायदे तयार करणे.

६) अर्थव्यवस्थेत साधन संपत्तीचे समान वाटप करणे व त्याद्वारे, विषमता, दारिद्र्य, शोषण यांना प्रतिबंध घालणे.

७) उद्योगधंद्याचे व्यवहार मुक्त असावेत.

**आपली प्रगती तपासा :**

१) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व विशद करा.

## ४.६ सारांश

प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथाचे दूसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. ग्रंथाच्या नावावरून न्यायला त्याने किती महत्त्व दिले आहे ते स्पष्ट होते. प्लेटोच्या आदर्श राजायचा आधारच न्याय आहे. न्यायाशिवाय आदर्श राज्याची कल्पनाच करता येत नाही. प्लेटोने न्यायाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, 'प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तिला प्राप्य आहे.' म्हणजेच प्लेटोने योग्यता आणि शिक्षणाच्या अनुरूप व्यवहारांसाठी व्यक्तीला पात्र ठरविले. आधुनिक वाचकांना न्यायाची ही कल्पना एकदम आश्चयेकारक वाटेल. कारण वकिली दृष्टिकोनातून ही व्याख्या केलेली नाही. प्लेटोने ज्या न्यायसिद्धांतांचे खंडन केले ते सिद्धांत पुढीलप्रमाणे आहेत. १. न्यायाचा परंपरावादी किंवा सेफेल्सचा सिद्धांत २. न्यायाचा क्रांतिकारी सिद्धांत किंवा थेरिसिमेक्स सिद्धांत ३. न्यायचा व्यवहारवादी किंवा ग्लाकाँचा सिद्धांत

नोझिकच्या हक्क सिद्धांतामध्ये तीन मुख्य तत्त्वे आहेत : अधिग्रहणात न्यायाचे तत्त्व – हे तत्त्व होल्डिंगच्या प्रारंभिक संपादनाशी संबंधित आहे. लोक पथम अनधिकृत आणि नैसर्गिक जागतिक मालमत्तेवर कसे येतात, कोणत्या प्रकारच्या गोष्टी ठेवल्या जाऊ शकतात. इत्यादींचा हिशोब आहे. नोझिकच्या मते, किमान राज्य "युटोपियासाठी एक चौकट" बनवते.

न्याय एक मूल्य आहे आणि हे मूल्य समानतेला आधार देते या मूल्याचा विचार अनेक

तत्त्ववेत्यांनी केला आहे. पाश्चिमात्य विचारवंत जॉन रॉल्स यांनी न्यायाची संकल्पना मंडली आहे. प्रत्यक्ष व्यवहारात असमानता असते. त्यामुळे न्याय, स्वातंत्र्य, समानता ब मोबदला यात होतो. स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रत्येकाला स्वातंत्र्याची समान संधी देखील असते. रॉल्स म्हणतो असमानतेमुळे सर्व समजतील घटकांचे हित साधले जाते. त्यामुळे ज्या पदाला समाजात चांगली वागणूक मिळते. त्या पदाला सर्वांना जाण्याची संधी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांना महत्त्व देतात. कारण समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा हाच उद्देश होता. त्यामुळेच, त्यांनी हे न्याय तत्त्व राज्यघटनेत देखील नमूद केले आहे. राज्यघटनेमुळे मिळणारे कायद्याचे संरक्षण देखील सर्वांना समान देण्यात आले आहे.

## ४.७ दीर्घोत्तरी प्रश्न

१) प्लेटोचा न्यायसिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

२) प्लेटोने न्याय सिद्धांत मांडताना ज्या न्यायसिद्धांताचे खंडन केले आहे, ते खंडन स्पष्ट करा.

३) प्लेटोचा न्यायसिद्धांत सांगून न्यायसिद्धांताची वैशिष्टये स्पष्ट करा.

४) रॉबर्ट नोझिकचा न्यायचा हक्क सिद्धांत स्पष्ट करा.

५) जॉन रॉल्स यांची न्यायाची संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

६) न्याय म्हाणजे काय ते सांगून डॉ. आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१) प्लेटोचा न्यायसिद्धांत

२) न्यायाचा परंपरागत दृष्टिकोण

३) प्लेटोचा न्यायसिद्धांताची वैशिष्टये

४) रॉबर्ट नोझिकचा न्यायाचा हक्क सिद्धांत

५) न्याय जॉन रॉल्सचे तत्त्व

६) सामाजिक न्यायाचे तत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

७) न्याय म्हाणजे समानता (नि:पक्षपातीपणा) : जॉन रॉल्स

❖❖❖❖